द | २४ एप्रिल १९७१ | ५० पैसे

# माणूस



प्लासी ते सिराजउद्दौल्याने साम्राज्यशाहीशी टक्कर घेतली. हळूहळू स्वतंत्रशाहीतून मांडवलशाहीकडे बंगालचे सामाजिक रूपांतर झाले. स्वातंत्र्याच्या लढाया लढल्या गेल्या.

फाळणीचे दुःख आणि नोआखालीचे चटके बसले तरी बंगाली अस्मिता संपली नाही. अजून तो लढतो आहे.

पाकिस्तानच्या वसाहतवादाविरुद्ध. हाती न गवसलेल्या ध्येयासाठी ही एक अखंड लढाई चालू आहे.

प्लासीपासून ढाक्का पर्यंत

**सप्रेम नमस्कार....**

◘ 'हुतात्मा' व. कृ. जोशींची १७ एप्रिलच्या अंकातली कथा आवडली. बरेच दिवसानंतर 'माणूस'मध्ये इतकी चांगली डिटेक्टिव्ह कथा वाचायला मिळाली. अशा प्रकारच्या कथा आल्या तरच त्या प्रकाशित कराव्यात. एरवी ती चार-सहा पाने वाचकाच्या दृष्टिकोनातून वायाच गेलेली असतात. पराजित-संपली, अशीच एखादी चांगली लेखमाला त्वरित सुरू करावी. 'महानगर कलकत्ता'चा पहिला लेख आवडला. सध्या वसंत सरवटे यांची व्यंगचित्रे का येत नाहीत ?

२० एप्रिल, १९७१ — अनिल सहस्रबुद्धे, नगर


किंमत पन्नास पैसे — शनिवार २४ एप्रिल १९७१

# माणूस

वार्षिक वर्गणी पंचवीस रुपये

परदेशची वर्गणी पंचेचाळीस रुपये

वर्ष : दहावे
अंक : अट्ठ्याहत्तरावा (७९)

संपादक
श्री. ग. माजगावकर

सहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

साप्ताहिक माणूस : १०२५ सदाशिव, पुणे ३० : दूरध्वनी : ५७३५९



प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्र काल्पनिक.

# बांगला युद्ध आणि उर्दू वृत्तपत्रे

अकरा एप्रिलला रात्री दिल्लीतील काही निवडक वार्ताहरांच्या घरचे फोन खणखणले. टाईम्स ऑफ इंडियाचे राजकीय समीक्षक दिलीप मुखर्जी यांच्या घरी ताबडतोब निघून या असा निरोप होता. परदेशी व देशी वृत्तसंस्थेचे वार्ताहर घाईघाईने निघाले. बहुतेक पेंगुळले होते. पण निरोपात पाकिस्तानचा संदर्भ असल्याने कशासाठी इतक्या अपरात्री बोलाविले याची उत्सुकता होती.

मुखर्जींच्या घरी पाकिस्तानि हायकमिशनचे दोघे अधिकारी चौधरी आणि हक दिसले. हक आणि चौधरी. दोघांनी भारताकडे राजकीय आसरा मागितला होता आणि सरकारने लगेच देऊन टाकला होता.

देशभर आणि जगातसुद्धा जनरल याह्याखानांच्या सैन्याने शेख मुजिबुरांच्या स्वातंत्र्य सैनिकांच्या चालविलेल्या कत्तलीविरुद्ध संतापाची लाट उसळली असूनसुद्धा भारत सरकार पूर्व पाकिस्तानला 'बांगला देश' म्हणून मान्यता देण्यास मागेपुढे पहात होते. तटस्थ राष्ट्र म्हणून मिरविण्याची आमची हौस अजून फिटलेली नाही बंगालातील जनता आमच्यापुढे मदतीसाठी टाहो फोडत असताना आम्ही मात्र तात्विक विचारांचा किस काढत बसलो.

त्यामुळे पाकिस्तान हायकमिशनच्या या दोघा अधिकाऱ्यांना आश्रय दिल्याचे कून वार्ताहरांना समाधान वाटले. फारशी प्रश्नोत्तरे झाली नाहीत. दोघांनी संयुक्त पत्रक काढले होते. याह्याखानांचा निषेध करून लोकशाहीप्रेमी देशांनी आमच्या पूर्व बंगाल्यांना मदत करावी असे आवाहन केले होते.

यापैकी अब्दुल हक म्हणजे लाहोर विमान स्फोटानंतर प्रक्षुब्ध निदर्शने करणाऱ्या भारतीय तरुणांवर पाक हायकमिशनमधून दगडफेक करणारा व उघडी तलवार दाखविणारा दुय्यम प्रेस अॅटची. दोघेही मूळ बंगाली.

इतक्या रात्री पत्रकार परिषद बोलाविण्यात काही धोरण होते. दुपारी किंवा संध्याकाळी बातमी बाहेर फुटली असती तर धोका होता. रात्री रेडिओवरून ही बातमी फुटायला नको होती. म्हणून बाराची वेळ निवडण्यात आली. नेहमीप्रमाणे हॉटेलात एकत्र येण्याऐवजी मुखर्जींच्या घरी वार्ताहरांच्या हातात बातमी देण्यातही सुरक्षिततेसाठी खबरदारी होती.

या दिवसापर्यंत रशिया, युगोस्लाव्हिया व भारत या तीनच देशांनी याह्याखानां-

विरुद्ध मुजिबूर रहमान यांच्या चळवळीला पाठिंबा दिला होता. चीन इस्लामाबादच्या बाजूला झुकणार होता, यात अनपेक्षित नव्हते. ब्रिटनमधील जनमतही यह्याविरुद्ध गेले होते.

एकंदरीत या सर्वांचा विचार करून भारताने राजकीय आश्रय देण्याचा निर्णय घेऊन टाकलेला दिसतो.

कारण या दोघांनी दहा बारा दिवसापूर्वीच – म्हणजे रेहमानांनी उघड उघड युद्ध पुकारले त्यानंतर लगेच – असा आसरा मागितल्याची आतली बातमी आहे. पण तसे करणे पाकिस्तानला चिथावणी देण्यासारखे होईल का, आमची प्रतिमा डागाळेल का असा विचार करण्यात भारताने वेळ दवडला. आधी नाहीच सांगितले होते, पण रशियासारख्या बड्या राष्ट्राने पाकिस्तानची कान उघाडणी केल्यानंतर मग आम्हाला जोर आला. (आम्ही रशियाच्या इशाऱ्यावर नाचतो ते असे, असे एक वार्ताहर पुटपुटला–)

घाईघाईने बोलाविलेली पत्रकार परिषद अशी चटकन् आटोपली. उशीर झाला होता. वर्तमानपत्रांच्या कचेऱ्यातून अंकाची शेवटची जुळवाजुळव होत होती. त्यामुळे बातमी घेऊन ताबडतोब जायला हवे होते. सगळेच घाईघाईने उठले. पण पुन: त्यांना थांबवून घेण्यात आले.

दोघे आश्रित पुढे निघाले, त्यांना व त्यांच्या कुटुंबियांना कुठल्यातरी अज्ञात सुरक्षित ठिकाणी नेण्यात आले. त्यांचा ठावठिकाणा कुणालाही लागू नये म्हणून ते गेल्यानतर दहा मिनिटांनी वार्ताहरांना जाण्याची परवानगी मिळाली.

दुसऱ्याच दिवशी अमेरिकेनेही याह्याखानांना राजकीय तडजोड करण्याची स्पष्ट सूचना केली. पाकिस्तानातील आपल्या लोकांच्या सुरक्षिततेचा विचार करून अमेरिकेने इतके दिवस तोंड बंद ठेवले होते. सगळेच आपापल्यापुरते पाहणारे निघाले.

पाकिस्तानातील घडामोडीवर भारतातील मुस्लिमांची प्रतिक्रिया काय आहे याची सर्वसाधारण सर्वत्र मुस्लिमेतरांना उत्सुकता असेल. एक गोष्ट खरी की सर्वसामान्य माणसाला मग तो हिंदु असो वा मुस्लिम आपापल्या प्रापंचिक ओढग्रस्तीने इतके ग्रासून टाकलेले असते की अशा प्रश्नांकडे खोलात जाऊन बघावे असे त्यांना वाटणे कठीण. पण पॅन इस्लामचा पुरस्कार करणारी भारतीय बुद्धिवादी मुस्लिम मंडळी पूर्व पश्चिम पाकिस्तानातील झगड्यात कुणाची कड घेते याला आमच्या निधर्मवादाच्या दृष्टीतून सुद्धा थोडेफार महत्त्व आहे, असे वाटते.

माहिती म्हणून देशातील मुस्लिम वर्तमानपत्रांची (उर्दू) प्रतिक्रिया (मुळात 'स्टेटस्मन'ने प्रसिद्ध केलेली) देत आहे :

सर्वच वर्तमानपत्रांनी बंगालमधील अत्याचाराचा निषेध केला आहे. पण, "बांगला देश"ला मान्यता देऊ नये अशी सूचना काहींनी केली आहे. तसे केल्यास

नंतर गंभीर परिणाम होण्याची शक्यता आहे, असे या पक्षांना वाटते.

बऱ्याच पक्षांना वाटते की याह्याखानांना अशी कारवाई करण्याखेरीज पर्याय नव्हता. "अशाच परिस्थितीत दुसऱ्या राष्ट्राने काय केले असते?" (म्हणजे समजा उद्या तामिळनाडू सरकारने स्वातंत्र्य घोषित केले तर इंदिरा गांधी काय करणार आहेत ?)

दिल्लीचे 'दावत' म्हणते, "स्वतंत्र बांगला देशला विरोध करून भारताने विशाल हृदय दाखवावे–पण बंगाली लोकांच्या हिताच्या गोष्टींना पाठिंबा द्यायला हरकत नाही." या वर्तमानपत्राने (२९ मार्च) शेख रहमान यांच्यावर कडवी टीका केली. अलाहाबादच्या "कैद"ने याच दिवशी लिहिले, "शेखविषयी आधी असलेला संशय खरा होता, हे आता स्पष्ट झाले. अन्यायाविरुद्धचा लढा त्यांनी चालूच ठेवायला हवा होता. आता पश्चिम पाकमधील त्यांच्या मित्रांना त्यांनी नाराज करून टाकले."

दिल्लीच्या पैगामने पाच एप्रिलला लिहिले, "भारतीय प्रतिनिधी समर सेन यांनी युनोचे सरचिटणिसांना निवेदन सादर करण्यात कोठले शहाणपण आहे ? युनोच्या प्रतिनिधींनीच या घडामोडींवर अहवाल सादर करण्याची भारताने वाट पहायला हवी होती."

दिल्लीच्या "अल जमीयत"ने पार्लमेंटने सावधगिरीने केलेल्या ठरावाचे व पूर्व बंगालला "बांगला देश" न म्हटल्याचे स्वागत केले.

रामपूरचा कौमी जंग लिहितो, "आज पूर्व बंगाल मागतो तसे स्वातंत्र्य पश्चिम बंगाल मागू लागले तर ते आम्ही सहन कसे करणार ?"

काही वर्तमानपत्रांनी पूर्व बंगालच्या घटनांविषयीच्या बातम्यांवर टीका केली आहे. पाटण्याचा 'संगम'ने पाकिस्तानी सैन्य हिंदूंची कत्तल करीत असल्याची बातमी दिल्याबद्दल एका वृत्तसंस्थेला धारेवर धरले.

पण पाकिस्तानची पूर्व व पश्चिम अशी फाळणी होणे अटळ होते असे बहुतेक सर्व मुस्लिम पत्रांना वाटते.

"अल जमियत" लिहितो, "शेख आज विजयी झाले नाहीत तरी स्वतंत्र देशाचे बीज रोवले गेले आहे, कधी ना कधी त्याला फळ येणारच."

लखनौचा "कौमी आवाज" म्हणते "पाकिस्तानी बंदुकीतून सुटलेल्या गोळीने (जिनांच्या) दोन-राष्ट्र सिद्धांताचा शेवट झाला."

मुंबईच्या "इन्कलाब"ने मध्यम मार्ग स्वीकारून याह्या व शेख असे दोघांना सुनावले आहे. पण दुसऱ्याच दिवशी असेही म्हटले, "पाक सैन्य बांगला देशला चिरडू शकत नाही. कारण "बांगला देश"ही चळवळ आहे, जनतेच्या हृदयातून येणारे चैतन्य आहे. कोणतेही सैन्य जनतेच्या हृदयावर राज्य करू शकत नाही !"

बंगलोरचा 'पासबान' म्हणतो, 'पाकिस्तानच्या नेत्यांनी सत्तास्पर्धेत पाकची उभारणी करणाऱ्या इस्लामी सूत्राला तोडून टाकले आहे.'

भोपाळच्या 'नादिम' नुसार आता या घटना केवळ अंतर्गत बाबी उरल्या नाहीत–तर पाटण्याच्या 'साथी'ने बंगाली देशभक्तांना भारताने पाठिंबा द्यावा असे आवाहन केले.

मुंबईच्या 'खिलाफत'ने अनेक देश व युनो यांनी धारण केलेल्या मौनावर आश्चर्य व्यक्त केले आहे.

तर कलकत्याच्या 'हिंदी'ने आणखी एक पाऊल टाकले–'लोकशाही, न्याय, मानवता व राजकीय शहाणपण यांचा विचार केला तर बांगला देश चळवळीपासून आम्ही (भारतीय) अलिप्त राहूच शकत नाही. पाकिस्तान काश्मीरमध्ये जे करीत आहे त्याच्याच जोरावर आम्हाला बांगला देशच्या जनतेला मदत करण्याचा अधिकार दिला आहे!

◻

## डॉ. नॉर्मन बोटलॉग भारतात आले तेव्हा...

खरी थोर माणसं खरोखरीच कशी असामान्य असतात याचे उदाहरण म्हणजे डॉ. नॉर्मन बोट्लॉग. भारताच्या हरित क्रांतीला चालना देणाऱ्या या कृषी पंडिताला नोबेल पारितोषिक मिळाल्यानंतर गेल्या पंधरवाड्यात तो दिल्लीत आला. तेव्हाची गोष्ट. विमानतळावर अनेक विद्वान शास्त्रज्ञ आणि इतर मित्र वाट पहात उभे होते. पण डॉक्टरसाहेब शाही पाहुणे असल्याने ते रांगेत उभे रहाणे वगैरे आले. विमानातून ते उतरले तो अधिकाऱ्यांनी आणून ठेवलेल्या मोटारीत बसून सरळ राष्ट्रपती भवनातील पाहुण्यांच्या निवासस्थानात जायचे. पण प्रत्यक्षात ती प्रोटोकॉलची बंधने न मानता ते सरळ आपल्या शास्त्रज्ञ मित्रांजवळ गेले. खूप दिवसांनी भेटल्यानंतरचा आनंद ओसंडत होता. मोकळ्या गप्पा झाल्या. अधिकारी अस्वस्थ होत होते.

मग डॉक्टरसाहेब निघाले. पण ते राष्ट्रपती भवनात रहायला तयार झाले नाहीत. ते औपचारिक रहाणे त्यांना पसंत नव्हते. माझ्याकडे कुणालाही कोणत्याही वेळेला येता आले पाहिजे, दिलखुलास गप्पा मारता आल्या पाहिजेत, तसे राष्ट्रपतींच्या पाहुण्याला करता येणार नाही, म्हणून माझी सोय इतरत्र करा असा नॉर्मननी आग्रह धरला. अधिकारी पेचात पडले. पण शेवटी एका हॉटेलमध्ये व्यवस्था करून देणे त्यांना भाग पडले.

नंतर दोन दिवसांनी एका शेतावर संशोधनाची पहाणी करण्यासाठी जायचे होते. उद्घाटन वगैरे साग्रसंगीत होणार होते. पण तिथे जायचे म्हणजे डॉक्टर बोट्लॉगना पहाटे पाच वाजता उठवावे लागेल–

एवढ्या थोर आणि वृद्ध माणसाला इतक्या पहाटे उठवायचे कसे याची फिकीर अधिकाऱ्यांना पडली होती. वेळ बदलून घेण्याचा प्रयत्न अयशस्वी ठरला. पण कुठेच काही बिघडले नाही. हा कृषी शास्त्रज्ञ कोंबड्याने पहिली बांग द्यायच्या आधीच म्हणजे तीन वाजता उठून तयार होऊन हॉटेलच्या खोलीत वाट पहात बसला होता!

◻ ◻ ◻

# शतपावली

रवींद्र पिंगे

## महानगर कलकत्ता

### लेखांक दोन

कलकत्याच्या अवाढव्य रस्त्यावर पहिली आठवण झाली ती घोटभर चहाची !

पण फर्लांगभर तंगडतोड करूनही हॉटेल दिसेना. एका बंगाली बाबूला विचारलं. तो म्हणाला,

'कलकत्यात तशी चहाची हॉटेलं नाहीत; जशी मुंबईत असतात. मात्र इथे प्रत्येक मिठाईवाल्याच्या दुकानात शेगडीवर किटली ठेवलेली दिसेल. ती चहाचीच असते. तिथे मातीच्या पेल्यातून चहा मिळेल किंवा महागड्या हॉटेलात ट्रेमधून मिळेल. दुसरीकडे कुठेही मिळणार नाही.'

बंगाली मिठाईवाल्याकडे जाऊन तुरट चहाचे घोट घशाखाली कसेबसे उतरवले. आजूबाजूची माणसं मिठाई बकाबका खात होती. चेहऱ्यावरून सर्वांची परिस्थिती ओढग्रस्तीची वाटली. कलकत्यात मिठाई महाग आहे. मग ह्या गरीब लोकांना हे खाणं परवडतं कसं ? चटक हे ह्याचं सोपं उत्तर नसणार. आत्यंतिक निराशेने हताश झालेलं मन, खर्चाचा विवेक बाळगत नाही; ते आला क्षण साजरं करतं, कर्जावर जगण्याचा निर्धार करतं, हेच कारण असणार. कलकत्यासारख्या एक कोटी लोकसंख्येच्या अक्राळविक्राळ शहरात सामान्य माणसाला पंधरा वीस पैशात सिंगल चहा मिळू शकेल अशी हॉटेल्स नसावीत हे फार आश्चर्याचं आणि दुःखाचं

आहे. काही ठिकाणी शिखांची हॉटेलं दिसली. पण त्यांचे दर भरमसाट वाटले. खास बंगाल्यांचं असं फराळाचं हॉटेल कुठेच दिसत नाही.

रस्ते माणसांनी फुलले आहेत. मधमाशा पोवळ्याला जशा लिवलीवत असतात, तशी माणसं एकमेकांना ढकलत, रेटत पुढे सरकत आहेत. ट्रॅम्स्‌ना इतकी माणसं लटकलेली आहेत की त्यांच्या भारानेच वाहान जागच्या जागी थांबतीलसं वाटतं. पण प्रत्यक्षात तीन–तीनशे उतारू घेऊन चित्रोळ्या ट्रॅमा आस्ते आस्ते रस्ता काटत आहेत. तीच गत दुमजली बसेसची. अफाट चेंगराचेंगरी करून माणसं एकमेकांना डकली आहेत. खालच्या मजल्यावर किमान शंभर उतारू असावेत. शिडीवर शंभर असावेत. आणि वरच्या मजल्यावर दोनशे असावेत! शिवाय बसेसच्या दोन्ही अंगाच्या खिडक्यांना माणसं लटकलेली आहेत. फुकट प्रवास करायला मिळाल्याचा आनंद त्यातल्या प्रत्येक मर्दाच्या चेहेऱ्यावरून उसंडत आहे. वहानांचे ड्रायव्हर्स आणि कंडक्टर्स सर्रास बिगर बंगाली आहेत. ते म्हणे भडक डोक्याच्या बंगाल्यांच्या भानगडीत पडत नाहीत. कुणीही कुठेही दोरी खेचून.घंटी वाजवो, ड्रायव्हर गुपचूप बस थांबवतो. थंड आवाजात कंडक्टर तिकीट घेणार का, ते समस्त पॅशिंजरांना एकवार विचारून घेतो. जे आपसुख पैसे देतील त्यांना तिकीट देतो. जे पाकीटाकडे हात नेत नाहीत, त्यांना तो आग्रह करीत नाही. आपला जीव बचावणं आणि बंगाल्याच्या उरावर बसून. मिळवलेली नोकरी शाबूत ठेवणं हेच कलकत्त्याच्या बस कंडक्टरचं ह्या इहलोकीचं अवतारकृत्य असनं. कालीघाट रस्त्यावर ट्रॅम डेपो आहे. तिथपर्यंत चालत चालत गेलो. रस्त्यावर पाच पन्नास ड्रायव्हर्स आणि कंडक्टर्स विड्या फुंकत खड्या बिहारी बोलीत गावाकडच्या गप्पा मारीत उभे होते. ट्रॅम हे कलकत्त्यातलं स्वस्त आणि लांबलांबच्या पल्ल्यांपर्यंत पोहोचलेलं जनतेचं वहान आहे. कलकत्त्यात कुठूनही कुठेही जायचं असलं तरी ट्रॅम ही मिळतेच. तिचा वेग तसा मंद असल्यामुळे तीला बाहेर लोंबकळणं बिनधोक, फुकटावं आणि सोपं असत.

गच्च भरून एक ट्रॅम आली. मी तिला लोंबकाळलो. रस्त्याच्या दोन्ही बाजूच्या इमारतींच्या भिंतीवर माओचे भले मोठे फोटो होते. जिथे त्याचे फोटो नव्हते, तिथे फत्ताड मोठ्या अक्षरात त्याची वचनं लिहिलेली होती. जवळपास प्रत्येक भिताडावर 'लाँग लीव्ह माओ!' 'चेअरमन माओ इज अवर चेअरमन.' आणि 'पाथ ऑफ चायना इज अवर पाथ' ह्या घोषणा काळ्या वटवटीत रंगाने चितारल्या होत्या. अक्षरांची उंची दीड फूट होती. माओची छबी स्टेनशील केलेल्या कागदावर डांबर फासटून उमटवलेली आहे. त्यामुळे माओचं एकच रूप सर्व चित्रात दिसतं. जिथे भिंत ऐसपैस असते, तिथे एकच आकाराचे दोन किंवा तीन फोटो असतात. कलकत्त्यातल्या प्राय: प्रत्येक भिंतीवर माओचा फोटो किंवा त्याचा जयजयकार कोरलेला आहे. कॉलेज स्ट्रीटच्या तोंडावर एक मशीद दिसली. तिच्या

भिती मात्र स्वच्छ सफेत दिसल्या ! हिंदूच्या देवळांची ऊजिबात गय केलेली नाही. दक्षिणेश्वराच्या वळणावर एक देऊळ लागलं. ते पायापासून कळसापर्यंत उलटसुलट राजकीय घोषणांनी आणि आरोपांनी बरवटून ठेवलेलं होतं.

कॉलेज स्ट्रीटवर उतरलो. हा कॉलेजांचा स्फोटक रस्ता आहे. सदैव पेटलेला असतो. पूर्वी दुपारी दोन अडीचला चहा वगैरे झाला की विद्यार्थी हाणामारीला सुरुवात करीत. आता शक्यतोवर कॉलेजला बट्टचा मारून आल्या आल्याच बॉंब-फेक करतात असं कळलं. हे बॉंब प्रकरण काय आहे म्हणून ताजी मैत्री झालेल्या निर्मल दासला विचारलं. तो थंडपणे म्हणाला,

'बॉंब म्हणजे फार स्फोटक फटाकाच म्हणाना ! चेंडूसारखा असतो. त्याला वात गुंडाळलेली असते. तो जिथे पडेल तिथे स्फोट होतो. ज्याच्या अंगावर पडेल, तो घायाळ होतो. हा बॉंब सियाल्दा वगैरे भागात सहा आण्यांना एक ह्या भावाने विकत मिळतो. लपून छपून नाही. उघड–उघड. पाऊस-पाणी पडलं की मार-वाड्यांचं फावतं. ते कोरे बॉंबस् कॉलेज विद्यार्थींना तीन रुपयांच्या भावाने काळ्या बाजारात विकतात !'

'पण अखेर हे बॉम्बस मारवाडी आणि त्यांचेच जे कुणी धनिक भाऊबंद असतील, त्यांच्याच टाळक्यावर पडायचे आहेत, हे ह्या मारवाड्यांना कसं कळत नाही ?'

'हाच तर मारवाड्यांचा विशेष आहे ! बॉम्बस् पडायचे आहेत तेव्हा पडोत, आज काळाबाजार करून पैसा करा, हे त्यांचं व्यवहारी धोरण असतं. तुम्हाला सांगतो, आमचा सगळा कलकत्ता मारवाड्यांच्या हातात आहे. सर्व उद्योगधंदे त्यांच्या हातात ! आणि ही त्यांची पकड ढिली होण्याची काहीही लक्षणं नाहीत.'

रस्त्यात शरदबाबूंच्या प्रकाशकाचं काळोखी ग्रंथभांडार दिसलं. केवळ शरद-बाबूंच्या कादंबऱ्या विकून हे लोक गबर झाले आहेत. आत मेजापाशी मॅनेजर होता. त्याला म्हटलं,

'नमस्कार !'

'नॉमॉस्ते !'

'तुम्ही म्हणे शरदबाबूंचे प्रकाशक आहात.'

'हो.'

'त्यांच्या कादंबऱ्या अजूनही खपतात ?'

'हो.'

'किती ?'

'ते सांगता येणार नाही.'

'किती आवृत्त्या निघाल्या आहेत ?'

'काहींच्या तीन चार. काहींच्या तीस-पस्तीस.'

'एका कादंबरीच्या तीस-पस्तीस आवृत्त्या ?'

'हो.'

'कोणत्या कादंबरीच्या ?'

'ते सांगता येणार नाही.'

'शरदबाबूंच्या वारसांची चंगळ असेल !'

'ते सांगता येणार नाही.'

'वर्षाकाठी साधारण किती रॉयल्टी त्यांना जाते ?'

'ते सांगता येणार नाही.'

'हल्ली सर्वात लोकप्रिय बंगाली लेखक कोण आहे ?'

'ते सांगता येणार नाही.'

'सांगता येतील अशा गोष्टींपेक्षा, सांगता येणार नाहीत अशाच गोष्टी तुमच्याशी अधिक दिसताहेत !'

'खरं म्हणजे तेही सांगता येणार नाही.'

'बरं, आता ह्या रस्त्यावर बघण्यासारखं काय आहे ?'

'ते सांगता येणार नाही.'

'का ?'

'कारण आता पाच मिनिटात ह्या रस्त्यावर विद्यार्थ्यांची तुफान हाणामारी होणार असल्याची बातमी आहे. म्हणून आम्ही दुकानाच्या फळ्या ओढून घेण्याच्या तयारीत आहोत. तुम्ही कृपया पळा !'

मी टरकलो. नशीबाने टॅक्सी समोर आली. ती पकडून महाराष्ट्र निवासावर परतलो. निवासाच्या प्रवेशद्वाराच्या दोन्ही बाजूंना माओचे मोठे फोटो रेखाटलेले होते.

कलकत्त्यात फार लवकर अंधारतं. अंधारातच पुन्हा बाहेर पडलो. स्फोटक म्हणून ख्याती पावलेल्या कलकत्त्याच्या रस्त्यावरून हौशी स्त्रीपुरुष, दुकानातला माल बघत बघत फिरत होते. चित्रपटगृहांना रांगा लागल्या होत्या. त्यातल्या त्यात तयार फॅन्सी कपड्यांची दुकानं जास्ती दिसली. एक चिनी हॉटेल दिसलं. आत गेलो. डिट्टो मुंबईचं चिनी हॉटेल वाटलं. आतलं वातावरणही अगदी तसंच. पदार्थांच्या चवीही तंतोतंत जुळणाऱ्या. किंमतीही मुंबईपेक्षा पाव आणा कमी नाहीत. चिकन सूपाच्या कपाला पावणे चार रुपये. आतलं गिऱ्हाईकही सुखवस्तु. हौशी नाटकवाल्यांचं एक टोळकं बाजूला बसलं होतं. ते आग्रह करकरून बरोबरच्या नटव्या तरुणींना चिनी पदार्थ खाऊ घालीत होते. त्या गुबगुबीत गालाच्या बंगाली मुलीसुद्धा त्या तरुणांवर चेटूक करत होत्या; सूप ओरपीत होत्या.

हॉटेलमधनं बाहेर पडायला आणि निवासातले एक कलकत्त्यात राहणारे मराठी

पृष्ठ ५९ वर

सप्रेम नमस्कार

सोबत प्लासी ते डाक्काचा प्रथम लेख पाठवला आहे. दुसरा लेख हा चितगावच्या लढाईचा 'चक्षुर्वैसत्यम' वर्णनाचा असेल.

आज काही अवामी लीगच्या कार्यकर्त्यांना भेटलो. रविवारी सविस्तर चर्चेसाठी बैठक आहे. आज पाकिस्तानमधून आलेल्या अमेरिकन इंजिनीयरच्या घेतलेल्या मुलाखतीची टेप चिफ सेक्रेटरीने वाजवून दाखवली. तसेच निर्वासितांच्या मुलाखतीही घेतल्या. अशा प्रयत्नातून साकार झालेली अनिल बर्वे यांची नवी लेखमाला प्लासी ते डाक्का.

## लेखांक एक

अठ्ठावीस मार्च !

अजून पुरतं उजेडायचंय–

'ये रेडीयो ढाक्का बेतार केंद्र है–'

निवेदिकेच्या त्या गोड आवाजाने सात खंड चपापले. राजकारणी दिङ्मूढ झाले. जगातल्या पाचव्या क्रमांकाच्या राष्ट्राच्या विघटनेची ती सुरुवात होती. ते रेडियो ढाक्का बेतार केंद्र होते–

...'इस्लामने आजपर्यंत जगाला मानवतेचा नि समानतेचा संदेश दिला परंतु आज पश्चिम पाकिस्तानी राज्यकर्ते मात्र बंगालला इस्लामच्या नावाखाली गुलामगिरीत ठेवू पहात आहेत. त्याचे आर्थिक शोषण करीत आहेत.'

मग मशिनगनच्या फैरी – धुराचे लोट – अस्पष्ट होत गेलेला आवाज. पाकिस्तानी सैन्याने 'विप्लवी बांगला'चे ढाक्का रेडियो केंद्र ताब्यात घेतले. स्वतंत्र बांगला देशाच्या ढाक्का बेतार केंद्राची पहिली निवेदिका 'नजमा अख्तर' शहीद झाली–

जे मरतात ते शहीद होतात – जिंकतात ते नेते होतात – आणि जनता ?– तिच्या भाळी तीव्र अवहेलना, त्याच वेदना, अश्वत्थाम्याच्या – कधीही न संपणाऱ्या.

स्वतंत्र बांगला देशाचे रेडियो केंद्र आता वनवासी झाले. मुक्तिसैन्याच्या बरोबर ते रानोमाळ धावू लागले. आज ढाक्का – उद्या चितगाव – कधी या



जंगलात तर कधी त्या जंगलात. स्वतंत्र बांगला रेडियो जनमानसात 'बांगला देशची' भावना तेवीत ठेवीत होता. पंजाबी भांडवलदारांनी चालवलेल्या बंगालच्या शोषणाचे पाढे वाचत होता.

आर्थिक शोषण हेच तर भांडणाचे मूळ कारण. जर बंगालचे आर्थिक शोषण कायम करता आले तर बंगाली संस्कृतीला 'जपण्यास' रावळपिंडीची ना नव्हती. आणि आर्थिक शोषण थांबवले नाही तर स्वतंत्र बांगलाची घोषणा अवामी लीगने आधीपासूनच तयार ठेवली होती. 'द पीपल' या अवामी लीगच्या दैनिकाप्रमाणें—

पाकिस्तानच्या गंगाजळीतील पंधराशे कोटी रुपयांपैकी फक्त अडीचशे कोटी

रुपये पूर्व पाकिस्तानात असून साडेबारा कोटी रुपये पश्चिम पाकिस्तानमध्ये आहेत. तिसऱ्या पंचवार्षिक योजनेत पूर्व पाकच्या तिप्पट रक्कम पश्चिम पाकवर खर्च करण्यात येणार आहे. आजपर्यंतच्या परकीय मदतीपैकी ऐंशी टक्के रक्कम पश्चिम पाकनेच हडप केलेली आहे. विकास खर्चामध्ये पश्चिम पाकच्या वाट्याला साठ अब्ज रुपये गेले तर पूर्व पाकच्या पदरात तीस अब्ज पडले. जेवढ्या काळात प. पाकमध्ये तीस अब्ज रुपयांची अयात करण्यात आली तेवढ्या काळात पूर्व पाकमध्ये केवळ तेरा अब्जांची आयात झाली. केंद्रीय सेवकांमध्ये पूर्व पाकचे प्रमाण पंधरा टक्के असून सेनादलात तर केवळ दहा टक्के आहे. अशा पद्धतीच्या शोषणाने प. पाकमधल्या वीस भांडवलदारी कुटुंबांनी सत्तर टक्के औद्योगिक भांडवलावर – बँकेच्या ऐंशी टक्के रकमेवर, विम्याच्या पंचाहत्तर टक्के रकमेवर, स्वतःची पकड बसवली आहे.

जीना गेले. लियाकत अली खाँ, सुऱ्हावर्दी संपले. परंतु हे शोषण संपले नाही. असंतोष भडकतच होता. तेव्हा अयूबने एकसष्टच्या घटनेत दोन्ही पाकमधली विषमता नष्ट करण्याचे कलम घातले. परंतु सलतनी आल्या गेल्या पण पाकवर हुकमत मात्र दाउद–हबीब या धनिक कुटूंबाचीच होती.

पश्चिम पाकच्या भांडवलदारांनी पैसा आणि सत्ता या जोरावर पूर्व पाकच्या व्यापाऱ्यांना, भांडवलदारांना दडपण्यास सुरुवात केली. पश्चिम पाकच्या भांडवलदारांनी चालवलेल्या या ' गळचेपी ' विरुद्ध पूर्व पाकचे भांडवलदार आवाज उठवू लागले. त्यांचा पक्ष होता अवामी लीग. पाकमध्ये कम्युनिस्ट पक्षावर बंदी असल्याने साहजिकच सामान्य जनतेचे नेतृत्वही ' अवामी लीग 'सारख्या राष्ट्रीय भांडवलदारी पक्षाकडे आले. आणि दोन भांडवलदारी गटांच्या लढाईत पूर्व पाकच्या जनतेला सामील करून घेण्यासाठी अवामी लीगने हाक दिली – ' बंगाली अस्मितेची ' आणि आजचा हा बांगला देशाचा सर्वसंहारक संघर्ष उभा राहिला.

हजारो मेले किंवा लाखो मेले – जे मेले ते मेले ! कदाचित स्वातंत्र्यही मिळेल. पण पुन्हा एकदा, बऱ्याच उशीरा लोकांच्या ध्यानात येईल, की ते ' स्वातंत्र्य ' नव्हते ' सत्तांतर ' होते. मग पुन्हा एक हाक येईल – जनतेच्या मुक्तीची – कॅप्टन तुहाची. बंगाली भांडवलदार विरुद्ध बंगाली जनता. पुन्हा सुरू होईल एक नवी साठमारी '... ◻

जनरल टिक्काखान मारला गेला – शेख मुजीबर रेहमान अटकेत – चितगाव संपूर्ण उध्वस्त – डाक्का मुक्ती सैन्याच्या ताब्यात – पूर्व पाकमधून सोन्याचा साठा हलविण्यास सुरुवात – रणधुमाळीत तीन लाख ठार – गाडीच्या गतीपेक्षा बातम्यांचा वेगच जास्त.

येणाऱ्या बातम्यांचा खरेखोटेपणा पडताळण्यासाठी ' माणूस 'तर्फे पू. पाकिस्तान

सरहद्दीवर चालली आहे. जमल्यास आत शिरण्याचाही विचार आहे. परंतु खरं सांगायचं म्हणजे हे सारं पोटासाठी चालले आहे – कारण राजकीय सत्येही राजकीय स्वार्थाप्रमाणे बदलती असतात. आज बंगालला पाठिंबा देणारे आम्ही काल नागांना, मिझोंना इतक्याच क्रूरतेनं चिरडत होतो. तेव्हा सत्यमेवजयते – अहिंसा परमोधर्मः ही आमची नीतिवचने घटनेच्या पुस्तकात कलेवराप्रमाणे पडली होती. आज यूनोचा धावा करणारे दिल्लीश्वर तेव्हा भारताच्या अंतर्गत बाबीत ढवळाढवळ न करण्याची गुरगुर 'यूनोत' नागा-मिझो प्रश्न येऊ नये म्हणून करीत होते.

नागा मिझोंना पाकिस्तान शस्त्रे पुरवते असा आमचा आरोप होता तर हुबळी नदीतल्या जहाजावरून 'रेडीया डाक्का बेतार केंद्र' चालवले जातें असा पाकिस्तान सरकार आज आरोप करते. सारीच राजकीय स्वार्थाची दलदल – परंतु यातही माणुसकीची फुले फुलतात. तीन लाख माणसे मारली गेली या कल्पनेनेच हृदय हेलावले जाते.

माझ्या शेजारी कोणी व्यापारी प्रतिनिधींचा गट बसला होता. चघळायला विषय तरी किती चविष्ट ?–'बंगाल जर स्वतंत्र झाला तर कलकत्त्याशी व्यापार वाढेल – भरभराट होईल.' 'इंडीयन गव्हर्मेंटने आर्मी घुसवली पाहिजे आर्मी.'... नेकवंद टाय ब्रेकफास्ट घेत होते. तिकडे डाक्यात प्रेतं सडत होती. स्वतःशीच तुच्छतेने हसलो...

युरोपच्या इतिहासात फ्रान्सचे जे स्थान तेच हिंदुस्थानच्या इतिहासात बंगालचेही. भारतातल्या साऱ्या राजकीय आणि सामाजिक परिवर्तनाची सुरुवात बंगालनेच एकला चलोरे पद्धतीने केली. नबाब सिराजउद्दौला प्लासी लढला तेव्हा कोण त्याच्या खांद्याला खांदा भिडवून लढले होते ? राजा राम मोहन रॉयने सामाजिक सुधारणांचा झेंडा फडकावला तेव्हा कोणी त्याला उंचावले ? आणि आज सामाजिक न्याय आणि मानवी स्वातंत्र्यासाठी लढणाऱ्या नक्षलवाद्यांना कोण पाठिंबा देते आहे ?–कोणीच नाही.

गेल्या दोन शतकांचा बंगालचा इतिहास हा भविष्याचा मागोवा वाटतो. प्लासीमध्ये सिराजउद्दौल्याने साम्राज्यशाहीशी टक्कर घेतली–हळूहळू सरंजामशाहीतून वाढत्या भांडवलशाहीकडे बंगालचे सामाजिक रूपांतर झाले. सामाजिक सुधारणांचे झेंडे फडकले. 'स्वातंत्र्याच्या' लढाया लढल्या गेल्या. फाळणीचे दुःख आणि नौखालीचे चटके बसले तरी बंगाली अस्मिता संपली नाही. अजन तो लढतो आहे. पाकिस्तानच्या वसाहतवादाविरुद्ध. भारतीय भांडवलशाहीविरुद्ध. हाती न गवसलेल्या ध्येयासाठी ही एक अखंड लढाई चालू आहे प्लासीपासून डाक्यापर्यंत !

◻

सोळा प्लॅटफॉर्मचे ते प्रचंड स्टेशन–'हावडा' पाहूनच हबकलो. माणसांच्या गर्दीनेच गुदमरून गेलो. बाहेर आलो तर सारी वाहने भरलेली. मग लोंबकळलो ट्रॅमला. भविष्यालाही लोंबकाळणारी माणसे आम्ही. ट्रॅमला लोंबकाळणे कितीसे अवघड ?

जीवनाच्या एवढ्या ओढाताणीत...ट्रॅमच्या खडखडाटात उंच उंच इमारतींवर काळे झेंडे उदास माना खाली घालून उभे होते. कशासाठी ?–लांब दूर कर्णफुलीच्या काठी हजारो माणसे निर्घृणपणे मारली गेली त्याच्या निषेधासाठी...

निवडणुका तर संपल्या. मग शहीद मैदानावर ही दोन लाख माणसे कशासाठी ?–डाव्या कम्युनिस्टांची सभा–बांगला देशाच्या पाठिंब्यासाठी !

उपाशी तर नेहमीच राहावे लागते–मग या पाक वकीलातीसमोर तरुणांचे हे उपोषण, हे आत्मक्लेश कशासाठी ? डाक्यात आग ओकत धावणाऱ्या रणगाड्यांना थोपवण्यासाठी.

थप्पड एका गालावर बसली तरी डोळे दोन्ही रडतात. सारा बंगाल विव्हल झाला आहे. नौखालीत हिंदूंची कत्तल करणारा कोणी उस्मान अली आणि कलकत्त्यात मुसलमानांना कापणारा उमेश बोस–दोघेही 'जय बांगला'चा घोष करतात. कलकत्त्यातच नव्हे तर सर्व बंगालमध्ये 'बांगला देश'साठी मदत समित्या उभ्या राहिल्या आहेत. अन्न, वस्त्र, औषधे अवामी लीगच्या कार्यकर्त्यांपर्यंत पोचवली जात आहेत.


# व्होल्गा जेव्हा लाल होते

ले. : वि. स. वाळिंबे

मूल्य : अठरा रुपये

राजहंस प्रकाशन

प्रेसिडेन्सी कॉलेजच्या गल्लीमध्ये दुसऱ्या मजल्यावर 'कॉफी हाऊस' आहे. हे कॉफी हाऊस म्हणजे उगवत्या बुद्धिवाद्यांची चावडी. साऱ्या जगातल्या विद्वानांना येथे पिंजण्यात येत असते.

हॅलो कॉम्रेड ! एका नक्षलवाद्याशी मैत्री केली. कॉफी पिता पिता विद्वत्तेचा आव आणला. त्यालाही बरे वाटले.

" साम्राज्यशाही आणि वसाहतवादाविरुद्धच्या राष्ट्रीय मुक्ती संग्रामांना आपण पाठिंबा दिला पाहिजे हे खरे. परंतु अशा राष्ट्रीय मुक्ती आघाडीचे नेतृत्व जर श्रमजीवी वर्गाकडे असेल तरच ती पुरोगामी चळवळ ठरते–उदाहरणार्थ व्हिएतनामची राष्ट्रीय आघाडी. जर भांडवलदारांकडे नेतृत्व गेले तर तो देश प्रतिक्रांतिकारक बनतो. उदाहरणार्थ भारत. तेव्हा आपण हुरळून जाऊन क्रांतिकारी चळवळ म्हणून शेख मुजीबरला डोक्यावर घेता कामा नये. प्रथम त्याचा कार्यक्रम व धोरण तपासले पाहिजे. कारण इतके दिवस तो स्वतःला अँटीकम्युनिस्ट म्हणवून घेत होता. दुसरे म्हणजे हा मानवी संहार. इतकी माणसं मारली गेली त्याला अवामी लीगच जबाबदार. लष्कराशी हे समोरासमोर लढायला गेले त्यामुळे माणसे तर हजारो मेलीच. पण विध्वंसही अतिभयंकर झाला. याऐवजी माओचे युद्धतंत्र–खेडी जिंकून शहरे वेढा–अंमलात आणले असते तर खऱ्या अर्थाने निम्मा बंगाल मुक्त होऊन तिथे अवामी सरकार स्थापता आले असते. आता धोका असा निर्माण झाला आहे की जर पराभव झाला तर या चळवळीला फार मोठा सेटबॅक बसेल. उदाहरणार्थ तेलंगणनंतर भारतातील क्रांतीला मिळालेला सेटबॅक आणि जर हा लढा दीर्घकाळ चालला तर असा फायदा होण्याची शक्यता आहे, की भांडवलदारी नेतृत्व संपून कामगारवर्गाचे नेतृत्व निर्माण होईल उदा.... "

'कॉम्रेड, तुम्ही असं करा, आगरताळ्याला जा. तेथील काही विद्यार्थी चितगावमध्ये प्रत्यक्ष लढाईच्या वेळी होते–त्यांना कॉंटॅक्ट करा. तुम्हाला बरीच माहिती मिळेल.' मुलाखत संपवून बाहेर आलो. बाहेर मुसळधार पाऊस पडत होता !

डमडमच्या धावपट्टीवरून इंडीयन एअरलाइन्सचे विमान पूर्वेकडे झेपावले–त्या पूर्वेकडे जळता व्हिएटनाम आहे. त्या पूर्वेकडे पेटता बंगाल आहे.

( क्रमशः )

समाजातील नागरिक केवळ युद्धकाळात जागरुक असून
चालत नाही. तो सदैव जागरुक असावा लागतो.
आणि म्हणून नागरी संरक्षणाचा प्रश्न
नजरेआड करून चालणार नाही...

**आनंद रामचंद्र फुले**

# प्रारंभ पाच

युद्धाच्या गोष्टी प्रत्येकासाठी नेहमीच रोमांचकारी असतात. सध्या साऱ्यांचे लक्ष पूर्व पाकमधील घडामोडींवर खिळलेले आहे. डाक्का विद्यापीठात पहिल्या वर्षाला शिकणाऱ्या रोशन आरा बेगम नावाच्या विद्यार्थिनीने स्वतःच्या छातीवर सुरुंग बांधून अग्निवर्षाव करणाऱ्या पॅटन टँकसमोर स्वतःला झोकून दिले. परिणामी तिच्या बलीदानाने एका पॅटन टँकचा निकाल लागला. शेकडो जीव वाचले. वर्तमानपत्रातली बातमी वाचून प्रत्येकालाच तिच्या धीरोदात्त हौतात्म्याबद्दल अभिमान वाटला असेल.

अजूनही दुसऱ्या महायुद्धातल्या हेरकथा वा शौर्यकथा वाचून व चित्रपटाच्या माध्यमाद्वारे पाहून माणसांची मने भारावून जातात. युद्धविषयक इंग्रजी चित्रपटांना अजूनही विलक्षण उत्साहाने दाद मिळते किंवा नियतकालिकात सातत्याने दुसऱ्या महायुद्धाच्या कथा प्रकाशित होत असतात. ही गोष्ट निश्चितपणे चांगली आहे. देशप्रेमापोटी अकल्पित साहस व अतुलनीय त्याग ह्या धीरोदात्त गोष्टींबद्दल माणसाला नेहमीच आदर वाटत आला आहे. त्याचाच हा एक अविष्कार आहे.

हे सारे मान्य केले तरी लोकांच्या नैतिक किंवा सामाजिक जबाबदारीचा अविष्कार प्रत्येक वेळी निश्चित व उत्साहप्रद असतोच असे नाही. तो तसा असूही शकत नाही. जर त्या बाबतीत लोकांची धारणा आधीच तयार केली गेली असेल

व त्यांना त्याप्रमाणे आवश्यक ते प्रशिक्षण मिळाले असेल तरच आपतप्रसंगी हा आविष्कार निश्चित व फलस्वरूप राहील. अलौकिक देश प्रेमाची किंवा बलीदानाची उदाहरणे मनाला भारावून टाकणारी असली तरी थोडी मोजकीच असतात. सर्व–सामान्य लोकांना त्यांच्या सामाजिक जबाबदारीची जाणीव प्रयत्नपूर्वक द्यावी लागते. त्यासाठी नानाविध योजना अक्षरशः कार्यान्वित कराव्या लागतात. नागरी संरक्षणाचा प्रश्न अत्यंत महत्त्वाचा आहे. नेहमीच असतो. केवळ युद्धजन्य काळातच नागरिक जागरूक असून चालत नाही. तो सदैव जागरूक असावा लागतो.

महाराष्ट्राच्या नागरीक संरक्षण सेवा संचालनालयाचे प्रमुख ब्रिगेडियर बी. जी. देऊस्कर ह्यांनी त्या दिशेने वाटचाल करण्याचा शुभारंभ मुंबई विभागापासूनच केला. नागरिकांच्या मनावर नागरीक संरक्षण सेवेची अपरिहार्य गरज व तिचे नानाविध कार्य ठसविण्याच्या दृष्टीने लोकांना प्रात्यक्षिक दाखविण्याचा कार्यक्रम हाती घेण्यात आला. त्या संकल्पित कार्यक्रमानुसार ४ एप्रिल रोजी 'माहीमवर विमान हल्ला' झाला.

'प्रारंभ पाच' ह्या नावाने मुंबईच्या नागरीक संरक्षण सेवेच्या 'एफ्' विभागाने लायन क्लब ऑफ माहीमच्या सहकार्याने माहीम स्टेशनसमोरच्या मिया महमद छोटानी रोडवरील माहीम पारशी असोसिएशन जिमखाना ग्राऊंड व सभोवतालच्या नरियलवाला बिल्डिंग, माहीम मॅन्शन, पिंक रोझ, गार्डन व्ह्यू व सिलव्हरटोन ह्या इमारतीच्या परिसरात हा हल्ला आयोजित केला होता. योगायोगाने भारत सरकारच्या नागरीक संरक्षण सेवा संचलनाचे प्रमुख लेफ्टनंट जनरल मोतीसागर ह्यांचा मुक्काम त्या दिवशी इतर कामानिमित्त मुंबईतच असल्याने त्यांच्या सन्मान्य उपस्थितीत हे प्रात्यक्षिक झाले.

बरोबर पावणेसात वाजता सन्माननीय पाहुणे कार्यक्रमाच्या ठिकाणी हजर झाले. डिस्ट्रिक्ट गव्हर्नर लायन मेजर पोदार येऊ न शकल्यामुळे लायन शफी ठाणावाला ह्यांच्या अध्यक्षतेखाली लायन क्लबच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमास सुरुवात झाली. 'एफ' विभागाचे अधिकारी श्री. एच्. आर्. अधिकारी ह्यांच्या प्रास्ताविक भाषणात कार्यक्रमाचा हेतु स्पष्ट झाला. त्यानंतर लायन कैलास जैन, ब्रिगेडियर देऊस्कर, लेफ्टनंट जनरल मोतीसागर ह्यांची आटोपशीर भाषणे झाली. लायन आय्. एम्. चोक्सी व श्री. अधिकारी ह्यांची आभारवजा भाषणे संपत नाही तोच बरोबर सात वीसला ब्लॅक आऊट झाले व हवाई हल्ल्याची सूचना देणाऱ्या सायरनचा आवाज ऐकू येऊ लागला. आजूबाजूच्या इमारतीतल्या लोकांनी सुद्धा स्वतःचश घरचे दिवे विझवून कार्यक्रमाच्या वातावरणनिर्मितीला हातभार लावला.

एव्हाना परिसरात चांगलाच काळोख पडला होता. विमानांच्या येण्याचा आवाज कानी पडताक्षणीच अभावितपणे सारा जमाव आकाशाकडे पाहू लागला. आवाजाच्या

रूपाने हवाई हल्ला करणारी विमाने आली व गेली. पाठोपाठ बॉम्बस् फुटल्याचे आवाज वातावरणात निनादू लागले. जिमखाना ग्राऊंडवरच्या आगीचा धूर आसमंतात पसरू लागला.

तेवढ्यात विमाने गेल्याची जाणीव देणारा सायरन होऊ लागला. दिवे लागले.

ध्वनिक्षेपकावरून श्री. शेख 'हवाई हल्ल्यामुळे झालेले परिसराचे वर्णन' करू लागले होते. 'बॉम्बिंग'मुळे माहीम मॅन्शनच्या वरच्या भागाला 'आग लागली होती.' वरच्या मजल्यावर काही लोक संकटात सापडले होते.

नरियलवाला बिल्डिंगला आग लागली होती. वरचा मजला व गच्चीवर काही लोक अडकले होते. गार्डन व्ह्यू बिल्डिंगचीसुद्धा तशीच हालत झाली होती.

पिंक रोझचा काही भाग 'कोसळला' होता व काही लोक वरच्या मजल्यावर अडकले होते.

सिल्व्हरटोनचा 'जिना कोसळला' होता. वरच्या मजल्यावर काही लोक अडकले होते.

एव्हाना नागरिक संरक्षण सेवेचे स्वयंसेवक घटना-स्थळी पोहचून आपल्या कामाला सुद्धा लागले होते. पोलिसांनी वाहतूक नियंत्रणाचे काम हाती घेतले होते. होमगार्डस्चे लोक घटनास्थळी दाखल झाले होते. तेवढ्यात बॉम्बे फायर ब्रिगेडची मोटर येऊन थडकली. पाठोपाठ सेंट जॉन ॲम्ब्युलन्सची गाडी.

नरियलवाला, माहीम मॅन्शन, पिंक रोझ, गार्डन व्ह्यू व सिल्व्हर टोन ह्या सर्वच इमारतींचे या ना त्या प्रकारे नुकसान झालेले होते. सर्वांच्या गच्च्यांवर किंवा वरच्या मजल्यावर कुणी ना कुणी जखमी वा बेशुद्ध व्यक्ती अडकून पडल्या होत्या. त्यांना मदतीची नितांत गरज होती.

नागरिक संरक्षण सेवेच्या शिस्तबद्ध व योजनासुसूत्र कार्यपद्धतीप्रमाणे कामाची विभागणी झालेली दिसली. कारण प्रत्येक इमारतीशी झालेल्या नुकसानीच्या स्वरूपाप्रमाणे होमगार्डस्, बॉम्बे फायर ब्रिगेड, मोबाईल सिव्हील इमर्जन्सी कॉलम व नागरिक संरक्षण सेवादलाचे स्वयंसेवक परिस्थिती आटोक्यात आणण्याच्या प्रयत्नात गुंतलेले दिसत होते.

इन्सीडन्ट कंट्रोल ऑफिसर श्री. जी. एस्. पेटकर आपल्या जीपमधून परिसरातल्या विविध कार्यकेंद्रांना बिनतारी संपर्काने परिस्थिती निवेदन करीत होते तर निवेदक श्री. शेख आपल्या उर्दूप्रवण ओघवत्या शैलीने हिंदीतून धावते समालोचन करीत होते. समालोचनामुळे प्रेक्षकांना त्यांना दिसत असलेल्या विविध प्रात्यक्षिकांबद्दल सविस्तर माहिती कळत होती.

माहीम मॅन्शनच्या वरच्या मजल्यावरून ब्रिज पद्धतीने व स्ट्रेचर पद्धतीने दोन जखमींना खाली उतरवण्यात आले.

नरियलवाला बिल्डिंगमधून बॉम्बे फायर ब्रिगेडने दोन जखमींना टेबल टर्निंग

लॅडर पद्धतीने खाली उतरवले तर दोघांना फायरमन्स लिफ्ट पद्धतीने.

पिंक रोझला लागलेली आग पाहता पाहता आटोक्यात आणली गेली.

सिल्व्हरटोनमधील अडकून पडलेल्या जखमींना मोबाईल सिव्हिल इमर्जन्सी कॉलमच्या स्वयंसेवकांनी वूडन एक्सटेन्शन रेस्क्यू पद्धतीने खाली उतरवले.

अवघ्या अर्ध्या तासात संपूर्ण परिस्थिती आटोक्यात आली. जखमी लोकांपैकी ज्यांना फक्त फर्स्टएडचीच जरुरी होती त्यांच्यावर कनोसा स्कूलमधील केंद्रात उपचार करण्यात आले तर इतरांना ॲम्ब्युलन्सने जवळच्या नॅशनल हॉस्पिटलमध्ये नेण्यात आले.

अशा प्रकारे नागरिक संरक्षक सेवेच्या ' माहीमवरील विमानहल्ल्या 'नंतरच्या प्रात्यक्षिकाची सांगता झाली. ह्याआधी अशा प्रकारची चार प्रात्यक्षिके नपू गार्डन (माटुंगा), रेनॉल्ड ग्राऊंड (बॉम्बे सेंट्रल), चेंबूर व अंधेरी येथे करण्यात आली होती. म्हणून हा ' प्रारंभ पाच ' होता.

शेवटी काही संबधित विषयावरची होमगार्डस् व सिव्हील डिफेन्सच्या कार्याची महती सांगणारी वार्ताचित्रे दाखविण्यात आली. ह्याच उद्देशाने मैदानावर एक प्रदर्शनदेखील भरविण्यात आले होते.

लायन क्लबच्या व ' एफ् ' विभागाच्या कार्यकर्त्यांनी ही गोष्ट खूपच मनावर घेतलेली दिसत होती. ही जाणीव पदोपदी होत होती. कार्यक्रमाची व्यवस्थित जाहिरात करण्यात आलेली होती. लेफ्टनंट जनरल मोतीसागर ह्यांच्या उपस्थितीने कार्यक्रमाला वेगळेच महत्त्व प्राप्त झाले होते.

अशाच प्रकारची प्रात्यक्षिके राज्यस्तरावर आयोजित करण्याचा सरकारचा मानस दिसतो. त्या दृष्टीने विचार करता काही गोष्टींचा विचार संबंधित अधिकाऱ्यांमार्फत व्हावा असे वाटते.

प्रदर्शनाचे स्वरूप अधिक भरीव असावे. ते अधिक आकर्षक व माहितीपूर्ण असावे. माहिती देणाऱ्या व्यक्तीने स्वतः पुढाकार घेऊन माहिती दिल्यास प्रेक्षकांचे औत्सुक्य जागृत होण्यास मदत होईल व परिणामी उद्दिष्ट जास्त प्रमाणात साध्य होण्याची संभाव्यता जमेस धरता येईल.

संकटात सापडलेल्या व जखमी व्यक्तींची सुखरूप सोडवणूक करण्याच्या जवळ जवळ सर्वच पद्धतींचा प्रात्यक्षिकाच्या वेळी अवलंब केला जातो. त्याचप्रमाणे तीन-चार इमारती निवडून विभागणी केली जाते. सोय बघितली जाते. पण त्यामुळे होते काय ? ह्या सर्व पद्धती एकाच वेळी तीन-चार ठिकाणी एकसमयावच्छेदेकरून कार्यान्वित होत असल्यामुळे प्रेक्षकांना सर्व पाहता येत नाही. कारण वाहतुकीचे सर्व मार्ग पोलीसनियंत्रणाखाली असल्यामुळे तशी मोकळीक मिळत नाही.

एक तर एखाद्या मैदानासमोरील एकाच इमारतीत एकामागून एक पद्धतीचे प्रात्यक्षिक व्हावे व प्रेक्षकांची व्यवस्था मैदानात करण्यात यावी. ह्यामुळे प्रेक्षकांना

विविध पद्धतींची माहिती मिळेल. किंवा दोन-तीन कोपऱ्यावरच्या इमारतीची निवड व्हावी पण एकानंतर एक अशी विविध पद्धतींची प्रात्यक्षिके करण्यात यावीत ह्यामुळे सर्वांगीण परिचय होईल.

ध्वनिक्षेपकाची अधिक व्यापक सोय असावी. प्रात्यक्षिक चालू असताना प्रखर प्रकाशस्रोताचा वापर केला गेल्यास दृश्य परिणाम अधिक उत्कट होईल.

कार्यक्रमाच्या शेवटी श्री. अधिकारी ह्यांनी प्रेक्षकांचे आभार मानताना झालेल्या कार्यक्रमाचा प्रेक्षकांनी फक्त मनोरंजनाचाच कार्यक्रम असा व एवढाच अर्थ न लावता कार्यक्रमामागची भूमिका विचारात घ्यावी व नागरिक संरक्षण सेवेच्या घतीने वेळोवेळी होणाऱ्या विविध अभ्यासक्रमाचा फायदा घेऊन स्वतःला प्रशिक्षित स्वयंसेवक करावे असे आवाहन केले. साडेसहा लाख लोकवस्तीच्या महालक्ष्मी ते धारावी विभागात किमान चार हजार नागरिक संरक्षण सेवादलाचे स्वयंसेवक असायला हवेत तरच आग वा घर कोसळणे वगैरे आपतप्रसंगी वा युद्धजन्य काळात त्या विभागात नागरी संरक्षणाचे आदर्श कार्य होऊ शकेल.

'प्रारंभ पाच'ने प्रेरणा घेऊन किती जण मनमाला टँक रोडवरील सिव्हिल डिफेन्सच्या कार्यालयात जाऊन स्वतःचे नाव स्वयंसेवक म्हणून नोंदवतात ह्यावरच ह्याचे यश अवलंबून असले तरी हा एवढा एकच निकष नाही. जनजागृतीचे कार्य असेच चालत असते. निदान चालवावे लागते. कारण ते परिस्थिती सापेक्ष असते.

□ □ □

## साप्ताहिक माणूस : वर्गणीचे दर

| | | | |
|---|---|---|---|
| पाच वर्षे : | १००–०० | वार्षिक : | २५–०० |
| तीन वर्षे : | ६०–०० | सहामाही : | १५–०० |
| दोन वर्षे : | ४५–०० | परदेशी जलमार्गे वार्षिक : | ४५–०० |


□ २२ ऑगस्ट १९७० नंतरच्या ज्या वर्गणीदारांनी रुपये तीस वार्षिक वर्गणी पाठविली आहे त्यांची वर्गणीची मुदत तीन महिन्यांनी वाढवून घतलेली असून त्याप्रमाणे नोंदवहीत फेरबदल करण्याचे काम चालू आहे.

□ नवीन वर्गणीची रक्कम शक्यतो ड्राफ्ट वा म. ऑ. ने पाठवावी. कार्यालयात रोख भरणा करण्यासही हरकत नाही. चेकनेच रक्कम पाठविणे सोयीचे वाटल्यास बँक कमिशन एक रूपया अधिक हिशोबी धरावे.

□ चेक, ड्राफ्ट 'साप्ताहिक माणूस' या नावावर पाठवावा.

□ पत्रव्यवहार करताना आपला वर्गणीदार क्रमांक शक्यतो कळवावा.

# अधिक काय सांगू?



ते प्रिंट बघायचे...
नंतर माझ्याकडे बघायचे...!!
परत प्रिंट...
पण चेहऱ्यावर आनंद नव्हता
डोळ्यातून अश्रू येत होते...
अश्रू ? का रक्त ?

**अनिल बळेल**

अधिक काय सांगू ! आणखीन काय सांगू ? ह्याच्यापेक्षा जास्त काय सांगू ?

स्त्री आणि पुरुष, पुरुष आणि स्त्री हे एकमेकात बांधलेले असतात. त्यांच्यात जे काही असतं ते फक्त त्यांच्यात असतं. पण ते त्या दोघात रहात नाही. कोणी राहूही देत नाही. ऐकायचं आहे ते सारं ? लग्नाच्या आधीचे-नंतरचे असे वेगवेगळे सांगू शकेलही पण त्यातून काही वेगळेच अर्थ निर्माण होतील, गैरसमज होतील, प्रश्न-चिन्ह उभे राहतील. तुमचे, मुलाचे, समाजाचे.

हे खरं आहे की लग्नाआधी मी चंदनकडे ओढली गेले होते. माझ्या मनात त्याची प्रतिमा उमटली होती. मी त्याला भेटत होते. अन् त्याची मुग्धता मला जास्त जास्तच मुग्ध करीत होती. पण त्याचा ह्याच्याशी काय संबंध ? काहीच नाही. तो आता कुठे आहे, कसा आहे, आहे की नाही, काहीच माहिती नाही. दीड तपापूर्वीची ती गोष्ट.

असं का ? तो मला साधा आठवूही नये ? आठवला. अन् आठवला एवढचं. तश्या अर्थी आता तो माझ्या मनात थोडाच आहे ? अन् तश्या अर्थी आठवावाही का ? माझे पती काय वाईट होते, त्यांचं माझ्यावर प्रेम नव्हतं की त्यांनी मला

कधी आपलंसं केलं नाही ? ह्यातलं काहीच नाही. त्यांचं माझ्यावर किती प्रेम होतं हे तेच सांगू शकले असते–असते तर !

अरे, तुम्ही एवढ्या तेवढ्यावरून काय मत बनवता ? असल्या गोष्टीत कसला आलाय धागा सापडायला ? लग्नांआधीचं ते हळवं प्रेम, पती-पत्नीचा नैमित्तिक कलह, शेजाऱ्यांशी भांडण, मुलांचा त्रास ह्या साऱ्या मामुली गोष्टी झाल्यात. ह्यावरून तुम्हाला काय कळणार ?

त्यांच्या बरोबरीची शेवटची रात्र ! त्यावरून तर्क लढवता ? पण त्या शेवटच्या रात्रीत तसं काहीच झालं नव्हतं. तसं म्हणजे विशेष असं. जे झालं ते नेहमीचंच ? कोणाही विवाहित स्त्री-पुरुषाची रात्र जशी जावी तशीच तीही गेली होती.

मी नाराज नव्हते. ते रागावलेले नव्हते. आम्ही अशावेळी कधीच 'डिसमूड' राहिलेलो नव्हतो. एकमेकांना समजून घेतच आमच्या रात्री–न् दिवसही गेलेले ! एकमेकांशिवाय आमच्या जीवनात दुसरं होतं तरी कोण ?

छोटया ! तो आमच्या पलिकडेच एका खाटेवर झोपलेला असे. हो ! एकुलती एकच ऐसपैस खोली ! काय करणार !

खरं आहे ! एका नियतकालिकात ते नोकरीस होते. पण 'होते' अं ? हो, फोटोग्राफर म्हणूनच ! त्यांनी काही झालं तरी फोटोग्राफी सोडली नाही. त्यांना खात्री होती की, एक ना एक दिवस ह्या कलेत आपण नाव कमावू.

अंऽहं ! कधीच नाही. त्यांनी कधीच मॉडेल आणली नाही. माझा अडकाव होता असं नाही तर त्यांच्या लेखी दुनियेतली सर्वांत सुंदर स्त्री मीच होते म्हणून !

हसतायं ! हसा ! तुम्हाला मी अगदीच साधी वाटते ना ? वाटायचीच ! पण त्यांच्या दृष्टीने हेच सौंदर्य होतं. कॅमेरा आणि मी ! बस्स ! त्यांच्या हिशोबी आम्हा दोघांनाच स्थान होतं. अन् एक छोटया ! मी जर कधी त्यांच्या छातीवर डोकं टेकून पडले ना तर माझ्या गालावरून त्यांची लांबसडक बोट अशी नाचायची की चांगलं चित्र टिपल्यावर आनंदाने कॅमेऱ्यावर नाचवली जात तशी ! अन् मग ते माझा हात आपल्या हातात घेत–माझ्या बोटाचो पेर अशी दाबली जात की शटरच दाबताहेत. हेच होते आमच्या प्रणयातले उत्कट क्षण !

सुरुवातीच्या दिवसात हे माझ्याकडे एक डोळा बारीक करून बघायचे ना तेव्हा गुदगुल्या व्हायच्या. गुदगुल्या असायच्या त्या 'त्या' डोळ्याच्या. अधून-मधून त्याचा रागही यायचा. चीड यायची. पुढे पुढे ती सवय झाली अन् जेव्हा ते डोळा असा बारीक करून बघायचे ना तेव्हा त्यांना फक्त मीच दिसायचे. फक्त मीच !

काय सांगत बसलेय मी ! पण सांगण्यासारखे दुसरे आहे तरी काय ! पकडून ठेवावेसे वाटावे असे हे एवढेच क्षण !

मी हे असंच सांगत जाणार–

नियतकालिकात काम करण्यापूर्वी सरकारी ब्युरोत होते. फोटोग्राफरच. मी सांगितलं ना, त्यांनी कधी फोटोग्राफी सोडली नाही.

सरकारी ब्युरोत पाच वर्षे होते.

तितकीच वर्षे नियतकालिकेत.

अन दोन एक वर्षे असेच इकडे-तिकडे.

ते एके ठिकाणी टिकलेच नाहीत. टिकलेच नसते. ते त्यांच्या स्वभावातच नव्हते.

लग्नाच्या सुरुवातीच्या दिवसात ते खूप खूष होते. किती फोटो येत होते तेव्हा ! विविध ! माझे तर घेत होतेच पण कामानिमित्ताने कवायतीचे, उद्घाटनाचे, समेलनाचे, यात्रेचेजत्रेचे, सामान्यांचे, निसर्गाचे, आगळ्या प्रसंगाचे, कधीनव्हत घडणाऱ्या घटनांचे ! मोठ्या समारंभातला 'बारीक क्षण' टिपावा तो त्यांनीच. सतरा फोटोग्राफर जमले तर उरलेल्या सोळांपेक्षा ह्यांचा फोटो वेगळा न् चांगला निघालेला असायचाचं असायचा. अन् ज्याचा असा फोटो टिपलेला असायचा त्याच्या नजरेत जर तो पडला अन् तो खरोखरच रसिक कलाप्रेमी असला तर ह्यांना अवर्जून बोलवायचा, खूप कौतुक करायचा, प्रोत्साहन द्यायचा, मदतीचा हात पुढे करायचा. ह्यांनी अशी मदत कधीच घेतली नाही. पण कोणी असे कौतुक केले की ह्यांना खूप कौतुक वाटायचे–आपलेच ? आपल्यावर फिदा असायचे. अन् मग गालातल्या गालात हसत चुटकी वाजवत त्या कौतुक झालेल्या फोटोकडे तास न् तास बघत बसलेले असायचे.

हेच दिवस टिकले असते तर ! पुनश्च असते तर ! ह्या जर–तरनेच आशा गुंफल्या जातात. पण त्यांचा कोष तयार होत नाही. 'जर तर'चे अर्थ शब्द-कोषातच ठेवावे लागतात अन् त्या न जमलेल्या आशेच्या कोषातून माणसाला बाहेर निघावे लागते. निराशेने. नाहीतर ह्या सुरळीत गाड्याला खीळ का बसावी ? छायाचित्रात जीवनाची छबी का सापडू नये ? जीवन न–जीवन का वाटू लागावे ?

प्रथमच ! प्रथमच त्यांच्या डोळ्यात लाली दिसली.

एक सत्य पण सत्तारूढ पक्षाला बाधक असे चित्र त्यांनी टिपले होते–छापावं ह्या अट्टाहासाने. ते छापल तर गेलं नाहीच पण बोलणी मात्र खावी लागली होती. त्यांनी आपले म्हणणे मागे घेतले नाही. नियतकालिकेच्या संपादकापुढे राजीनामा ठेवला.

डोळ्यातली लाली–रक्त–ते त्या सत्याचं होतं.

त्याच वेळेस छोट्याचा जन्म झाला.

परिस्थिती कठीण होती. हे त्रस्त होते पण चिडाचीड कधी केली नाही.

दारूच्या थेंबाला शिवले नाहीत.

कधी बरोबरचा नाद लागला नाही.

शिवीगाळ केली नाही.

एका जाहीरात कंपनीत थोडेफार पैसे मिळायचेही ! पण थोडेफारच ?

हं ! तेव्हाच मला नोकरी धरावी लागली–शाळेत.

माझ्या गैरहजेरीत छोटयाला तेच सांभाळायचे. हळूहळू त्यांनी घरातच आडोशाला फोटोग्राफी सुरू केली होती. छोटयाचे किती फोटो घेतले. मस्त ! गोड ! ते सारे छापूनही आले पण त्याचे असे किती पैसे मिळाणार ! सारे माझ्या नोकरीवरच चालवावे लागत होते.

हे कधी कधी शाळेत यायचे पण हेडमास्तरांना ते पटले नाही. शाळा मुलींची होती ना ! मी त्यांना तसं सांगितलं. सांगावचं लागलं ! वाईट वाटलं, पण काय करणार ! नाही ! ह्याने काही झाले नाही ! नवीन असल्याने मला मुख्याध्यापकांकडे वारंवार जावे लागायचे–लेसनसाठी–नाही त्याचेही काही नाही. उगाच गैरसमज करून घेऊ नका.

जाहीरात कंपनीतल्या एका धेंडाशी ह्यांची मैत्री जमू लागली होती. त्याचं आमच्याकडं येणं-जाणं वाढू लागलं होतं. प्रत्येक पुरुष दुसऱ्या स्त्रीत आपल्याला बघत असतो. आरशात बघावे तसे ! तो तसाच होता. पण मी त्याचे प्रतिबिंब फोडून टाकले. त्याची न् हेडमास्तरांची ओळख होती. त्याने त्यांचे कान फुंकले. मी नोकरी सोडली. सोडावी लागली. पण त्या कारणाने नव्हे त्याचे कारण वेगळेच घडले.

त्या दिवशी रविवार होता. छोटया शेजारी गेला होता. त्यांना लहर आली. मूड आला. प्रेमाने माझा हात धरून बोटं दाबली–शटर प्रमाणे.


# शिलंगणाचं सोनं

## आवृत्ती : तिसरी

ब. मो. पुरंदरे

किंमत : तीन रुपये

राजहंस प्रकाशन

वस्त्र दूर झाले. मी लाजले. संकोचले. रविवार-दिवसाची वेळ. पण त्यांना मूड आला होता. खूप दिवसानी मला तऱ्हेतऱ्हेच्या पोझेस दिल्या. त्या कॅमेऱ्यात त्यांचा एक डोळा बारीक झाला होता. ते फक्त मला बघत होते. माझ्यात बघत होते. माझ्यात म्हणजे आपल्यातच मश्गुल ाले होते. तन्मय झाले होते. मग मीही हू का चू केलं नाही. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे वागले—अगदी ते सांगतील तसं.

जेवताना म्हणाले होते, "पैसे पाहिजेत ग पैसे पाहिजेत." स्वप्न बोलून दाखवले. स्टुडिओ काढायचा. कॅमेरा घ्यायचा. कोणाजवळ नसेल असा सारे सारे टिपता येणारा—केव्हाही. कुठेही, कसेही ! हे स्वप्न होते ते सत्याला कसे उतरावे ?, माझा पगार एवढासा...

संध्याकाळी डेव्हलपिंग करून प्रिंट काढली. मी बघत होते. मी चुलीपाशी बसले होते. ते प्रिंट बघायचे. माझ्याकडे बघायचे. मला न्याहाळायचे-वाकडी मान करून प्रिंट बघायचे. चेहऱ्यावर फोटोचा आनंद नव्हता. व्याकुळता होती. खिन्नता होती. अन् त्यांच्या डोळ्यातून एक थेंब टपकला.-अश्रू ? रक्त होते ते रक्त !

एका साप्ताहिकात शेवटच्या पानावर माझा फोटो झळकला-काव्यपंक्तीसह ! रविवारी काढलेल्यापैकी !

संबंधीतात चर्चा सुरू झाली. होता होता हेडमास्तरांच्या कानावर गोष्ट गेली. मला बोलावणे आले. एका मुलींच्या शाळेत अशी शिक्षिका कशी चालेल ! आदर्श ? माझा पगार चुकता केला गेला.

डोळ्यातलं रक्त अजून थांबलं नव्हतं. ! ठिपकत होतं ते काय फक्त रक्त ? का वेदना ? का परिस्थिती ? स्वप्न ?...सत्य ?...का...? काय...?

नव्हते ! तेव्हा मी घरात नव्हते !


छोट्या ? तोही नव्हता.

मी हिंडत होते नोकरीच्या शोधात. नोकरी सुटल्याच्या दुसऱ्या दिवशीची ही गोष्ट. छोट्या शेजाऱ्यांकडे खेळत होता ..न् इकडे खेळ आटोपला होता—त्याच वेळेस ! त्याच वेळेस ! घराच्या छताला चादर बांधली गेली अन्...मी आले तेव्हा सारं आटोपलं होत. पोलीस आले होते. शेजारी गोळा झाले होते....त्यांचा निष्प्राण देह...ठिपकणारे रक्त बंद होऊन उघडा पडलेला डोळा...?...

बस्स ! एवढचं ! इतकचं ! अधिक काय सांगू ?

□ □ □

# व्होर्कुटाचे काळ पाणी!



व्होर्कुटाच्या रेल्वे सायडिंगवर मी उभा होतो.–रशियातला तो कँप–प्रत्यक्ष कणा-कणाने मृत्यूचा अनुभव देणारा. रक्ताच्या थेंबागणिक वट्ट कोळसे वसूल करणारा ! व्होर्कुटाचा तो कँप म्हणजे लहानमोठ्या कोळशाच्या खाणींचा परिसर होता. टॉमी गन्स घेतलेल्या एम्. व्ही. डीं. चा सख्त पहारा. एक ऑफिसर मला प्रश्न विचारत होता–

" राष्ट्रीयत्व ?"

" अमेरिकन " –मी उत्तरलो. Amerikanetz तेवढाच एक रशियन शब्द मला त्यावेळी ठाऊक होता ! त्याचा परिणाम विजेसारखा झाला. गन्स घेतलेले गार्डही

एक सनसनाटी बातमी पसरवतच
१९५५ च्या जानेवारीत
जॉन नोबलने न्यूयॉर्कच्या
विमानतळावर पाऊल ठेवले.
रशियात जवळजवळ दहावर्षे
व्होर्कुटाच्या खाणीवर
विनाचौकशी, कसलाही अपराध नसताना
त्याला डांबून ठेवले होते.
व्होर्कुटाच्या खाणीवर त्याने
दहा हजार कैद्यांचा अभूतपूर्व
उठाव घडवून आणला होता.

त्या उठावाची ही कथा

---

**जिप्सी मधुकान्त**

---

माझ्याकडे विश्वास बसला नाही, अशा नजरेने पाहू लागले. एकाने हात उचलला नि असा खुणावला–जणू त्याला म्हणायचे होते : कुणी सांगावे, काहीही घडू शकेल...

माझ्या अंगावरच्या कपडयांची जीर्ण लक्तरे झालेली. डोके तासलेले ! डेट्राईट-मधील माझ्या घरापासून सात हजार मैल दूर होतो. पंधरा वर्षांची सक्तमजुरीची सजा मला नुकतीच फर्मावण्यात आली होती. सहा आठवडे इकडून तिकडे फर-फटत माझी उचलबांगडी चालवली होती. रशियातली ती सफर ' इन्टूरिस्ट 'ने मात्र आयोजित केलेली नव्हती ! पण त्यामागे तत्कालीन जबरदस्त एम. व्ही. डी चा दंडा होता.

मी इकडे तिकडे नजर टाकली. टंड्राच्या ओसाड प्रदेशाव्यतिरिक्त काही दिसत नव्हते. बर्फाने सारेच झाकलेले. एक कळकट वातावरण आसमंत कोंदून टाकत होते. सप्टेंबरची १९५० सालातली ती १६ तारीख होती !–नंतरच्या काळात मला त्याचा अर्थ प्रत्ययास येणार होता–श्वेत मृत्यूचे नंदनवन असे या जागेला रशियन का म्हणत.. ...कोळशाचे ढिगारे उपसत तो श्वेत मृत्यू क्षणोक्षणी जगायचा होता.

आर्क्टिक सागरापासून १२५ मैल दूर युरेशियाच्या पूर्वेला हे व्होर्कुटा होते. जगातले एक भयानक ठिकाण. निर्घृण ? वर्षातले दहा महिने बर्फाने झाकलेले. तपमान शून्याच्याही खाली ९० अंश जाणारे ! जानेवारी-फेब्रुवारीत तर सूर्य कधीच उगवत नव्हता आणि जवळजवळ ४ लक्ष नको असलेल्या अभाग्यांकडून ' लाल ' कोळशाच्या ११२ कोळसा ओढून-खणून काढायचा.

मीही त्यातला एक–1 E 241 नंबरचा ! सुती जाकिटात, बर्फ गोठलेल्या अवस्थेत काम करणार होतो.

एकूण सारंच संपलेलं वाटत होतं. भयानक निराशा काळवंडली होती.

## रशियनांच्या ताब्यात

१९४५ च्या मे मध्ये रशियनांशी आमची पहिल्याने गाठ पडली. आताच्या पूर्व जर्मनीत. युद्धापूर्वीच माझे वडील कुटुंबियांना घेऊन औषधोपचारासाठी युरोपात गेले होते. मीही त्यांच्याबरोबर होतो. अमेरिकेने युद्धात भाग घेतला, त्या काळात आम्ही ड्रेस्डेनला होतो. नाझींची नजर आमच्याकडे होती. आम्ही अडकून पडलो. नाझींचा पराभव झाल्यावर रशियनांनी ड्रेस्डेनचा कबजा घेतला. डी डेला आम्ही घरावर अमेरिकन निशाण फडकवले. साऱ्या परिसरातून ते दिसत होते. आमचे वेगळे अस्तित्व त्या हलकल्लोळात दर्शविण्यासाठी बचावाचा मार्ग होता. नाझींनी अटकवलेले अमेरिकन्स अधिकारी आमच्याकडे उतरत. अमेरिकेची ७६ वी डिव्हिजन ३५ मैल लांब तळ देऊन होती. त्यांच्याही मोटारी या अधिकाऱ्यांना नेण्यासाठी येत. पण रशियनांच्या डोळ्यात ही गोष्ट सलू लागली. पण उंबरठ्यानजीक अमेरिकन सैन्य असल्याने आम्हाला भय नव्हते. १९४६ च्या सुरुवातीला आम्हाला विमानात कसल्याही परिस्थितीत जागा मिळणार होती. परतायला. तोवर मुलकी वाहतुकीसाठी सोय झाली असती आणि रशियन काही कुरापत काढू शकत नव्हते.

पण अंदाज चुकला !

५ जुलैला एक एम. व्ही डी कॅप्टन पाच सैनिकांना आपल्या सोबत घेऊन आमच्या दारात येऊन ठाकला. माझ्याकडे तरतरा चालत येऊन तो गरजला–' तुला अटक करत आहे !'

' कॅप्टन...' मी त्याला प्रतिकार करीत म्हटले, ' आमच्यावर कसलेच वॉरंट नाही. आंतरराष्ट्रीय संकेतानुसार तुम्हाला काही अधिकार नाहीत. ' मी त्याला

माझा अमेरिकन पासपोर्ट दाखवला.

'अं, ही बाब तशी किरकोळच आहे, मि. नोबल. तुमचे कागदपत्र आम्हाला पहायचे आहेत.' त्याने म्हटले.

मी काही बोलण्याआधीच त्याच्याबरोबरच्या दोन सैनिकांनी मला बुकलून बाहेरच्या लाल जीपमध्ये टाकले.

ठाण्यावर नेऊन त्यांनी माझा पासपोर्ट 'अभ्यासायचा' उपचार सुरू केला. तपास चालू होता. मी पुनः पुन्हा निषेधाने किंचाळत होतो. आंतरराष्ट्रीय नियमांचा भंग होत आहे म्हणून दरडावत होतो, पण ढिम्म !

'आमच्या प्रमुखांना, हे जे काय चालवले आहे, त्याची माहिती आहे. काय करायचं ते ते पाहून घेतील. तीन दिवसात तुमची सुटका होईल. फुका कायदा सांगू नका'–मघाच्या कॅप्टनने साजुकपणे सांगितले.

तीन दिवस ?

ड्रेस्डेनच्या त्या ठाण्यावरच्या दगडी तुरुंगातल्या भयाण एकांत कोठडीतून मला ७० दिवसानंतर बाहेर काढण्यात आले. प्रश्न विचारायलाच सुरुवात सव्वा वर्षा-नंतर झाली ! पाच वर्षांनंतर मला, कसलाही आरोप न करता, सजा देण्यात आली ! !

पहिल्या प्रश्नोत्तरीच्या झडीनंतर मला कशासाठी अडकवून ठेवले, याचा सुगावा लागला.

'मी अमेरिकन नागरिक आहे.'–मी म्हटले. 'तुम्ही मला सव्वा वर्ष विना-चौकशी डांबून ठेवलेत. प. जर्मनीतल्या अमेरिकन ठाण्याकडे तुम्ही विचारणा करा'-मी पुनः पुन्हा ठासून सांगत होतो.

त्या एमव्हीडी अधिकाऱ्याने रागाने मजकडे पाहिले. तो प्रश्न विचारत होता-'तुझा जन्म कुठला ?' 'सोविएत प्रदेशात तू अमेरिकन निशाण का लावलेस ?' 'तुझ्या घरात अमेरिकन ऑफिसर्सचा राबता कशासाठी होता ?' आणि असेच आणखी प्रश्न–त्याची फैर संपल्यावर मी विचारले, 'माझी सुटका कधी करणार ?'

प्रश्न विचारणाऱ्या एम. व्ही डीने हाताने मला नेण्याचा हुकूम केला !

## नाझींची आवृत्ती

मग मला कल्पना आली. अमेरिकन हेरखात्याचा अड्डा माझ्या घरी आहे, या हेतूने त्यांनी मला अडकवले होते. पण त्या वेळचे 'दोस्तां' चे धोरण लक्षात घेता, माझ्यावर आरोप उघडपणे त्यांना परवडणारे नव्हते. कालांतराने मला कळले की अमेरिकन सरकारला माझ्या अटकेचा सुगावा लागला होता. माझ्या भावाने नि आईने त्यांना सांगितले होते–डेट्राईटला परतल्यावर. १९४५ ते ५० पर्यंत स्टेट डिपार्टमेंटने जर्मनीतल्या सोव्हिएत अधिकाऱ्यांकडे वारंवार चौकशी केली होती.

पण त्यांनी दरवेळी काहीच माहिती नसल्याचे सांगितले ! या केसची दखलसुद्धा घेतली नाही.

नाझींच्याच कॉन्सेन्ट्रेशन कॅंपची लाल आवृत्ती पुढे सुरू झाली. त्या काळात बुशेन-वाल्डच्या कुप्रसिद्ध कॅंपवर माझी रवानगी झाली. रोज सत्तरपेक्षा अधिक कैदी तळतळून तडफडत मरत. मी कसा बचावलो हे आश्चर्यच !

सगळ्यात मला धास्ती भरली ती रशियातल्या कॅंपवर नेण्याची ! येथे आहे तोच जगण्याची काही आशा होती...नाना भीषणतर अनुभव कानी येत होते. धड-धाकट लोकांना लाल पाणी चाखायला नेणार अशी भुमका होती.

ती खरी ठरली.

धट्टेकट्टे (?) दिसणारे कैदी निवडून त्यांना बोटीवर चढवण्यात येऊ लागले ! माझ्या अमेरिकन पासपोर्टने काही जादू घडून येईल अशी धुगधुगती आशा अजूनही मला होती ! वायमारच्या तुरुंगात ८ ऑगस्ट ५० च्या दिवशी मला बोलावणे आले. नागरी वेशातला एक रशियन अधिकारी समोर होता. एका लांब टेबला-जवळ मला नेले.

दुभाष्या मुलीने मला एक कागद दिला. म्हटले–' मॉस्कोला खटला चालला, त्याचा हा कागद–' –' त्यान्वये १५ वर्षांची सजा फर्मावली आहे !'

क्षणभर माझ्याभोवतीचे वारेच त्या धक्क्याने उडून गेल्यासारखे मला झाले.

' कसला आरोप ?'–मी किंचाळलो. ' काय गुन्हा केलाय् मी ?'

' तुझी शिक्षा मॉस्कोने पक्की केली आहे. तुला जर काही कैफियत मांडायची असेल तर तुला कॅंपवर नेतील तेथे मांड...'

## व्होर्कुटाच्या लाल पाण्यावर

नऊ दिवस लोटले. नंतर एका खच्चून भरलेल्या कैद्यांच्या आगगाडीवर मला चढवले गेले.

व्होर्कुटाच्या लाल पाण्यावर–(बर्फावर !) गाडी निघाली होती.

व्होर्कुटाचा तो परिसर ६०० मैलांच्या खाणींनी व्यापलेला होता. प्रत्येक खाणी-भोवती दणकट काटेरी तारांचे उंच कुंपण. तीन नंबरच्या खाणीवर माझी भरती होती. साडेचार हजार कैदी तिथल्या कोळशाच्या बोगद्यात कामाला जुंपले होते.

गोठलेल्या जमिनीत फाटे गाडून सभोवार फळकुट ठोकलेली. लांबलचक आमची बरॅक होती. उबेसाठी राख पसरलेली.–पण साराच राडा होई ! थंडीपासून संरक्षण म्हणून मग चोहोबाजूंनी बर्फवृष्टी होऊन बरॅक ठेचली जाई चांगली. बर्फाच्या आवरणात. झोपायला हातभर रुंद फळकुटाचे शेल्फ ! तेवढेच. बाकी काही गरज नसते, हेही आम्ही मग विसरून गेलो. त्याला आम्ही ' बंक ' म्हणू. शेजारच्या बंकवर एक थोरला रशियन शेतकरी कैदी झोपे, तेव्हा आमचे खांदे भिडत. भरती वाढली तशी मग जमीन व्यापली गेली. खच्चुन भरलेले सांगाडे ! मला बंक होती, हे त्यातल्या त्यात नशिबाचे !

## एकटा अमेरिकन !

काही दिवस लोटले. त्यानंतर मी तिथल्या पहाऱ्याकडे बारकाईने पाहू लागलो. आमचा छबीना किमती होता ! बारा फूट उंच काटेरी तारेचे कुंपण. ठराविक अंतरावर टेहळणी टॉवर्स. त्यात मशीनगन्स घेतलेले संत्री. मुख्य कुंपणाच्या आत आणखी एक तीन फुटाचे कुंपण. मधे टॉवर्स. मधली पट्टी पक्क्या बंदोबस्ताची. रात्री प्रकाशझोत, तसेच अधारलेल्या दुपारीही. या पट्टीवर कोणीही आढळला तर गोळी घालण्याचा हुकूम होता. पुन्हा दिमतीला भुकेले कराल शिकारी कुत्रे !

कॅम्पवर हुकमत होती एमव्हीडीची. पण आतमध्ये राज्य होते–' ब्लॉन्तोई 'चे–निर्ढावलेल्या गुन्हेगारांचे. मॉस्को विभागातलेच ते होते. माझ्याच बरॅकमध्ये त्यांची संख्या आठ होती. आणि करायचे काय ?–तर मस्त झोपा काढायचे. कैद्यांच्या वस्तू पळवायचे. चाकूंना धार लावत बसायचे. आठवड्याआड एकतरी खून ही ' गुणी ' माणसं पाडायची ! झोपेत किंवा बर्फाच्या ढिगाऱ्यात खुपसून.

ते सगळेच भीषण होते.

पण एम व्ही डी आणि ब्लॉन्तोई यांच्यामध्ये एक करार झालेला होता. राजकीय कैद्यांना दहशत बसवण्यासाठी त्यांचा उपयोग व्हायचा. एकही अधिकारी या ब्लॉन्तोईना कामाला जुंपू शकत नव्हता. लाल पाण्यावरचे ते राजे होते ! क्रूर गुन्ह्यांबद्दल लहान वयापासून शिक्षा भोगत आलेले ते बेरके गुन्हेगार होते. टोळया करून लहानपासूनच सगळीकडे हिंडत. कम्युनिस्टांकडून पक्षाची दीक्षा घेत, पण राजनीतीशी त्यांना सोयरसुतक नव्हते. पाचव्या दशकातला हा काळ. त्यांचा ' स्तार्शी '–नेता, त्यांच्यावर कडक कंट्रोल ठेवून असे.

या सगळ्या कत्तलखान्यातून मी वचावलो याला एक कारण असावे–अवघ्या कॅम्पात मीच तेवढा ' अमेरिकन ' होतो !–प्रदर्शनातल्या वस्तूसारखा ! अनेक कैदी मोठ्या मुरबतीने मला वागवीत. अमेरिकेविरुद्ध कितीही गदारोळी प्रचार सुरू असला तरी त्या लोकांना अमेरिका म्हणजे एक नवलच होते–परीराज्यासारखे !

## कोळशाच्या बोगद्यात

आल्या दिवसापासूनच मी कोळशाच्या बोगद्यात जुंपला गेलो. तो हिवाळाही त्या वर्षी महाघोर कळीकाळच होता. सकाळी दोन तुकडे पोटात ढकलून आम्हाला खडी कतार करून त्या थंडीत रक्त गोठत असताना हजेरीसाठी उपस्थिती द्यावी लागे. मैलभर अंतरावर मला कामाला जावे लागे. आम्हा पन्नास लोकांवर दहा गार्ड असत. दोन शिकारी कुत्रे. खाण आणि कॅम्पमधल्या चाळीस फुटी वाटेवरून आमचे हे लटांबर निघे.

नोव्हेंबर उलटला की तेवढे अंतर काटायला आम्हाला तासाभरापेक्षा अधिक अवधी लागे. घट्ट-खोल वर्फातून तुडवत जाताना पार दमछाक व्हायची. दर आठवड्याला थर्मामीटरचा पारा आणखी एक पंचक खाली उतरायचा आणि हवा-

वरच्या स्वारीच्या जिद्द-झपाट्याने आम्हाला तेवढेसे अंतर कापावे लागे. बर्फाची वादळ सुंसाटत.

खाणीतल्या बोगद्यात रुळावरून दोन टनी कोळशाची ट्रक ढकलण्याचे काम माझ्याकडे होते. बर्फाचे थर फोडत पुढे ढकलणे मोठे कष्टाचे असे. माझा जोडीदार आदमी होता एक लॅटव्हियन. खाणाखुणांनी संकेत करून त्याने मला थोडक्यात त्या कामाची चाल सांगितली. कोळशातला जो काय वाया गेलेला भाग असे ते सारे वेस्टेज त्यात भरून गडगडत न्यायचे नि मग आमच्यापैकी दोघांना सुमारे फर्लांगभर अंतर ती ट्रक ओढत न्यावी लागे. मग आमच्या प्लॅटफॉर्मच्या खाली असलेल्या दुसऱ्या ट्रकमध्ये ती ओतायची.

दिवसाकाठी जवळपास ७० फेऱ्या व्हायच्या !

नंतरचे सुमारे १४ महिने मी असा—एक मानवी लोकोमोटिव्ह बनून गेलो होतो. खांद्याने रेटून मी ढकलत असे. कायमचाच तो भाग निळा होऊन गेला होता आणि झटका देऊन ट्रक उलथवणे—रिता करणे म्हणजे एक कर्म होते. पहिल्या पाळीला मी ते केले, जणू माझ्या पाठीचा कणाच करकचला गेलासे वाटले...

तसे पाहिले तर शून्याखाली ४०° तपमान गेले तर नियमाप्रमाणे आमच्याकडून काम घेऊ नये असे बंधन होते. पण प्रत्यक्षात शून्याच्याखाली ६०° तपमान असतानाही आम्ही कुथतकण्हत होतो. खांद्यामध्ये मोठ्या मुश्किलीने मस्तक दाबून मी तो भयानक गारठा सहन करण्याचा प्रयत्न करी. कधी कधी तर ॲक्सलमध्ये ग्रीस गोठून ट्रक फरफटत न्यावा लागे. पण कशापासूनही सुटका नव्हती.

माझ्यापाशी मोजे नव्हते. पण वर्कशॉपमधून मी तेलाने माखलेल्या चिंध्या-बोळे पळवले. हाताभोवती गुंडाळले. पायांभोवतीही गुंडाळले. मोज्यांपेक्षाही मला ते सुखकर वाटले ! पण गारठा रोखू शकेल असे काही नव्हते. एखाद्या तासाभरातच मी इतका गोठून, कडाडून जाई की लहान मुलासारखा किंचाळू लागत असे.

दिवसातून दोनदा अन्न मिळत असे. सकाळी एक काळ्या लठ्ठ पावाचा तुकडा. दिवसाचे ते मुख्य रेशन होते. दोन कप रस्सा—त्यात काय काय होते ! आणि एक छोटे भांडे भरून पाणीदार सूप. बारा तासांनंतर रात्रीचे जेवण. तोच रस्सा, सूप आणि चमचाभर सूर्यफूलाचे तेल रस्स्यावर. कधी एखाद्या माशाचा किंवा रेनडियरच्या चिवट मांसाचा तुकडाही. सोबत पाव. दिवसभरच्या या साऱ्या अन्नात १४०० कॅलरी असतात असे एका रशियन डॉक्टरने आम्हाला सांगितले होते. नेहमीच उपासमार व्हायची. पोटातली आतडी पिळवटायची—आणखी हवे म्हणून... ते त्या अवस्थेला गेल्यावरच कळते...

१९५०–५१ च्या हिवाळ्यात कामावरून घरी परतण्याइतका दम असायचा. ‘स्तोलाव्हाया’—भोजनगृहातून खाऊन येऊन बंकीत अंगावरच्या बर्फासह मी कोसळतच असे. जवळपास ६० पौंड वजन घटले माझे.

पण इतर कैद्यांची स्थिती याहून भयंकर होती. हृदयविकार आणि हायब्लड प्रेशरची व्यथा जडलेली. ध्रुवप्रदेशातले थंडीचे विकार. सांधे सुजून जात आमचे सर्वांचे. दात गळून पडले बहुतेकांचे. त्या गारठ्यातून सुटका नव्हती. इतक्या भयानक थंडीत जीवजंतू क्वचितच जगतील–आणि म्हणूनच इतर विचित्र रोगांपासून त्या गारठ्यानेच आम्हाला रक्षण दिले म्हणावे लागेल! कोळशाच्या धुळीतून फैलावणारा टी. बी. चा आजार मात्र सर्वत्र होता.

आमच्या कामावर कुणाची देखरेख नसे. पण कामाचा कोटा मात्र वाटून दिलेला असे. तो पुरा केल्याशिवाय सुटका नसायची. माझ्याकडे ते सारे वेस्टेज पूर्ण वाहून नेण्याचे काम होते. इतरांना तसेच दंडक–अमूक इतका कोळसा खोदून काढलाच पाहिजे. इ. त्यात कुचराई झाली म्हणजे रेशन काटले जाई! मग काम आणखीच अवघड होई. दुबळेपणाला सीमा नसे. हे दुष्ट वर्तुळ होते.

यातून सुटकेचा एकच मार्ग. स्वतःला पूर्ण गलितगात्र, दुर्बळ करून टाकायचे. पाऊल टाकणेच मुष्कील मग फरशी पुसायचे नि स्टोव्ह पेटवायचे काम मिळवायचे! पण मर्यादित लोकांनाच ही संधी मिळे!

एके दिवशी 'बंकी'त पडल्या पडल्या एक किंकाळी मी ऐकली. आशियातला एक कैदी हातात सुरी घेऊन रशियनांना शिव्या देत होता. विक्राळ चेहरा. आपलीच बोटे त्याने सुरीने छाटली आणि घाणेरड्या रगात गुंडाळत आपल्या बंकीत गेला. नंतर दोन महिने तो दिसला, पण एम व्ही डीची एक काडी त्याने उचलली नाही! काही लोक आत्माहुतीचे, स्वतःच्या छळांचे आणखी अघोरी उपाय करून कामातून सुटका पहात. पण काही दिवसानंतर ती माणसे दिसत नसत...

या पागल जगात मनावर मोठा ताबा मिळवत मी जगत होतो. मन रमवायला अन्य काहीच मार्ग नव्हता. पत्रं नाहीत की लिहिणे नाही. मॉस्को रेडिओचा भोंगा बरॅकीत लावलेला असे. तेव्हा रशियन काही कळत नसे. १९६५ अखेरपर्यंत माझी यातून सुटका नाही, ही खूणगाठ मी पक्की बांधली होती.


यातून मावरले जाण्याची शक्यताही मी सोडली.

एके दिवशी रात्री मी नशिबाला दोष देत बंकीत पडलो होतो. येथल्या वर्षभरापेक्षा जर्मनीतला पाच वर्षांचा छळ बरा वाटला! भयंकर एकाकी वाटत होते. मनाशी ठरवले. ही जीवघेणी एकाकी अवस्था नको. कोणीतरी मित्र मिळवले पाहिजेत. त्याशिवाय दिवस कठणे अवघड आहे.

## रशियन भाषेचा अभ्यास

रशियन भाषा शिकणे हा माझा पहिला प्लॅन होता. मॉस्को विद्यापीठातला एक पूर्वायुष्यातला विद्यार्थी मला गुरू भेटला. लवकरच मी चांगली प्रगती केली. भाषाभेदांच्या भिंती ओलांडल्यावर मित्र मिळवणे सोपे झाले. तिघांशी माझी जानपहचान झाली. त्यामुळे जगण्यात गोडी वाटू लागली! त्यांच्या घरून येणाऱ्या

# विहिरी सीमेंटच्या बांधून लोकांचे जीवित रक्षण करा



आरोग्यरक्षणासाठी विहिरीचे पाणी स्वच्छ आणि निर्मळ राखा. विहिरीभोवती सीमेंटने बोकल बांधल्यास बाहेरचे घाणेरडे व चिखलाचे पाणी विहिरीत झिरपण्यास अटकाव होईल. लोकांचे रोगराईपासून रक्षण करण्यासाठी – **एसीसी** सीमेंटने बांधकाम करा.

तुम्हाला लागणारे सीमेंट मिळविण्यासाठी तुमच्या नजीकच्या **एसीसी** स्टॉकिस्टचा अथवा दि सीमेंट मार्केटिंग कंपनी ऑफ इंडिया लिमिटेड, १२१, महर्षी कर्वे मार्ग, मुंबई २०, यांचा संपर्क साधा.
तज्ञांची **मोफत तांत्रिक मदत** दि कॉंक्रीट ॲसोसिएशन ऑफ इंडिया, १२१, महर्षी कर्वे मार्ग, मुंबई २०. यांचेकडून मिळेल.

**दि ॲसोसिएटेड सीमेंट कंपनीज लिमिटेड**
**दि** सीमेंट मार्केटिंग कंपनी ऑफ इंडिया मिमिटेड

**ACC**
शेतकऱ्यांचा सखा

अन्नांच्या पाकिटात मलाही हिस्सा मिळू लागला. मी काही दिवस हॉस्पिटलमध्ये होतो, तेथेही ते मला आपल्या रेशनमधला भाग वाचवून मला पुरवत! आणि आणखीही मदत करत.

हळूहळू इतर कैद्यांशीही परिचय झाला. तेथे अनेक राष्ट्रातून आलेले कैदी होते, आणि कम्युनिस्ट कार्यकर्तेही होते! ट्रॉटस्कीचा एक सहकारी सुद्धा होता. ज्युरेव्हिच नावाचा एक रशियन मुत्सद्दी काही कवाडा पलिकडे राहत असे. व्होर्कुटाच्या लाल पाण्यावर सगळेच काही 'एक्स-कम्युनिस्ट' नव्हते. दुसऱ्या महायुद्धात दोस्तासह लढलेले पोलिश होते, बाल्टिक होते, इराक, इराण, फ्रान्स, इटाली, झेकोस्लोव्हाकिया, चीन इ. देशातले लोक होते!

माझ्या मित्र परिवारांपैकी बरेचसे धर्मगुरू होते–लिथुआनियातले कॅथालिक पंथाचे. तसेच लॅटेव्हिया, जर्मनी, रशियन ऑर्थोडोक्स चर्चचेही लोक होते. व्होर्कुटाच्या परिसरात 'धर्म' ही गुन्हेगारी मानली जाई! तरीही ती फोफावत होती! धोक्याचे होते तरी कधी कधी मीही त्यात भाग घेई. एखाद-दुसरा गार्ड असला तर निरुपद्रवी बाब म्हणून दुर्लक्ष करीत असे.

## खटक्यांचा खेळ

व्होर्कुटाच्या वातावरणाची जास्त माहिती होऊ लागली. मित्रपरिवारही वाढू लागला, तशी जीवनातली अंधारलेली छटा कमी झाली. १९५१ च्या जूनमध्ये मॉस्कोहून एक खाण कमिशन आले होते. परिणाम धडधाकट कैद्यांना खाणीतल्या आणखी खालच्या बोगद्यात कामाला जुंपायचे ठरले! माझीही रवानगी झाली!

थंडीने मी बेजार झालो. जनावराहुनही खालच्या पातळीवर काम करून अर्धा नाश झाला माझा. वाहतूक मॅनेजर एक तरुण कम्युनिस्ट होता. मुलकी खात्यातला. मी त्याला भेटलो. आधी थोडीशी ओळख जमली होती. खाली जाण्यापेक्षा मी वरच्या थरात खोदण्याचे काम मागितले. मला जराही खात्री नव्हती, पण का कुणास ठाऊक, माझी विनंती मान्य झाली! यापुढे मला काम मिळाले ते कोळशाच्या ट्रकवर देखरेख करण्याचे.

खाण नं. १६ म्हणजे एक अनादी बोगदा होता. कसल्याच यांत्रिक सोयी तेथे नव्हत्या. विषारी वायूंचा त्रास. खाणी कोसळत. ओवरसियरने मला बोलावून सांगितले, अमेरिकना, आमच्या येथे काही ऑटोमेटिक बटने नाहीत. ट्रकच्या पुढे धावून तुलाच खटका दाबावा लागेल. त्याने सरधोपट सांगितले. पण प्रत्यक्षात ती जीवावरची कसरत होती. कोळशाच्या गाडीच्या पुढे बंपरवर मी उभा राही. माझ्या टोपीतला दिवा क्षीण प्रकाशे. खटके, सांधे विचित्र बेंगळरपणे लावलेले. समोर सांधे दिसले की मी उडी मारीत असे. खटका ओढायचा, तेवढ्यात गाडी घरंगळत अंगावर यायची. क्षणाचा अवकाश मिळायचा जीव वाचवायला! कधी खटका वेळेवर हाती आला नाही तर...एकदा असेच झाले. थाडकन् सुरुवातीचे

ट्रॅम कोसळले. कोळशाच्या ढिगात मी ठार बुडालो. काही इंचानी बचावलो...पण हा खेळ नित्याचाच झाला होता.

एकदा माझ्या लक्षात आले की, सांधे नीट जुळत नाहीत. पहिले चाक जवळ येईपर्यंत तो ओढून धरावा लागे. आणि खटकेही अगदी रुळानजिक. एकदा तर दुसरे चाक यायच्या आत हात काढताना माझ्या हातमोज्यावर (!) निभावले! सेकंदाशी बरोबरी करत सगळी गाडी पसार होईपर्यंत ६० वेळा मला हे करावे लागे. प्रत्येक क्षण मृत्यू बनून येई. दुसरा मार्गच नव्हता. कुचराई झाली तर गाडाच उलटायची माझ्यावर. त्यातून सुटका मेलो तरच होतो ..मी त्याबद्दल—खटक्यांच्या दोषांबद्दल वर कळवले तर उत्तर मिळे, "तुला त्रास होतो याची आम्हाला पर्वा नाही..."

## वॉशरुम !

मृत्यूशी स्पर्धा करणाऱ्या या कामाने मी धसका घेतला. आणि यातून कशी सुटका होईल ते पाहू लागलो. १९५३ च्या फेब्रुवारीत माझे स्वप्न खरे झाले .. एक नवा डिपार्टमेंट मॅनेजर आला. त्याच्याशी पूर्वी एकदोनदा मी अमेरिकेबद्दल बोललो होतो. त्याने मला म्हटले, "वरच्या मजल्यावरची न्हाणीघरे धुण्याचे काम चेंज म्हणून तुला आवडेल ना ?"

कित्येक वर्षांने मला विचारला गेलेला हा अतिशय सुखकर प्रश्न होता !

वॉशरुम धुण्याचे काम हे नवे जग होते. २४ तास काम आणि नंतर २४ तास विश्रांती !

हे खरोखरच अद्‌भुत होते !

थकवा, क्षीणता दूर होऊ लागली. शिवाय तेथे इतरही फायदे होते. अतिशय स्वच्छ जागा होती. तरुण कम्युनिस्ट अधिकारी कपडे बदलायला येत. कधी केवळ उबदार वातावरणासाठी येत. सुरुवातीला त्यांनी अतिशय ताठर वर्तन ठेवले. पण 'अमेरिके'विषयी बोलण्याचे त्यांचे आकर्षण विशेष होते! थोड्याच अवधीत त्यांच्याशी दोस्ती जमली. इतर रशियनांप्रमाणेच 'अमेरिके'तील अद्‌भुत, समृद्ध जगाबद्दल त्यांनी अफवा ऐकल्या होत्या. पण रशियन प्रचाराने त्यांना भ्रांत पडत होती. आमच्यातला दुरावा कमी झाल्यावर ते माझे ऐकत होते. त्यांना मी अमेरिकेतील संपन्नता सांगे, सुखसोयी सांगे, ते ऐकल्यावर लहान मुलासारखा 'आ' ते पसरत...पण लगेच त्यांच्यातला 'कम्युनिस्ट' जागा होई. "ही संपन्नता केवळ बुडबुड्यासारखी आहे. एक दिवस ती फुटेल! आम्ही संपन्नता मिळवू, ती चिरंतन असेल. सध्या येथे हलाखी असली तरी एक दिवस ती चिरसमृद्धी येईलच येईल!"

"पण सध्या काय परिस्थिती ?"–या माझ्या प्रश्नावर ते म्हणत–"कधी कधी काही लोकांना खूप दुःसह जिणे होते .." स्वातंत्र्य नाही बोलण्याचालण्याचे, हे

ते खुल्या दिलाने मान्य करीत. एक काम सोडून दुसरे काम स्वेच्छेने करता न देण्याचे बंधन त्यांना खूपच जाचक जाई. व्होर्कुटातली ही नोकरी त्यांना पसंत नव्हती. दक्षिणेकडली उबदार प्रदेशातली चित्रे मॉस्कोच्या मासिकातून पाहताना ते सुखावत ! त्यांच्यातला एक जण सोडला तर कम्युनिझमच्या भ्रमापासून ते दूर होते. त्यांच्या दृष्टीने पार्टी ही ' करिअर 'साठी होती ! बाकी तत्त्वांच्या काथ्याकटीत ते लक्ष देत नसत.

बौद्धिक आणि शारीरिक दृष्टया वॉशरूमच्या परिसरातले काम सुखावह होते. लवकरच खळबळजनक ठरणाऱ्या एका घटनेतली भूमिका पत्करण्याची संधीही येथेच मला मिळाली.

१९५२ मध्ये एम. व्हीडींनी एक नवीन आमीष दाखवले !

आम्हा कैद्यांना भत्ता मिळणार होता !—भूक-रोगराई यामुळे कोळशाचे उत्पादन मंदावले होते. क्रेमलिनला वाटत होते काही रुबल्सचे आमीष दाखवले तर फायदा होईल !

नागरी संस्कृतीची झलक त्या रुबल्सनी आम्हाला दिली. कँटिनमध्ये आम्ही चहा–साखर घेऊ शकत होतो. कधी सुटीच्या दिवशी ' रेस्तोराँत ' जाऊन कोबीचे सूप, मासे वा रस्सा जास्तीचा घेऊ शकत होतो !

आमीषाचा परिणाम झाला.

कोळशाचे उत्पादन २० टक्क्याने वाढले ! पण यातूनच एक वेगळी नाटयात्मक कलाटणी मिळाली. आम्ही भुकेने, दुबळेपणाने पार जर्जर, अर्धमेले होतो आधी. त्यामुळे प्रतिकाराचे नाव नव्हते. आता पोट चांगले भरले होते. हातात रग होती ! आम्ही आमच्या हेतूकडे मोहरा वळवला. हळूहळू एकी वाढवली. अन्यायाविरुद्ध दाद लावायचे ठरवले. भयानक थडी, दुर्दशा, गलिच्छ राहणी—' ब्लान्तोई 'चा वरचष्मा आणि आमचे फुटके नशीब—आम्हाला बदलायचे होते.

संत्रीही एमव्हीडीवर नाराज होते. एमव्हीडीना सढापट तनखा मिळे ! एक संत्री म्हणाला, "त्यांना नाच, फिल्म, व्होडका आणि मान भोगता येतो...तुमच्यापेक्षा बऱ्या जागी आम्ही राहतो एवढेच. या टंड्रा प्रदेशातल्या दहा पोरगेल्या संत्र्यांनी तर खुदकुशी केली."

## स्टालिनचा मृत्यू

कैद्यांचा रोख स्टालिनच्या कडव्या, निर्दय राजवटीवर होता. आमच्या नशिबी ही कैद–त्या ' गलमुशा ' वाल्याकडून ' बुढ्या 'कडूनच आली होती...स्टालिनला उद्देशून ही विशेषणे आम्ही वापरायचे. ' प्रावदा 'तले त्याचे फोटो पाहून मुठी वळत. एक जण म्हणायचा, " गलमुशाचे लक्षण ठीक नाही. डोळे किती खोल गेलेत..."

आणि सहा मार्च १९५३ ला ती बातमी ऐकली... ' स्टालिन '–कायमचा झोपला ! रेडिओच्या भोंग्यावर ती बातमी ऐकताना आम्हाला विश्वास बसत

नव्हता. ' खूपच जगला–पण आपल्याच कर्माने गेला...आमचाही कुणी वाली आहे.' कैदी म्हणत होते. व्होर्कुटाभर ही सनसनाटी बातमी पसरली. मालेन्कोवकडून भविष्यात आम्हाला काही न्याय मिळेल, पण तशी बातमी कधीच आली नाही...एप्रिल–मे गडबडीत गेले. वातावरण अधिक घातपाती होत होते. काहीतरी उचापत करण्याला आम्ही वाट पहात होतो. नरकातून सुटका हवी होती. १८ जूनला कळले. कुणीतरी ' प्रावदा 'तली बातमी सांगितली. पूर्व जर्मनीत बंड झाले...तो अंक भिंतीवर लावून मोठ्या उत्सुकतेने वाचला. जुलैच्या पहिल्या आठवड्यात एम्व्हीडी प्रमुख बेरियाच्या अटकेची बातमी होती !

स्थानिक एमव्हीडीवाले दणकले !

त्या वर्षीचा उन्हाळा लांबल्यासारखा वाटत होता. बर्फ वितळत होते. त्याची ऊब आम्हाला दिलासा देत होती. आम्ही स्वातंत्र्यासाठी उठावाची तयारी करत होतो. संधीची वाट पहायची. पण काय करायचे, कुणालाच ठाऊक नव्हते ! मुख्यतः रशियन कैदी घाबरत होते उठावाला. निर्णय होत नव्हता.

## उठाव !

सुदैवाने एक संधी आली. जुलै २२ च्या सकाळी वॉशरुमच्या अधिकाऱ्यांनी सांगितले, " बा अमेरिकना, अखेर १७ व १८ नंबरच्या खाणीत उठाव झाले आहेत !"

त्या दिवशी सकाळी ५ वाजता १७ नंबरच्या खाणीतल्या कैद्यांनी हजेरीच्या वेळी कुचराई केली. एका निवडलेल्या नेत्याने सर्वांना गुप्त सूचना केल्या–खाणीवर कोळसा उपसायला जायचे नाही. ' ह्या काटेरी तारा उखडून टाकत नाही, तोवर खदानीत जाणार नाही '–त्यांचा निर्धार होता ! गार्डसनी खूप धाकदपटशा दाखवला. पण खास गोळीबाराचा हुकूम त्यांना नव्हता.

आमच्याही खाणीवर ही बातमी वाऱ्यासारखी पसरली ! दिवसभर भुमका उठत होत्या. ९–१०–२५ नं. वरही उठाव झालेत ! वॉशरुममधल्या अधिकाऱ्यांकडून मला वित्तंबातमी ऐकायला मिळायची. अफवा खऱ्या होत्या तर !

दुसऱ्या दिवशी शेजारच्या ७ नं. वर उठाव झाला ! खदानीतली चाके थंडावली. सुरुवातीलाच कोळसा भरून गाडी आली, (लाईन आमच्या हद्दीतूनही गेली होती) नंतर रिकामेच डबे...त्यावर खडूने लिहिलेले–" तुमचा कोळसा मुर्दाबाद–आम्हाला स्वातंत्र्य हवे !' हाताने लिहिलेली पत्रके त्यावर डकवली होती. " १२, १४ व १६ नं. वरच्या कॉम्रेड्सनो, आम्हाला हतबल करू नका. आम्ही उठाव केलाय. आमच्या पाठीशी या."

ताबडतोब आम्ही आमची उठावसंघटना बांधली. ग्युरेविच आमचा नेता. त्याच्या समितीत रशियन बुद्धिवादी व प्रतिमावर्सवादीही होते. त्यातला एकजण संध्याकाळी मला भेटायला आला.

' बाहेर केव्हा पडायचं, हे आम्ही अद्याप ठरवलेले नाही, अमेरिकना !"—मला ते ' अमेरिकन ' म्हणूनच हाक मारीत. " पण आम्ही उठाव करू तेव्हा, तुझ्याकडे एक जोखमीचं काम आहे—त्या लाल डिपार्टमेंटच्या मॅनेजरला म्हणावं, तू गप्प रहा. उगा ढवळाढवळ करू नकोस. तुझं ते ऐकतील. अमेरिकन म्हणून तुला ते मानतात."

### कझागींचा सलामी

दुसऱ्याच दिवशी मला संधी मिळाली. जुलैच्या मध्यात कझाग रिपब्लिकमधून सुमारे २०० लोक आमच्या तीन नं. च्या कॅंपवर डांबले होते. त्यांना मात्र स्वतंत्र जीवन, चांगली कमाई आणि शानदार घरं दिली होती ! पण केव्हा—तर कल्पनेतच ! म्हणजे कामावर येण्यासाठी आमीष दाखवलेले ते मजूर होते. पण येथे आणल्यावर मात्र वेठबिगारीतच आमच्यासारखे दडपले होते त्यांना.

जुलैच्या २४ ला सकाळी त्या कझागींना इतरत्र झालेल्या उठावांची चाहूल लागलीच होती. त्यांनी, सरकारने दिलेली आश्वासने पूर्ण होत नाहीत तोवर कोळसा उचलायचा नाही, असं ठरवलं ! इतर काही कैदी कामावर गेलेत, हे मात्र मख्ख बसून राहिलेत ! आणि कामावर गेलेले लोकही मग, कझागी कामाला हात लावत नाहीत, तोवर स्वस्थ बसून राहिले ! दिव्याची वात पेटली—अशी दोन्ही-कडून ! मध्यान्हीच्या १ वा. पर्यंत हे असे चालले. मग ग्युरेविचने अधिकृतपणे पुढे येऊन खाण नं. ३ चा उठाव जाहीर केला !

वॉशरुममध्ये ही बातमी पोचली. एक तरुण बॉस खूष झालेला दिसला. " सुरु-यात तर मोठ्या धीराने नि जिद्दीने केलीय तुम्ही." त्याने म्हटले. मी त्याला पटवून दिले नि म्हटले, " तुम्हीही यात लक्ष घालू नका आणि घरी निघून जा. मात्र तुमच्या लाल पार्टीवाल्यांची डोकी थंड ठेवाल तर बरे. काय होईल तें एमव्हीडी-वाले संत्री पाहून घेतील...तुमचे काम वेगळे." पुष्कळ वाटाघाटी केल्यावर, त्यांनी स्वतः लक्ष घालायचे नाही, असे ठरवले. तो विषय आपल्या कक्षेतला नाही, गार्ड पाहून घेतील, आपण उत्पादनाचे आलेख ठेवणार...असे म्हणत ते मग खरोखरच पांगले.

माझे मोठेच काम झाले !

मग आम्ही मागण्या सादर केल्या. काटेरी तारांचे कुंपण काढून टाकावे; रात्री बरॅकीला टाळे लावू नये; दहा वर्षांपेक्षा अधिक सजा ज्यांनी भोगली आहे—अशा राजकीय कैद्यांना मुक्त करणे (माझी आठच वर्षे झाली होती...) आणि सर्व राजकीय कैद्यांची खटला चालवून पूर्ण चौकशी करावी, निरपराध्यांना सोडून द्यावे.

या मागण्यांचा डांगोरा आम्ही सर्वत्र पिटत होतो. काही वेळाने आम्हाला कळले की ३० कझागींजना पकडले आहे ? आम्हाला भयंकर संताप आला. ग्युरेविरच्या नेतृत्वाखाली २ हजार कैद्यांनी नारा लावला. त्यांना सोडून द्या. खाणीचा कमांडर मेजर तो व्होन्को आम्हाला समजावून शांत करता करता थकून गेला. " त्या

लोकांना काही धक्का लागणार नाही. संध्याकाळच्या आत त्यांना सोडण्याचे मी आश्वासन देतो, मग तर झाले ना"

तेव्हा ३। वाजले होते. आम्ही वाट पहायचे ठरवले.

पण थोड्याच वेळात अनेक पोलिसांच्या मोटारींनी गेटवर गर्दी केली. चार ट्रक भरून लष्करच्या तुकड्याही आणल्या गेल्या ! त्या कझागीजना दूरच्या तुरुंगात ते नेणार, हे उघड होते. खाणीला वेढा बसला.

पिठासारखे आम्ही त्यांना दूर करण्यासाठी जाऊन भिडलो ! कझागी लोकांनी जोर मारून गाडीवर सरशी केली त्या हलकल्लोळात नि बाहेर धडक मारली ! दुसऱ्या क्षणी आम्ही शब्द ऐकले–' फायर ! '

मी भिंतीलगत सपाट पडून राहिलो. तेवढ्याही प्रचंड पळापळीत ओठावर प्रार्थना होती. त्याही गडबडीत मी पाहिले, एमव्हीडीचे काही गार्डस् उगीच नेम धरून होते, गोळ्या सुटत नव्हत्या ! एकाने तर जमिनीकडेच आपल्या मशीनगनची नळी वळवली होती ! जवळपास २० सेकंद गोळीबार चालू होता. पण ते सेकंद युगासारखे वाटले. कधी संपणारच नाहीत असे. आमच्यातले दोघे मेले होते. आणि पंधरा घायाळ झाले.

आम्ही पुन्हा एकत्र आलो. ज्युरेविचने संकेत केला. त्याची कमिटी मोठ्या गेट-कडे चालत गेली. रोखलेल्या शंभर नळ्यांकडे पहात त्याने त्चेव्हेन्चेको व इतर सैनिकांना उद्देशून बोलायला सुरूवात केली.

" आमची उठाव समिती तुमच्या सत्तेला खाण नं. ३, १२, १४, व १६ वरून अधिकृवतपणे तिलांजली देत आहे ! या क्षणापासून सूत्रे आम्हा कैद्यांच्या हाती राहतील. कुणी अधिकारी वा सैनिक बिना परवानगीने आत आले तर त्यांना ठार केले जाईल. आमचे हे पुढे टाकलेले पाऊल आपणास रोखायचे असेल तर सर्व साडे-चार हजार कैद्यांना आधी गोळ्या घालाव्या लागतील तुम्हाला ! –आणि दरम्यानच्या काळात बोगद्यातून कोळशाचा एक कण बाहेर येणार नाही ! ! "

आम्ही आनंदाने आरोळ्या ठोकल्या !

ही मात्रा लागू पडलीसे दिसले. कुणीही गोळी चालवली नाही. कुणी हात वर करून दंगाही शांत केला नाही. आम्हाला ओरडा करताना धैर्याचे पाठबळ आले. व्होर्कुटाचे बर्फ आता वितळले होते. १९५३ च्या ऐन हिवाळ्यातही ! उठाव सुरू झाला....

## कैद्यांचे राज्य

ताबडतोब व्यावहारिक दष्टीने आम्ही एक कैद्यांचे संघराज्य स्थापले ! प्रत्येक बरॅकीत उठाव समितीचा एकेक सभासद नेमला. अन्नाचा साठा ताब्यात घेतला आणि रेशन वाढवून घेतले ! आमचेच पोलिस खाते तयार केले. पण त्याची गरज नव्हती. पूर्ण शिस्त आम्ही सहज आचरणात आणली. एकेकाळचे क्रूर ' ब्लॉत्नोई '

अट्टल गुन्हेगार थक्क होऊन, चूप बसून हा विचित्र बदल पहात होते. त्यांचें काळे साम्राज्यही कोलमडले होते. आमच्या नैतिक शक्तींनी स्वतंत्रतेचा ध्वज उंच धरला. आणि त्यासाठी आम्ही आनंदाने मरणही पत्करायला तयार होतो.

मद्याच्या गोळीबारानंतरच्या थोड्याच वेळात आम्ही आमचा ध्वज तयार केला होता. एका प्लेन लाल कापडाच्या भोवती काळी किनार आमच्या हुतात्म्यांच्या स्मरणार्थ लावली होती. आम्ही ते निशाण 'स्तोलाव्हाया'–मेसवर उंच जागी लावले. पंधरा मिनीटानंतर पलिकडल्या इलेक्ट्रिक पॉवर स्टेशनकडूनही तसेच निशाण वर आकाशात ध्वजासारखे फडफडू लागलेले नजरेस पडले. थोड्याच अवधीत ७,१० आणि इतर खाणींवरही निशाणं चढली !

नजर पोचेल तेथे त्या टंड्राच्या ओसाड बर्फाटीवर ही लालकाळी निशाणं फडकताना दिसू लागली. पंचाऐंशी हजाराहून अधिक कैद्यानी बंडाचे निशाण उभारले होते.

एमव्हीडी आणि क्रेमलिनवाले पहातच होते.–" स्टालिनची राजवट असती तर एकाचे नखही दिसले नसते. आतापर्यंत " जुने लोक बोलत होते ! त्यांचे खरे होते. पण आता मनु पालटला होता. क्रेमलिन पोटातच सत्तेसाठी हाणामारी चालली होती ! त्यामुळे या बंडाविरुद्ध हुकुम द्यायला खालचे अधिकारी टरकत होते !– जास्तीतजास्त खबरदारी तेवढी डोळ्यात तेल घालून घेत होते. मालेन्कोवच्या डळमळत्या सत्तेला तर कोळशाची नितांत गरज होती. गोळ्या झाडणे फायद्याचे नव्हते नि बंड उफाळू देणे तर मुळीच नाही ! शहाणपणे काय करता येते ते पाहणं त्यांच्या हाती होते.

त्या दिवशी सरत्या दुपारी मशीनगन, हातबाँब घेतलेल्या ३०० चिलखती सैनिकांची नवी कुमक एमव्हीडीवाल्यांच्या मदतीसाठी आली.

६॥ वाजता एमव्हीडी कॅप्टनने आत येण्याची रीतसर परवानगी आमच्याकडे मागितली ! निःशस्त्र आत येऊन त्याने व्होर्कुटाच्या एमव्हीडी बॉसचे जनरल डेरेव्हेन्कोचे एक फर्मान वाचायला सुरुवात केली. त्यात म्हटले होते—

–' कालपासून सर्व कैद्यांना तिनशे रुबलचा मासिक भत्ता लागू करण्यात आला आहे. बरॅकींचे गज दूर होतील. रात्री ताळेबंदी होणार नाही. संध्याकाळच्या हजेरीला सुट्टी ! कमांडिंग ऑफीसरच्या परवानगीने नातलग पाहुणे यांच्या भेटी वर्षातून एकदा घेता येतील. "

आमच्या जाहीरनाम्याला मद्याचे बोट लावण्याचा प्रयत्न करून मुख्य मागण्या डावलल्या होत्या ! पण तिप्पट भत्ता, गजाचे अडसर दूर झाले,–कशाचीच खात्री नसताना एवढ्यानेही आम्ही हर्षाने नाचू लागलो. काही घटकाच्या बंडाने बऱ्याच सुखसोयी आमच्या पदरात टाकल्या होत्या !

नंतरचे तीन दिवस जल्लोष होता ! निसर्गही आमच्यात सामील झाला होता.

उन्हं फाकली होती. प्रत्येकजण खुषीत होता. मी कुंपणाशेजारीच मित्रांशी गप्पा मारत होतो. पहाऱ्यावरच्या संत्र्याने एवढ्या खुषीचे कारण विचारले–"काय चालले आहे ? काही लाभ झाला का दंगा करून ?" आम्ही त्याला डेरेव्हेन्कोचा फतवा सांगितला. "छान, आम्हीही तुमच्या बाजूचे आहोत ! लाल सैनिक तुमच्यावर गोळी झाडणार नाही !" त्याने उत्तर दिले.

खरं म्हणजे आम्ही वेळ घालवत होतो. क्रेमलिनहून येणाऱ्या पक्क्या फतव्याची धाकधूकीने आम्ही वाट पहात होतो. शिक्षेत सूट मिळण्याच्या प्रश्नावर काय प्रतिक्रिया होते पहायचे. पण मॉस्कोनेही मौन धरले होते !

२७ जुलैला खुद्द डेरेव्ह्येन्को आमच्या भेटीसाठी उगवला ! गटागटांनी त्याने चर्चा केल्या. वडीलधारेपणाच्या आवेशात "कामावर जाणं आता योग्य नाही का बरे ? कसे ?–" त्याने आम्हाला गोंजारले. "तुमच्या बहुतेक मागण्या तर जिकल्याच तुम्ही; आता आणखी काय हवंय तुम्हाला ?"

"क्रेमलिनच्या आदेशाची वाट पाहतो आहोत" आम्ही म्हटले. मग बाहेर पडण्यापूर्वी डेरेव्ह्येन्कोव्हला आदेश दिला–"मॉस्कोहून अंतर्गत खात्याचे सर्वोच्च मंत्री येणार आहेत–दक्षता ठेवा"

उठावाच्या विजयाचे दुसरे चिन्ह अशी ती बातमी वाऱ्यासारखी सर्वत्र पसरली ! पण आमच्यापैकी अनेकांना बरे वाटले नाही. कारण मास्लेन्निकोव्हचा अनुभव ठीक नव्हता. पक्का लुच्चा आणि क्रूर होता तो.

जुलै २९ च्या दुपारी एक मित्र धावतच माझ्या खोलीत आला.–"रस्त्यावर पहा, मॉस्कोचा जनरल येतोय !" तो ओरडत होता. मी बाहेर गेटपाशी पोचलो, तेवढ्यात दुतर्फा उभ्या असलेल्या लाल सैनिकांच्या रांगेतून एक लांब काळ्या मोटारीने वळण घेतले ! हत्यारबंद सैनिक खडी सलामी देत होते. मागाहून आणखी गाड्या आत येत होत्या.

मास्लेन्निकोव्ह सर्वांत पुढे होता. त्याच्यापुढे तीसेक उच्च लष्करी अधिकाऱ्यांचा घोळका. फूटबॉलच्या मैदानात आम्ही खुर्च्या वगैरे मांडल्या होत्या. एक लांबलचक टेबल ठेवले होते. आम्ही जमून त्यांची वाटच पाहत होतो. आमच्यातले वीस फर्डे दमदार वक्ते आम्ही निवडले होते. ती एक ऐतिहासिक घटना होती.

सुरुवातीला ग्युरेविचने आमचे निवेदन सादर केले. आणि शिक्षेत कपात करण्याबाबतचा दृष्टीकोण व्यक्त केला. दहा वर्षांवर शिक्षा भोगलेल्या सर्वांना मुक्त करण्याची विनंती केली. हळू हळू एकेक वक्ता येऊन आपले विचार मांडू लागला. कैद्यांना – उच्च श्रेष्ठींपुढे मिळालेली लाल जगातली ही अभूतपूर्व संधी होती ! मास्लेन्निकोव्हलाही ऐकावे लागत होते...

ती भाषणे हृदय हेलावणारी होती. बुद्धिवादी विवेचन सुद्धा होते. इतिहासाच्या एका माजी प्रोफेसराने कडक भाषण केले. आणखी दहा वर्षांची सजा मिळेल असे.

पण मास्लेन्निकोव्ह म्हणाला, Nyet, Nyet...स्वतंत्रपणे विचार मांडता येतीत... हे नवलच होते. त्या प्रोफेसरांनो, आजवर इतक्या निर्दयपणे कैद्यांना वागवले गेलें नाही. व्होर्कुटाच्या लाल पाण्यासारखे – असा दावा मांडला. कामगारवर्गाच्या मुक्तीदात्यांच्या उच्च श्रेष्ठींपुढे तो बोलत होता. 'वाहवा...' आम्ही त्याच्या निवेदनाला साद देत होतो. आणखीही अनेक देशातले कैदी बोलले. मास्लेन्निकोव्ह खाली मान घालून ऐकत होता. बोल्शेविकांच्या ३० वर्षांच्या कारकिर्दीत ही घटना त्यानें स्वप्नातही पाहिली नसेल ! भाषण संपल्यावर न बोलता उठून पुढच्या खाणीत ते गेले. खाणीखाणीतून चर्चा होत होती.

## दिशा पालटली

उठावाच्या दहा दिवसानंतर, १ ऑगस्टला, काहीतरी विचित्र घडत असल्याचे प्रत्यंतर येत होते. ७ नं. च्या खाणीतून गटागटांनी कैदी बाहेर टंड्रा प्रदेशात नेले जात होते. असे तीसेक गट नेले. काही वेळाने ते वापस येत होते.

एक तासानंतर आम्हाला पत्ता लागला, काय घडत होते – एमव्हीडीवाल्यांनी पहिल्या गटाला काही न बोलता जाऊ दिले. दुसऱ्या गटाला त्यांनी सांगितले– 'हे पहा, पहिल्या गटाने कामावर हजर रहायला मान्यता दिली आहे. तुम्हीही निमूट कामावर जा, नाहीतर येथे गोळ्या घालतो ..' गटामागून गटांना हाच प्रश्न विचारला !

सात नं. च्या खाणीवरच्या उठावाचे सूप वाजले ! अर्थातच, ते एमव्हीडीवाले बाहेरून खास बोलावले होते.

११ वाजता ते आमच्या शेजारच्या खाणीवर गेले. थोड्याच वेळात तेथे गोळीबार झालेला ऐकू आला. नंतर साऱ्या डॉक्टरांना तातडीने त्या खाणीवर पाचारण केले – एमव्हीडीवाल्यांनी बंडखोरांचे कंबरडे मोडले. रक्तपात झाला होता. लाऊड-स्पीकरमधून सर्वांना तावडतोब कामावर जायचा आदेश देत मास्लेन्नोव्ह गेटमधून आत शिरला होता. पण कैद्यांनी कुंपणापाशीच गर्दी केली. कामावर जायला फक्त ५० कैदी निघाले. तिसऱ्या घोषणेत त्याने बंड मिटवायचा आदेश दिला. निमूट कामावर जा. नाहीतर ही शेवटची वॉर्निंग ! पण त्याचे वाक्य पूर्ण होण्याआधीच कैद्यांनी मुर्दाबादच्या घोषणा केल्या. आम्हीच मुक्तीचे दाते आहोत. तुमचा कोळसा गेला खड्ड्यात. आम्हो स्वतंत्र आहोत...! आणि मशीनगन्स कडाडू लागल्या... २ मिनिटे फैरी झडत होत्या. एकही माणूस उभा राहू शकला नाही...एकोणे दहा ठार झाले आणि पाचशेहून अधिक भयानक जखमी झाले. उरलेल्यांना आपल्या दोस्तांच्या प्रेतांवर पाय देत मास्लेन्नोव्हने बाहेर यायला पुकारले.

ही कत्तलीची बातमी ऐकून दुसऱ्या दिवशी आम्हीही कामावर रूजू झालो. इतरही खाणींनी शरणागती पत्करली. जवळपास सात हजारावर बंडवाले एम-व्हीडीवाल्यांनी टिपून कैद केले. तीनशे जणांवर खटले भरले. हजार लोक अति

पूर्वे॰ डें धाडून दिले. उरलेल्यांना आणखी शिक्षा दिल्या. ग्युरेविचला मी पुन्हा पाहिले नाही...

उठाव कालात कचरलेले कायदे चांगले जारी करण्यात आले. पाश करकचून आवळले गेले. स्वातंत्र्याच्या वेदीवर आम्ही धडक दिली. पण अपयश आले होते... ' स्टालिन ' थडग्याआड गेला नव्हता...

## तुला ट्रेनन जायचे आहे

पण व्होर्कुटा पुन्हा शांत कधीच झाले नाही. १९५४ च्या फेब्रुवारीत एक ऑफिस बिल्डिंग बॉंबने उडवून दिली. आणखीही घातपात होत होते. त्यांना तसेच क्रूरपणे दाबून टाकले. अंतर्भेदासाठी एक फूटपाडी टोळी पेरली गेली ..२९ न. च्या खाणीवर मला बदलून टाकले. तेथे माझ्या बराकीतला प्रत्येकजण एक-दोन गोळ्यांच्या जखमा अंगावर अभिमानाने लेवून हिंडत होता. माझी मुक्तता आता दुष्कर होती. तरी १९५४ च्या मेत एक पत्र मी चोरून पाठवू शकलो. जूनमध्ये पहिल्या आठवड्यात एके दिवशी ' स्तोलाव्हाया 'त खात होतो – तो अमेरिकन, अमेरिकन म्हणत कुणीतरी पुकारा करत आले. मॉस्कोला जायची तयारी करा म्हणून आदेश आला ! एक एमव्हीडीवाला येऊन ७ वा. तयार रहा म्हणून सांगू लागला.

' का ?' मला आश्चर्य वाटले. आणखी खडतर नरकाची वाट चालावी लागणार ? किंवा कदाचित खटलाही चालवला जात असेल...

' माझ्या माहितीप्रमाणे तुला मायदेशी जायला मिळेल. ' त्या शब्दांनी मी मुळीच हुरळलो नाही. ती अशक्य गोष्ट होती ! फक्त व्होर्कुटातले जगच माझ्या दृष्टीने वास्तव होते. बाह्य जगाशी संबंध पूर्ण तुटला होता.

दुसऱ्या दिवशी सकाळी माझी चीजवस्त्र घेऊन निरोप घेत मी बाहेर पडलो. एमव्हीडीच्या कैद्यांच्या ट्रककडे मी वळलो. त्याने हसत म्हटले...' छे : छें, अमेरिकना, तुला ट्रेनने जायचे आहे...तो ट्रक तुझ्यासाठी नाही !'

मी लवकरच घरची वाट चालू लागणार होतो !

# समाप्त

जयवंत चुनेकर

# इतिहासातील स्मृतिचित्रे

गेले दशक ऐतिहासिक ललितकृतींनी गाजले. त्यातल्या बहुतांश कादंबऱ्या, काही नाटके, काही कथा. त्यातल्या काही यशस्वी झाल्या; काही अपेशी. काहींनी ऐतिहासिक पुराव्यांच्या सीमारेषा सांभाळल्या, काहींमध्ये कल्पनेचे स्वरूप अधिक स्वैर झाले आणि त्यामुळे त्या वादग्रस्तही ठरल्या.

श्री. ताटके यांचा हा व्यक्तिचित्रांचा संग्रह याच कालखंडातला. अगदीच 'ललितकृति' या सदरात तो मोडला नाही, तरी तत्समच असणारा. मात्र पुराव्याच्या भक्कम पायावर उभा असल्याने वादग्रस्त ठरण्याच्या धोक्यापासून दूर राहिलेला.

प्रस्तुत संग्रहात श्री. ताटके यांनी अजातशत्रू शाहू, पहिले बाजीराव, महादजी शिंदे, नाना फडणवीस, दुसरा बाजीराव व रणजितसिंह या इतिहास-पुरुषांची व गोपिकाबाई आणि आनंदीबाई या दोन इतिहास स्त्रियांची व्यक्तिचित्रे रेखाटली आहेत. मात्र ही चित्रणे त्या त्या व्यक्तींच्या जीवनातील महत्त्वाचे प्रसंग टिपीत असली, तरी ती त्यांची विस्तृत चरित्रे नव्हेत. लेखकाचा तो हेतुही नाही. फुरसतीच्या वेळच्या छंदातून या संग्रहाची निर्मिती झालेली असल्याने ही मर्यादा पडली असली पाहिजे.

यातील बहुतांश व्यक्तिरेखा या एका विशिष्ट काल खंडाशी संबंधित आहेत. शाहू आणि रणजितसिंह वगळता सर्वच व्यक्ती पेशवाईतील आहेत. त्यातही नाना व महादजी सोडले, तर उरलेल्या व्यक्ती पेशवे घराण्यातीलच आहेत.

श्री. ताटक्यांचा हा संग्रह वाचल्यानंतर प्रामुख्याने लक्षात येतात त्या दोन गोष्टी. त्याचा ऐतिहासिक पुराव्याशी प्रामाणिकपणा आणि तो मिळवण्यासाठी घेतलेले परिश्रम व सोपपत्तिक निवेदनशैली. एखाद्या व्यक्तीच्या जीवनातील काही विशिष्ट प्रसंग निवडून वर्ण्य विषय चटकदार करावयाचा, अशी लेखकाची भूमिका नाही. त्या व्यक्तीच्या कारकीर्दीचा छोटेखानी पट ऐतिहासिक नोंदींच्या आधारे

सर्वसामान्य वाचक नजरेसमोर ठेवून सोप्या भाषेत रेखला आहे. त्यात कुठे अकारण विभूतिपूजेचा वा उदात्तीकरणाचा भाग नाही, मात्र हे जसे खरे, तसेच हेही खरे की या लिखाणात कुठे नाट्यमयता उत्कट अनुभवास येत नाही. रोमांचक, फुलवरा असलेले हे लेखन नाही.

खरे तर यातली प्रत्येक व्यक्ति ही स्वतंत्रपणे कादंबरीचा विषय झालेली आहे. अपवाद छत्रपती शाहू व थोरले बाजीराव आणि गोपिकाबाई यांचा. श्री. ताटक्यांनी रेखाटलेले गोपिकाबाईचे व्यक्तिचित्र वाचून त्यांच्यावरही कादंबरी लिहिण्यासारखी आहे, असे वाटल्यावाचून राहात नाही. थोरल्या बाजीरावांचे सर्व जीवनचरित्रच नाट्यमय आहे. ही नाट्यमयता श्री. ताटके यांच्या लेखनात अनुभवास येत नाही. त्यामुळे त्यांच्या लेखनाला Low menary चे स्वरूप येते. दृष्य आणि त्यावरचे भाष्य.

इतिहास सांगण्याचा गोष्टींचाही एक मार्ग असतो. त्या स्वरूपामुळे कथनातही एक वेग येतो. श्री ताटके यांनी जी सरळ निवेदन पद्धती स्वीकारलेली आहे, तीत हा वेग नाही.

एकाच कालखंडातील, विशेषत: एकाच घराण्यातील व्यक्तींची ही चित्रे असल्याने त्यात अपरिहार्यपणे पुनरावृत्ति आलेली आहे.

या संग्रहातील एकूण आठ चित्रांपैकी अखेरचे रणजितसिंहाचे व्यक्तिचित्र अगदीच जुजबी आहे. पुस्तकाची भर करण्यासाठी त्याचा समावेश तर केला नसेल ना, अशी शंका निर्माण करण्याएवढे. उरलेल्या व्यक्तिचित्रांपैकी गोपिकाबाईंचे चरित्र लेखकाने अधिक जिव्हाळयाने वर्णिले आहे, असे जाणवते. तिचा मानी, करारी आणि सत्त्वस्थ स्वभाव त्याबरोबरच तिची दैवहतता यांचे चित्रण लेखकाने साधार केले आहे. गोपिकाबाईप्रमाणेच लक्ष वेधून घेणारे आणखी एक व्यक्तिचित्र म्हणजे आनंदीबाईचे. पेशवाईतील खलनायिका म्हणूनच जिचे आजपर्यंत चित्र रेखाटले गेले, त्या आनंदीबाईचे तिला समजावून घेण्याच्या हेतूने एका अगळया दृष्टीकोनातून लेखकाने चित्रण केले आहे. ' हिला जोडीदार चांगला लाभता, तर ही पेशवे कुळाचे भूषण ठरली असती, ' असे श्री. ताटके यांनी विधान केले आहे. मात्र त्यांनी प्रस्तुत केलेल्या चित्रणावरून आनंदीबाईच्या व्यक्तिमत्त्वाची ही बाजू ठळकपणे प्रकट होत नाही. हे खरे असले, तरीही आनंदीबाई म्हणजे एक दुष्ट, कजाग, स्वार्थी स्त्री हा तिच्याबद्दलचा समज सर्वसामान्य वाचकाच्या मनावरून पुसून टाकण्याचा लेखकाने प्रामाणिक प्रयत्न केला आहे. मुलाने उधळलेल्या गुणांमुळे, सत्ता व अधिकार नसल्याने बागकामासारखी साधी हौसही पुरवता येत नसल्याने अगतिक झालेली आनंदीबाई ही या व्यक्तिरेखातली उल्लेखनीय व्यक्तिरेखा.

आनंदीबाईसारखी बदनाम झालेली पेशवाईतील आणखी एक व्यक्ती म्हणजे दुसरा बाजीराव. आनंदीबाईच्या व्यक्तिचित्र रेखाटणातला जिव्हाळा आणि व्यक्ति-

चित्र रेखाटणातला उपहासजन्य रस लक्षणीय आहे! अन्य कोणत्याही व्यक्ति-चित्राच्या सुरुवातीस व्यक्तित्वदर्शक सारांश रूप विधान नाही, मात्र ह्याच व्यक्तीच्या बाबतीत ते आहे, याचे हेच तर कारण नसेल ?

ह्या संग्रहाचे सारेच लेखन 'नामूलं लिख्यते किंचित' यानुसार लेखकाने केले आहे, याचा उल्लेख पूर्वीच केला. त्याचे प्रत्यंतर, पानोपानी येते. किंबहुना त्या व्यक्तीच्या कर्तृत्वासंबधी, यशापयशासंबंधी लेखकाचे स्वतःचे असे भाष्य नाही, निष्कर्ष नाहीत, मीमांसा नाही. याचे कारण अर्थातच उघड आहे. लेखकासमोर फारसा चिकित्सक, अभ्यासक असा वाचक नाही. इतिहासासंबंधी शक्य तितक्या सोप्या भाषेत, साधार माहिती द्यावी हा मर्यादित हेतू. पुस्तकाला अगदीच ऐतिहासिक जंत्रीचे स्वरूप येऊ नये, याची लेखकाने काळजी घेतली आहे. त्यासाठी मधूनमधून काव्यपंक्ती, पोवाड्याच्या चौकाचा एखादा चरण यांचा लेखकाने वापर केला आहे. मात्र तो गोपिकाबाईच्या व्यक्तिरेखेसारखा अपवाद वगळता फारसा चपखल, प्रयोजक आहे, असे वाटत नाही. काही ठिकाणी तर तो अगदीच बटबटीत, ढोबळ वाटतो. शिंद्यांच्या संबंधाने उद्धृत रामचंद्र शाहीराच्या दोन ओळी (पृ. ७७) या दृष्टीने पाहाव्या. अशाप्रकारे ओळी उद्धृत केल्याने लेखनात कृत्रिमपणा येतो.

लेखकाने ऐतिहासिक तपशील देताना तो बारकाईने दिला आहे. अनेक प्रसंगाची, वर्णनांची पुनरावृत्ती होऊनही त्यात एखादा किरकोळ अपवाद वगळता तफावत नाही. अपवाद आहे तो फक्त शाहूचा. एकदा त्याच्या दोन बायकांची नावे अंबिकाबाई व राजसबाई अशी येतात तर पुढच्याच पानावर राजसबाईची सावित्रीबाई होते. (पृ. १२–१३).

एकंदर लेखनातही बहुतांश सहजता आहे. मात्र '१७८४ च्या १४ नोव्हेंबरात' (पृ. ७७) अशी अपवादात्मक वाक्यरचना, एकाच परिच्छेदात भिन्न काळांचा वापर (पृ. १७, ५५) असा सैलपणाही आहे. तो अधिक खबरदारीने टाळता आला असता.

संग्रहाला दिलेले नाव अतिव्याप्त म्हणून अप्रयोजक वाटते. एक रणजितसिंहाचा अपवाद वगळता यातील व्यक्तिचित्रे ही महाराष्ट्राच्या, त्यातही त्याच्या एका विशिष्ट कालखंडाच्या इतिहासातील आहेत. खेरीज ती खऱ्या अर्थाने 'स्मृतिचित्रे' नाहीतच. त्यांना पुराव्याचा भक्कम आधार आहे. स्मृतीचा आश्रय करायचे इथे काहीच कारण नाही. त्यामुळे अर्थ लावायचा झाला तर 'स्मृति ठेवण्याजोगी (व्यक्ति)चित्रे' असा लावता येईल. लेखकाला बहुधा तोच अभिप्रेत असावा.

प्रस्तुतचा संग्रह म्हणजे काही मोठा संशोधित प्रबंध नाही. तरीपण इतिहास विषयातला रूक्षपणा टाळून ऐतिहासिक व्यक्तींविषयी जेवढ्या रंजकपणे पण

पृष्ठ ५२ वर

# क्रीडांगण

नरेंद्र दाभोळकर

## सुरेख कल्पना सुयोग्य निवड

# शिवछत्रपती पारितोषक आणि सदानंद शेटे

रसिकांचे मत आणि परीक्षकांचे मनोमन यांचा सांधा क्वचित जुळतो. असे झाले नाही तर मग चांगल्या चांगल्या कल्पनेतील हवाच निघून जाते. मग राहतो तो नुसता कोरडा उपचार.

असा प्रकार शिवछत्रपती पारितोषकाबद्दल यंदा झाला नाही म्हणून परीक्षकांचे अभिनंदन !

महाराष्ट्र राज्याचे सरकार हे तसं थोडं शहाणे सरकार आहे. कलावंत म्हटला मग साहित्यातला असो वा संगीतातला असो किंवा सामन्याच्या मैदानावर चमकणारा असो त्याची बूज राखण्याचा ते शक्यतो प्रयत्न करते. (कोणी म्हणतात यशवंत नीति ती हीच) पोटातला हेतु भले काहीही असो पण त्याच्या क्षेत्रात त्यामुळे उत्साह वाढतो. चैतन्य जागते. निकोप स्पर्धाही लागते.

मागच्या वर्षी खेळाचे वेगळे खाते महाराष्ट्रात उघडले गेले आणि काही नवीन उपक्रम चालू झाले. श्री. शिवछत्रपती पारितोषक हा त्यामधील एक. त्या त्या देशी विदेशी खेळात महाराष्ट्र पातळीवर सर्वोत्कृष्ट ठरणाऱ्या खेळाडूंचा सत्कार करायचा, त्याला मानाने राजभवनात बोलवावयाचे, चांदीच्या तबकातून जरीटोपाची प्रतिकृती, समशेर व जरीपटका द्यावयाचा अशी या मागची कल्पना. राष्ट्रीय पातळीवर दिल्या जाणाऱ्या अर्जुन पारितोषकाची छोटी आवृत्तीच म्हणाना !

दुर्दैवाने महाराष्ट्रात या पारितोषकाची किंमत अजूनही क्रीडासंघटनाना कळलेली नाही. मागीलवर्षी या पारितोषकासाठी निवडलेल्या एकोणीसपैकी अवघ्या सहा प्रादेशिक संघटनानी आपल्या खेळाडूंच्या नावाची शिफारस केली. आणि निवड समितीकडे नावे पाठविली. काम करण्याचे बाजूला राहिले पण निदान जीव तोडून

खेळणाऱ्या खेळाडूला मानाचा जिरेटोप मिळवून द्यायला यांचे काय जात होते कुणाला माहित ? बरे पहिले वर्ष म्हणावे तर यंदा देखील तसा प्रकार आहेच. सुधारणा एवढीच की यंदा एकूण अकरा संघटनांनी आपली नावे पाठविली.

बक्षिस देताना महत्त्व दिलेला एक मुद्दा पक्का राजकारणी होता. भलत्या ठिकाणी प्रादेशिक भावनात्मक ऐक्य वगैरे म्हणजे थोतांडच नाही का ? साऱ्या भिंती ओलांडून एकमेकाजवळ जायचे म्हणून क्रीडास्पर्धा. त्याच्या वाढीसाठी पारितोषके आणि त्यात पुन्हा या ऐक्याच्या नावाने सवता सुभा. म्हणजे असे की कबडीचे पारितोषक महाराष्ट्राला मिळाले ना मग खोखोचे विदर्भात पाठवा. मागील वर्षी नागपूरला उषो लोहारकरची खोखोला झालेली निवड प्रामुख्याने या निकषावर झाली...हे एवढ्यावर कुठले थांबायला ? आता पुढील वर्षी कबडीचे पारितोषक विदर्भात आणि खोखोचे महाराष्ट्रात असेही ठरले होते. पारितोषक म्हणजे काय नुरा कुस्ती वाटली काय ? पाच मिनिटे तुम्ही वर, पाच मिनिटे आमची सरशी. दोघेही खूष ! खेळाचा सन्मान करणार ना ! मग क्रीडा कौशल्याच्या कसोटयावर नीट पारखून करा. दोन्ही खेळातील सर्वोत्कृष्ट खेळाडू मुंबईच्या एकाच चाळीत एकाच मजल्यावर जवळच्या खोलीत रहात असले तरी त्यांना बक्षिस द्यायला नको का ? असले शहाणे सल्ले बहुधा शासनाला पटत नाहीत. पण भारतीय क्रीडा संघटक शंकरराव साळवींनी हे मुद्दे त्यांच्या गळी उतरविले. या माणसाची एक गोष्ट मला आवडते, पटेल ते बोलायला आणि योग्य ते वागायला तो कुणाचाही मुलाहिजा ठेवत नाही. तोंडाला फटकळ असला तरी मनातल्या तळमळीने काम होते. जे खेळ महिला व पुरुष दोघेही खेळतात त्यामध्ये बक्षिपात्र खेळाडू असतील तर दोन पारितोषके द्यावीत, हाही मुद्दा त्यांनीच मान्य करून घेतला. नाहीतर क्रिकेट आणि कुस्ती या दोन्ही कार्तिक स्वामीच्या खेळाचे आदर्श पुढे ठेवून बाकी साऱ्यांचे संयोजन व्हायचे आणि मग पुरुषांना लाजवणारा खेळ करणाऱ्या आमच्या महिलांना हा मान मिळणार कधी ?

देशी खेळाच्या शिवछत्रपती पुरस्काराबद्दल म्हणाल तर परीक्षकांच्या मताशी महाराष्ट्रातले बहुतेक क्रीडा रसिक सहभागी आहेत. कबड्डीमध्ये मागील वर्षी मधू पाटीलला हा मान मिळाल्यावर यंदा सदा शेटे शिवाय दुसऱ्या कोणाचेच नाव पुढे येऊ शकत नव्हते. मागील वर्षी मुलींच्या वाट्याला हा मान येण्याची शक्यता असती तर वासंती सातवचे नाव शंभर टक्के नक्की होते. पण अ. भा. स्पर्धेत अजिक्यपद मिळवल्यावर तिने आपली निवृत्ती जाहीर केली आणि सप्तपदी चालल्यामुळे ती खेळापासून सात पावले दूर सरकली. यंदा जी दोन तीन नावामधून निवड अपेक्षित होती, त्यामध्ये चित्रा नावर हे नाव होते. यंदा तीने महाराष्ट्र राज्याला अ. भा. आंतरराज्य कबड्डी स्पर्धेत अजिक्यपद मिळवून दिल्याने हा सन्मान तिच्या बाबतीत अपेक्षितही होता. (एक भविष्य आताच वर्तवून ठेवतो.

महाराष्ट्र राज्याचा महिला कबड्डी संघ गेले पंधरा वर्षे अ. भा. स्पर्धेत सतत अजिंक्य आहे. येत्या दहा वर्षात तरी ती पराभूत होण्याची शक्यता दिसत नाही. एकदाच संघनायक व्हावे. संघ हमखास जिंकतोच आणि मग अ. भा. स्पर्धेतून निवृत्त व्हावे अशी एक परंपरा कबड्डीमध्ये चालू आहे. त्यालाच आता निवृत्त होताना शिवछत्रपती पुरस्काराचा मानही खेळाडूला मिळावा असा एक अलिखित संकेत जोडला जाण्याची शक्यता आहे. पाहू काय होते ते ?) □

# सदानंद शेटे

सदानंदचे संपूर्ण नाव काय ? त्याचे शिक्षण कुठे झाले ? विजय बजरंग संघातून तो कधीपासून खेळू लागला ? रेल्वेच्या संघात तो कधी दाखल झाला. या साऱ्या गोष्टींचा परिचयात उल्लेख करावा अशी एक रूढ परंपरा आहे. सदाचे कुठले सामने अधिक गाजले ? त्याला किती बक्षिसे मिळाली ? सुवर्णपदकांची संख्या किती ? स्वकर्तृत्वाने मिळवलेल्या त्याच्या विजयातून त्याच्या संघाची किर्ती आणि त्याची खेळाडू म्हणून मूर्ति कशी साकार झाली या साऱ्याचा उल्लेख करावयास हवा हेही मला माहीत आहे.

पण या साऱ्या गोष्टींना माझ्या मते गौण स्थान आहे. सर्व खेळाडूंच्या बाबतीत नव्हे. पण सदाच्या बाबतीत हा सन्माननीय अपवाद करायला हरकत नाही. वैयक्तिक बक्षिसे, संघाची हारजीत, इतर मानसन्मान या पलिकडे जे गेले आहेत असे काही अत्यंत मोजके खेळाडू असतात. त्यांचे क्रीडानैपुण्य म्हणजे एक अविष्कार असतो. मैदानावरील उपस्थिती म्हणजे चैतन्य असते. खेळाच्या इतिहासात त्यांनी म्हणून निर्माण केलेला एक टप्पा असतो. त्या खेळाने खेळाडू मोठा होण्याबरोबरच खेळाडूमुळे खेळही मोठा होत असतो. हॉकीमधली ध्यानचंदची अथवा क्रिकेटमधली डॉन ब्रॅडमनची उदाहरणे घेतली तर मला काय म्हणावयाचे आहे हे लक्षात येईल.

कबड्डीची तुलना मी फार मोठ्या खेळाशी केली याची मला पूर्ण जाणीव आहे. पण महाराष्ट्रात आणि राष्ट्रातही देशी खेळ म्हणून कबड्डीला काही मानाचे स्थान आहे. प्रेम करणारे हजारो क्रीडाशौकीन आहेत. चाळीस-पन्नास वर्षाचा छोटा इतिहास आहे. या ऐतिहासिक परंपरेतील मधु पाटील आणि सदा शेटे हे दोन महत्वाचे दुवे आहेत. किंबहुना इतके तोलाचे तिसरे नाव आज तरी मला कबड्डी-पटुत आढळत नाही. भारतातल्या बहुतेक नामवंत स्पर्धा मी खेळलो आहे. सर्व चांगल्या खेळाडूंशी दोन हात करण्याची संधी मला कधी ना कधी मिळाली आहे. निरनिराळ्या वेळच्या परिस्थितीमधील त्यांचे पवित्रे मी पाहिले आहेत आणि

जबाबदारीने हे विधान मी करत आहे.

कुठल्याही बलदंड प्रतिस्पर्ध्याबरोबर सामना रंगविण्याच्या इर्षेने झुंजारपणे सामना खेळणाऱ्या संघात सर्व भारतात मध्य रेल्वे संघाला मी पहिला क्रमांक देईन आणि याची सुरुवात करतो बहुसंख्य वेळा सदानंद. पकडीमधील एकेरी पट काढणे, दुहेरी पट ओढणे, ब्लॉक करणे, धडक मारणे, डाइव्ह मारणे, लवण पकडणे या सर्व कौशल्यात तो निर्विवादपणे पारंगत आहे. पण या साऱ्याचा उपयोग तो ज्या बेडरपणे करतो ते धाडस अक्षरशः चकित करणारे आहे. हैद्राबादच्या अ. भा. स्पर्धेचा अंतिम सामना, रेल्वे विरुद्ध महाराष्ट्र राज्य सामना नुकताच चालू झालेला. अतिशय चलाख व तल्लख नजरेचा मधु पाटील सावधगिरीने चढाई करत होता. आणि सदाने त्याच्या पायावर सूर टाकून त्याला अचूक अडवला. इतक्या महत्वाच्या सामन्यात मधू सारख्या खेळाडूला सूर टाकण्याचे धाडस दाखवणे हे कर्तृत्व फक्त सदाच दाखवू शकेल. त्यानंतर दोन वर्षांनी इंदूरच्या अखिल भारतीय स्पर्धेत पहिल्याच चढाईला पुढे येऊन वसंत सूदचा एकेरी पट ओढण्याचा अयशस्वी प्रयत्न सदाने केला. सूद सारखा खेळाडू पटात सापडणे महामुष्किल आहे आणि अशा सामन्यात पहिला गुण देणे हे फार महागात पडते हे काय सदाला माहित नसेल ? पण जे अवघड असते तेच करून दाखवायची अनोखी जिद्द या माणसात आहे.

या धाडसापायी संघावर मोठा बाका प्रसंग अनेक वेळा ओढवतो. मग प्रतिस्पर्ध्याच्या हातात गेलेली विजयश्री धारदार चढाया करून खेचून आणावी लागते. यामध्येही सदाचा नंबर पहिला असतो. आपला सुमारे १७० पौंड वजनाचा बोजा सांभाळत हा खेळाडू अत्यंत सफाईने हनुमान उडी घेतो. पण यापेक्षा उजव्या कोपऱ्यात खोल आत शिरताना पुढच्या क्षेत्ररक्षकांनाही त्यानी मारलेली हूल ही किती जबरदस्त असते हे समजायला सदाशी एकदा खेळायलाच हवे. गेली वीस वर्षे सदा सतत खेळत आहे. तो नुसती हूल पुढच्या क्षेत्ररक्षकांना देतो आणि कोपऱ्यात घुसून गडी मारतो हे त्याचे तंत्रही सगळ्यांना माहित आहे. पण अजूनही त्याने हूल दाखविली की भले भले मध्यरक्षक मागे कोलमडतात.

प्रेक्षकांच्या आणि खेळाडूच्या सदाबद्दलचा आत्मविश्वासाचे एक मोठे बोलके उदाहरण आहे. मागील वर्षी भानू तालीमच्या शतसांवत्सरिक उत्सवासाठी महाराष्ट्रातले अवघे आठ निवडक संघ बोलवून सामने झाले. अंतिम सामना झाला महेंद्र आणि महेंद्र आणि सदाच्या विजय बजरंग संघात. सदाला काय झाले होते कोणास ठाऊक. वेगाने अंगावर आलेल्या गड्याचे ना त्यानी पट ओढले, ना पाठ दाखवून पुढे पळत जाणाऱ्या वसंत ढवगला पाठीवर पकडले. हातात असलेला सामना जिंकायला अवघा एक गुण हवा असताना आणि दोन चढाया बाकी असताना तो बादही झाला नाही वा त्याने गडी मारलेही नाहीत. सामना इतर दृष्टीने अत्यत चुरशीचा झाला. पारडे इकडे तिकडे झुकत झुकत शेवटी महेंद्र आणि महेंद्र

कप्तनीनी उत्कृष्ट खेळ करून सामना जिंकला. प्रेक्षकांची गोष्ट सोडा पण महाराष्ट्रातले बडेबडे खेळाडू मात्र याचे श्रेय विजयी संघाला द्यावयास तयार होईनात. त्यांच्या मते हा सगळा ठरवून घडवलेला बनाव होता. नाहीतरी सदासारखा खेळाडू एका सामन्यात इतका निगेटिव्ह खेळेल हे सर्वस्वी अशक्य आहे. केवळ दुसऱ्या संघाला विजय द्यायचा म्हणूनच तो असा खेळला. दोन्ही संघातल्या अनेक खेळाडूंशी निरनिराळ्या वेळी बोलून हा रचलेला बनाव नव्हता याची माझी खात्री पटली. विजय बजरंग संघ असली बनवाबनवी कधीच करत नाही हेही खरे. एखाद्या सामन्यात सदाच्याकडून चूक होणे शक्य नाही का ? डॉन ब्रॅडमनही शुन्यावर क्वचित बाद झालाच ना. पण त्याने गोलंदाजाशी काही गुप्तकारवाई–संगनमत केले अशी शंका प्रेक्षकांना यावी, यानच त्याचा मोठेपणा दडलेला आहे. सदाच्या बाबतीतही अशीच गोष्ट झाली. अजूनही शिवाजी जगताप अथवा पापा शिंदेसारखे मोठे खेळाडूदेखील सदाचा खेळ झाला नाही असे न मानता सदाने मुद्दामहून काही कारणासाठी खेळ केला नाही असे मानतात. सर्वांच्या या प्रगाढ विश्वासापुढे सामन्याचे यशापयश आणि इतर मानसन्मान दुय्यम नाहीत का ?

□

## पुस्तके

पृष्ठ ४७ वरून

कल्पनेचा किंचितही आश्रय न करता, साधार, विवेचन करता येईल तेवढे श्री. ताटके यांनी केले आहे. त्यातील विधानांबद्दल शंका घ्यायचे कारण नाही. सर्वसामान्य वाचकाला इतिहासाविषयी जिज्ञासा निर्माण व्हावी, एवढाच मर्यादित हेतु या लेखनामागे आहे. आणि तो यशस्वी झाला आहे, असे म्हणण्यास प्रत्यवाय नाही.

शेवटचा असला तरी कमी महत्त्वाच्या नसलेल्या मुद्द्यांची नोंद करून ठेवली पाहिजे. पुस्तकाच्या छपाईतील अनेक चुका थोड्याश्या खबरदारीने अगदीच टाळता आल्या नसत्या काय ? खेरीज पुस्तकाची मांडणीही अधिक आकर्षक करता आली नसती का ?

**इतिहासातील स्मृतिचित्रे : अरविंद ताटके : श्री विद्याप्रकाशन, पुणे : मूल्य तीन रु.**

# दोन नाटके : चीड आणणारी बाब

एक एप्रिल,–भरत नाट्य मंदिर, दिवसाला साजेलसं अजब-गजब नाटक, असा योग प्रेमवीरच्या निमित्तानं जुळून आला. हिराकांत कलगूटकर यांचं हे अत्यंत भिकार नाटक. नाव असलेल्या कलावंतांनी अतिसामान्य पद्धतीने सादर केलं. एखादं हलकं फुलकं कथानक, किंचित चावट विनोद, भडक वेषभुषा, या गोष्टी अपेक्षित होत्याच. परंतु जे दाखवलं गेलं, ते अतिशय हिणकस, होतं.

काका नामक कोणा एका धनाढ्य प्राण्याला शैला, बंड्या ही दोन अपत्ये असतात. श्रीमंतांची मुलं असतात तसाच हा बंड्या असतो. तर शैला प्राणनाथ नावाच्या प्रियकराशी लग्न लावण्याच्या विचारात असते. काका विरोध करतात. प्राणनाथ सव्वा रुपयाचा काळा चष्मा लावून घरात येतो. आणि या काळ्या चष्माचे भांडवलावर वधुपित्याला गंडवून त्याच्याच घरात चिटणिसाची नोकरी मिळवतो. कैलास नावाच्या एका तरुणाशी काका आपल्या मुलीचे लग्न लावू पहात असतात. कैलास मुलगी पहायला येणार असतो. कैलासला विरोध करण्यासाठी शैला–प्राणनाथ आणि शैलाचा रिकामटेकडा भाऊ बंड्या यांची 'बडी आघाडी' तयार होते. कैलासला ते धमकीचे पत्र पाठवतात. 'हुशार' कैलास–चक्क आचारी होऊन घरात प्रवेश करतो.–इनोदी सिच्युएशन तयार होते. आणि कलगुटकरांची लेखणी भयानक इनोदी नाट्य लिहून जाते. इनोदाला धार येण्यासाठी काकांची मानस कन्या यमू आणि त्यांचा कवी मेव्हणा–भैय्या, यांचा उपयोग करून घेतला आहे. (नाटक अस्सल विनोदी व्हावे म्हणून हा मेव्हणा कवी असतो).–जराही करमणूक न करणारे, किंचितही हास्य फुलवू न शकणारे,–धमाल विनोदी प्रवेश सरकत जातात–अखेरीस प्राणनाथ शैला, आणि यमु-कैलास अशा जोड्या जमतात. तुफान विनोदी प्रेमवीर नामक नाटकाचा अंत होऊन प्रेक्षक मुक्त होतात. अशा नाटकात राजा नेने, बबन प्रभू, या सारखे कलावंत पहावयास मिळावेत हे दुर्दैव आहे. कुमार दिघे सध्या फक्त अशा सुमार नाटकामध्येच अडळत असल्याने त्यांचे बाबत आश्चर्य संभवत नाही.

असे हे तुफानी प्रेमवीर ही सरस वाटावे, असे 'भानगडी शिवाय पुरुष नाही' नामक धमाल नाटक याच सप्ताहात पाहण्याचा योग आला. प्रेमवीर प्रेक्षकांनी पाहिले–ऐकले, नाराजी व्यक्त करीत प्रेक्षक निघून गेले. तर भानगडीच्या प्रयोगाचे वेळी प्रेक्षक संवाद फेकीमध्ये सहभागी झाले. नाटकातील विनोदापेक्षाही प्रेक्षक-

कलावंत यांच्या जुगलबंदीमुळेच थोडी फार करमणूक झाली. या नाटकावर महाराष्ट्र शासनाने बंदी घातली होती म्हणे—आणि आता ती उठवली.—बंदी आधी घातली का ? आणि घातलीच, तर उठवली का ? याचे उत्तर एक सरकारलाच ठाऊक असावे.

स्वतःला प्राध्यापक म्हणवून घेणाऱ्या मधुकर अष्टीकर नामक गृहस्थांनी हे नाटक लिहिण्याचे धाडस केले आहे. पप्पू महाराज नावाचा एक बदफैली पुरुष—कुटुंब नियोजनाचे प्रचारार्थ ब्रह्मचारी आश्रम काढतो. सरकारची फसवणूक करून मदत मिळवतो. या आश्रमात फुकट निवास आणि वीस रुपयात भोजन व सवलती मिळतात, त्याचा फायदा घेऊन राजा बाळ नावाचा शिक्षक येथे राहत असतो. या राजा बाळ भोवती सगळे नाटक. कारण आश्रमातील बाकीची मंडळी पोलीस खात्यातीलच.—असल्या या भुक्कड आश्रमाचे खरे स्वरूप उघड करायला नाटकातील पोलिस खाते प्रेक्षकांचा तीन तास वेळ, आणि तिकीटाचे पैसे घेते. अखेरीस पप्पूचे खरे स्वरूप उघड होते. आणि काझीचा हा अष्टीकरी अवतार सरकारी पाहुणा होतो.

सामान्य कथानक, भुक्कड रचना, घाणेरडे ओंगळ संवाद,—असा हा अत्याचार बिचारे प्रेक्षक तरी किती वेळ सहन करणार ?. अखेरीस तेही सहभागी होतात. आरडाओरडा, कॉमेंटस् यांनी नाट्यगृह निनादून जाते. आणि हे संवाद प्रतिसंवाद हीच मुख्य करमणूक समजून प्रेक्षक वेळ काढतात.

प्रेमवीर, किंवा भानगडीशिवाय पुरुष नाही, या सारख्या नाटकांचे प्रयोग व्हावेत, ही मराठी रसिकांना लाजीरवाणी बाब आहे. अर्थात या नाटकांचे भवितव्य ४-६ प्रयोगापुढे जात नाही हीच त्यातल्या त्यात समाधानाची बाब. प्रयोग तग धरत नाही असे पाहिल्यावर खेडीपाडी दौरे काढून प्रयोग संख्या वाढवली जाते. आणि यथाशक्ती प्रेक्षकांची लूट केली जाते. अशा या नाटकातून कलावंत काम करतात. ते केवळ पैशासाठी. केवळ करमणुकीचे उद्दिष्ट ठेऊन नाटकाला जाणारा प्रेक्षक या कलाकारांची नावे पाहून—आणि जाहिरातीचे आकर्षणाने नाट्यगृहाकडे जातो. आणि फसवणक झाल्याच्या भावनेने चिडतो.

शरीर सौष्ठव, आणि चेहऱ्यावरील सौंदर्य असलेल्या कोणीतरी स्त्री कलाकार—कलाकार कसल्या नुसत्या बायाच गोळा करायच्या. आणि भडक उत्तान कपड्यातून त्यांना प्रेक्षकांसमोर नाचवायचे असाही या नाटकांचा उद्देश असतो.

धड ना नाटक. धड ना तमाशा—अशा पद्धतीची ही हिणकस नाटके,—आणि या नाटकातून स्त्री कलाकारांना सादर करण्याची पद्धत—ही व्यवसायाला आलेली एक सूज आहे. हळूहळू परंतु निश्चितपणे प्रेक्षकांना ह्याची जाणीव होत आहे.—प्रेक्षक जितक्या वेगाने या प्रकाराकडे पाठ फिरवतील तितके व्यवसायाचे दृष्टिने उपकारक ठरणार आहे.

◻ ◻ ◻

# अंदाज

पंडित वि. म. जोशी
ज्योतिष विशारद

२४ ते ३० एप्रिल १९७१

**मेष :** शरीरप्रकृती चांगली राहील, प्रवासयोग येईल. स्वभावात हट्टीपणा वाढेल. पैशाची अडचण येईल. पत्नीकरता बराच पैसा खर्चावा लागेल. घरात काहीतरी शुभकार्य शनिवारी होण्याचा योग येईल. प्रवास योग ३२ ते ३६ वयातील व्यक्तींना येईल हा अनुभव बौद्धिक व्यवसाय करणारांना जास्त येईल. सुखात व्यत्यय येईल. मान-मान्यतेत कमीपणा येण्याचा योग आहे

विद्याभ्यासात यशप्राप्ती होणे कठीण जाईल. संततीकरता अनेक भानगडी निस्ताराव्या लागतील. फौजदारी सुद्धा होण्याची शक्यता आहे. मातुल घराण्यातील अगर सासुरवाडीची माणसे मदतीला धावून येतील. व्यवसाय धंद्यात मंदपणा येईल. मशिनरी, मेडिकल, पेंट व इतर फॅन्सी वस्तूंच्या व्यापाऱ्यांना जरासे वाईट दिवस आहेत. वडिलभावंडे व मित्र यांचेकडून मदत होईल. शुभ तारखा २४।२७।२८

**वृषभ :** शरीर प्रकृती चांगली राहील. धनस्थानाचा बोजवारा होईल. पराक्रमाला कमीपणा येईल. कोर्टाचे कामात अपयश येईल. घरासंबंधीचे प्रश्न अगदी पराकोटीला जातील. सप्तमातील गुरू सर्व संकटातून मुक्त करील. याबाबत शनिवारचा दिवस चांगला आहे. प्रवासयोग टाळावा. पत्नीची व भावडांची सर्व बाबतीत मदत होईल.

विद्याभ्यासात संपूर्ण अपयश येईल. संततीला वाईट दिवस आहेत. सरकारी नोकरीत असलेल्या मुलाना कामाचा ताण पडून शिवाय त्यावद्दल कमीपणाच येईल मातुळ घराण्याकडून सर्व बाबतीत मदत होईल. शत्रूसुद्धा मदतीला उभे राहतील. सार्वजनिक कामात संपूर्ण यश मिळेल. राजकारणात पडलेल्या लोकांना दगदगी प्रमाणे यश मिळेल. इंडिकेटची राशी आहे. शुभतारखा २४।२७।२८।२९।३०

**मिथुन :** शरीरप्रकृती चांगलीच राहील. सुखस्थानाला जरा कमीपणा येईल. बरेच दिवस रेंगाळलेले राहण्याच्या जागेसंबंधाचे प्रश्न नीट सुटण्याच्या मार्गावर येतील. शनिवारी हा प्रयत्न करावा. प्रवासयोग शक्यतर टाळावा. शत्रूचा नाश निश्चित होईल. शनी मंगळाचा अन्यान्य योग आहे तो चांगला आहे. अचानक धनलाभाचा योग मंगळवारी येईल.

विद्याभ्यासात संपूर्ण यश येईल. विद्येमुळे मानमान्यता मिळेल. शनिवारी हा

योग येईल. संततीचा उत्कर्ष होईल. सरकारी नोकरीत असलेल्या मुलाना प्रमोशन मिळेल. नको असलेल्या जागी वदली होईल आणि कामाचा ताण फार पडेल. पत्नी कडून थोडासा त्रास होईल. मित्रांकडून फसवणूक होण्याचा योग आहे. खाजगी-जीवनात काही चांगल्या घटना घडण्याचा योग आहे. सार्वजनिक कामात यश मिळणे मुष्कील आहे. शुभतारखा २४।२७।२८।२९।३०

**कर्क :** शरीरप्रकृती चांगली राहील. मनात गोंधळ उडाल्यासारखे होईल. भागिदार नीट वागणार नाहीत. धनस्थिती चांगली राहील. सरकारातून येणारे पैसे मंगळवारी बुधवारी हातात पडतील. हातून पराक्रम घडेल. घरात विवाहासंबंधी वाटाघाटी होण्याचा योग मंगळवारी आहे. २७ ते ३२ वयातील व्यक्तींचा प्रेम-विवाह जमण्याचा जोरदार योग आहे.

विद्याभ्यासात संपूर्ण यशप्राप्ती होईल. संततीचा उत्कर्ष होईल. बौद्धिक व्यवसाया-तील व्यक्तीना एक-दोन आठवड्यात मानमान्यता मिळेल. भागीदार व मित्रांकडून चांगलीच मदत होईल. शनी मंगळाचे केंद्र व अन्योन्य योग कोणतेही अरिष्ट नाहीसे करील. सार्वजनिक कामात यश येईल. उद्योगधंदा चांगलाच चालेल. अचानक धनलाभ होईल. शुभ तारखा २७।२८।२०३०.

**सिंह :** शरीरप्रकृतीला जरा त्रास होईल. वातविकार असणाराना जास्त त्रास होईल. मनात घातकी विचार येतील व पत संभाळण्याकरता खपावे लागेल. गृह-सौख्य चांगले मिळेल. चतुर्थाती गुरू सर्व संकटे दूर करील. अचानक पैसा हातात येईल. मामाकडे जाण्याचा योग येईल. हा योग शनिवारी रविवारी येईल. शत्रूंचा नाश होईल.

विद्याभ्यासात संपूर्ण यशप्राप्त होईल. बुद्धीच्या वैभवावर समाजात मोठेपणा प्राप्त होईल. घरासंबंधी प्रश्न एकदोन आठवड्यात मनासारखे सुटतील. संतती चांगली वागेल. साहित्यिकांच्या हातून चांगली पुस्तके लिहिली जातील. धंदा व्यवसायात जरा मंदी होईल. प्रसाधनांचे व फॅन्सी मालांचे व्यापाऱ्यांना दिवस जरा त्रासदायक आहेत. भांडवलाची कमतरता भासेल. मित्र व भावंडे मदत करणार नाहीत. शुभ तारखा २५।२६।२७।२८

**कन्या :** शरीर प्रकृती ठीक राहणार नाही. बौद्धिक कामाचा ताण पडेल. शनि-वार रविवार मानसिक त्रास फार पडेल. शुभकार्याकरता प्रवास योग येईल. सासऱ्याकडून धंदा व्यवसायात आर्थिक मदत होईल. धनस्थिती चांगलीच राहील घरात शुभ समारंभ सोमवारी मंगळवारी होईल. दिवस आनंदात जातील. उद्योग-धंद्यात मित्रांकडून फसवणूक होण्याचा योग आहे.

संततीकडून त्रास पोहोचेल. विद्याभ्यासात अपयश येईल. नोकरी व्यवसायात २८ एप्रिल त्रासदायक घटना घडतील. गुरू-शुक्र ९।५ योग पुष्कळशा अडचणी नाहीशा करील. प्रकासक, लेखक यांनी जरा हात आवरूनच व्यवसाय करावा. ३२ ते ३६

वयातील व्यक्तींना अपघाताचा योग आहे दीर्घ काळ आजारीपण यईल. शु - तारखा २५।२६।२९।३०

तूळ : शरीर प्रकृती चांगली राहील. लग्नेशे शष्ठ गेहस्थे सिंहतुल्य पराक्रमी ॥ लग्नेश शुक्र सहाव्या घरात आहे. हातून पराक्रम होईल. धनस्थानाची सुधारणा चांगली होईल. स्थावराचे पैसे हातात अचानक पडतील. घराचे प्रश्न समाधानकारक सुटतील. सरकारी कामात यश येईल. धार्मिक समारंभाला जाण्याचा योग सोमवारी मंगळवारी येईल.

विद्याभ्यासात यशप्राप्ती होईल. अॅग्रीकल्चरल, मेकॅनिकल कोर्स घेतलेल्या विद्यार्थ्यांना भरघोस यश येईल. संततीचा उत्कर्ष होईल. वकिली करणाऱ्या संततीचा भाग्योदय होईल. शत्रूनाश होईल. प्रवासात फायदा होईल. अेजन्सीचा उद्योग करणाराना अमाप काम व फायदा मिळेल. शुभतारखा २७।२८।२९।३०.

**वृश्चिक :** शरीर प्रकृती चांगली राहील. प्रवासयोग येईल. प्रवासात तसदी पडल। भावंडाशी भांडण होण्याचा योग आहे. २८ ते ३२ वयातील व्यक्तींना हा योग अधिक जाणवेल. मासुरवाडी अगर मामाकडे जाण्याचा योग आहे. हा योग रवी वारी यईल. मंगळवार बुधवारी दूर असलेली भेटावयाला येतील आणि दिवस आनंदात जाईल. भागीच्या धंद्यात नफा होईल.

विद्याभ्यासात मनासारखे यशप्राप्त होईल. वैद्यकीय व्यवसाय करणाराना नवीन संशोधन करण्याचा योग येईल. सरकारी कामात उलट निकाल लागतील. फौजदारीच्या कामात नुकसान होईल. मित्रांकडून अनपेक्षित फसवणूक होईल. गुरू-शुक्र ९।५ योग सर्व अडचणीतून पार पाडील. यात्रेला जाण्याचा योग येईल. शुभतारखा २४।२७।२८।२९।३०

**धन :** शरीरप्रकृती चांगली राहणार नाही. अपचनाचे विकार संभवतात. धनस्थितीला तडा जाईल. अनेक अडचणी निर्माण होतील. प्रवासाचा योग आहे. फौजदारीच्या सरकारी कामाकरता जावे लागेल. ३६-४२ वयातील व्यक्तींना हा योग आहे. गृहसुखात अनेक अडचणी उपस्थित होतील. शनिवारी हा अनुभव येईल. भागीदार व पत्नीची सर्व बाजूनी मदत होईल.

विद्याभ्यासात अपयश येईल. कोणत्याही अभ्यासक्रमात त्रासच होईल. संतती आजारी पडण्याचा योग आहे. शनिवार-रविवार मानसिक त्रास फार होईल. ऐषआरामात दिवस जातील. गुरूवार-शुक्रवारी मित्रमंडळीसह दिवस मजेत जातील. उद्योगधंदा चांगलाच चालेल. बौद्धिक व्यवसायातील व्यक्तींची चांगलीच प्रगती होईल. पैसा फारच खर्च होईल. सर्व सप्ताह शुभ आहे.

**मकर :** शरीरप्रकृती साधारण नरमच राहील. लग्नातील राहू-मंगळ मनाचा तोल घालवतील. शनी-मंगळाचा अन्योन्य योग आहे. त्यामुळे अनेक वादविवाद उत्पन्न होतील. प्रवासाचा योग येईल. कलाकारांना आपल्या कलाप्रदर्शनाकरता प्रवास घडेल. घरात अनपेक्षित पाहुणे मंडळी येतील. त्यांची ऊठ बस करण्यात बराच काल जाईल. दगदग जास्तच पडेल.

विद्याभ्यासात प्रगती चांगली होईल. पेंटीग, ॲक्टिगच्या वगैरे कलाकारांना दिवस अत्यत प्रगतीपर आहेत. भागिदार नीट वागणार नाहीत. फॅन्सी वस्तूंचा व्यापार करणारांना सर्व बाजूंनी प्रगतीपर दिवस आहेत. सुवासिक तेले रंग वगैरे वस्तूंच्या अेजंट लोकाना बराच नफा होईल हा योग शनिवारी रविवारी जास्त येईल. २७ ते ३२ वयातील व्यक्तींना याचा अनुभव जास्त येईल. शुभतारखा २४।२५।२८।२९.

**कुंभ :** शरीर प्रकृती चांगली राहील. सहकुटुंब प्रवासयोग आहे. मनात घातुक विचार येतील. प्रवासात मोठ्या व्यक्तीची भेट होऊन त्यापासून फायदा होईल. घरात काहीतरी शुभ समारंभ होईल. धनस्थानची स्थिती चांगलीच सुधारेल. व्यापारात भरभराट होईल. थोडीशी पत जाण्याचा योग आहे. शत्रू त्रास देतील. दशमार्तल गुरू सर्व अडचणींतून सोडवील.

विद्याभ्यासात यश येईल. इजिनीअरींग, वकील वगैरे शिकणाऱ्या लोकांना दिवस चांगले आहेत. अचानक धनलाभाचा योग आहे. थोडासा डोळ्याला त्रास होण्याचा योग आहे. भावंडाशी जमणार नाही. संततीकरता कोर्टदरबार करावे लागतील रविवार सोमवार प्रवास करण्याचा योग आहे. शुभतारखा २०।२५।२८।२९।३२

**मीन :** शरीर प्रकृती चांगलीच राहील. लग्नीशुक्र व भाग्यात गुरू हा योग अत्यंत चांगला आहे. सोमवार मंगळवार अचानक पैसा हातात पडेल. काहीतरी नवीन उद्योग धंदा मिळेल. त्याकरता प्रवास घडेल. भावंडांची व भागिदारांची संपूर्ण मदत मिळेल. धनस्थानाची स्थिती अनेक बाजूनी पैसा हातात येऊनही खर्चाच्या वाढत्या प्रमाणामुळे नाजुक होईल.

विद्याभ्यासात संपूर्ण यशप्राप्ती होईल. तत्त्वज्ञान, अगर उच्च विज्ञानाच्या पदवीकरता अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांना दिवस संपूर्णपणे यशस्वी करणारे आहेत. जमिनीचे सरकारी व्यवहार नीटप्रमाणे सुटतील. बौधिक व्यवसाय करणाऱ्या व्यक्तींना संपूर्ण यश देणारा आठवडा आहे. नवीन कामे मिळतील. शुभतारखा २४।२५।२ ।२९।३०

□ □ □


## अक्षरपद्धती, कुटुंबनियोजन आणि कुटुंबसुयोजन

अनैतिक साधने न वापरता मनोवांच्छित संतति होईल. सुयोजनाकरता पाळावयाचे दिवस, महिने, चंद्र वगैरेंचा तक्ता उपयोगाच्या माहितीसह रु. १०१/– व नियोजनाचा तक्ता रु ५१/– शिवाय त्यावर Astro-Medical उपाय सांगू. याशिवाय वर्षफल रु १०/– विवाह प्रश्न रु १०/– व इतर सर्व कामे केली जातील. भेटण्याची वेळ सकाळी ८ ते ११

**प. वि. म. जोशी,** ज्योतिष विशारद

"गीताप्रसाद" आऊट हाउस, कर्वे रोड, पुणे नं. ४

गृहस्थ भेटायला एकच गाठ पडली. ते म्हणाले,

'इतक्या रात्रीचे इकडे कुठे ?'

'कलकत्त्यातली रात्र पाहीन म्हणतो.' मी सांगितलं.

'अहो, असं करू नका. तुम्ही नवखे आहातसं पाहून मवाली हल्ला करतील तुमच्यावर.'

'छे हो. पोलीस आहेत की.'

'सगळे पोलीस बिहारी आहेत. ते कधीही बंगाल्यांच्या वाटेला जात नाहीत. बरं, हल्ली इकडे नव्याच प्रकारची लूटमार सुरू झाली आहे. शांतपणे तुमच्या-जवळ येतील नि निम्मे पैसे मागतील; किंवा तुमच्यापाशी दोन पेनं असली, तर एक पेन द्या म्हणतील. दिलं नाहीत तर तुमचा चेंदामेंदा! तशात तुम्ही नवीन. तुम्हाला भाषा ठाऊक नाही, रस्ते ठाऊक नाहीत. कशाला धोका पत्करता ?'

माझा हात धरून त्यांनी जवळ जवळ ओढतच मला निवासात आणलं.

रस्त्यावरची वर्दळ ओसरत होती.

परतताना एक प्रचंड, किल्ल्याच्या दगडी तटबंदीसारखी भिंत लागली. भिंतीच्या पलीकडून आरोळ्या, जयनाद आणि संघगीतं ऐकू येत होती.

'हा काय प्रकार आहे ?'

'हा अलीपूर जेल. बंगालचा मध्यवर्ती तुरुंग.'

'मग ही गाणी कोण म्हणतंय ? '

'नक्षलवादी कैदी! आज हे अंधारात बसून गात आहेत. उद्या हेच तुरुंग फोडून बाहेर येतील. माझे शब्द लिहून ठेवा आणि ह्यांना वठणीवर आणणं कुणाच्या बापाला शक्य होणार नाही.'

'का ?'

'कारण मनातल्या मनातून सामान्य बंगाल्यांचा त्यांना मनःपूत पाठिंबा आहे. अहो, प्रत्येक घरात जर दोन-चार लोक बेकार बसायला लागले, तर लोकांची माथी का नाही बिघडणार ? इथल्या बेकारीला काही सीमाच नाही बघा! तरुण बंगाल्याला मुळी नोकरीच मिळत नाही अशी इथली परिस्थिती आहे. नवे उद्योग-धंदेही निघत नाहीत. साहजिकच ह्यांची डोकी भडकतात. मग हाकेवरचा चीनच त्यांना जवळचा वाटतो; माओ चेअरमन वाटतो. कधी तरी माओ ह्या संकटातून आपल्याला सोडवील ह्या आशेवर निम्मे बंगाली तरुण, निदान आज तरी ह्या कलकत्त्यात आहेत!'

निवासात परतलो तेव्हा डोळ्यासमोर अंधार होता.

पहाटे पाचालाच लख्ख उजाडलं. खिडकीतून बाहेर पाहिलं तेव्हा सभोवारचा

परिसर पणजी-मडगावसारखा वाटला.

निर्मल दासबरोबर रपेटीला बाहेर पडलो. मैलभर चालल्यावर कालीमातेचं मंदिर आलं. मंदिर फार सामान्य आहे. भाविकांची गर्दी होतीच. सर्वांच्या हातात लाल जास्वंदीच्या माळा होत्या. देवीचं रूप आक्राळविक्राळ आहे. देवळाच्या बाहेर कोकरांना बळी देण्याचा लाकडी आकडा आहे. इंग्रजीतल्या 'यू'च्या आकाराचा. त्या बेचक्यात कोकराची मान अडकवतात व मारेकरी एका घावात मुंडकं धडावेगळं करतो. 'मारेकरी' किंवा 'खाटीक' हे शब्द ह्या संदर्भात चूक आहेत, कारण बलिदान करणारा सेवक आहे, देवापर्यंत प्रसाद पोहोचविणारा आहे, ही सर्वांची भावना आहे. देवीसाठी वर्षाकाठी लाखों कोकराचे इथे बलिदान देवीला खूष करण्यासाठी केलं जातं. ह्याला जनतेकडून अजिबात विरोध नाही. उलट भक्तिभावनाच आहे. हत्या कशी तडाख्यात करतात ती पहाण्यासाठी मी पाच दहा मिनिटं रेंगाळलो पण कुणीही देवीला अर्पण करण्यासाठी कोकरू आणलं नाही. फक्त एक न्हाऊन मोकळे केस सोडलेली बंगाली प्रौढा आली आणि बलिदानाच्या त्या लाकडी बेचक्याला तीने रक्तरंगी फूलं आणि कुंकू वाहून नम्र नमस्कार केला! दास म्हणाला,

"इथे विनोबाजी आले तेव्हा त्यांनी कालीमातेचं दर्शन घ्यायचं साफ नाकारलं. ते म्हणाले, जी देवी निरपराध कोकरांचा बळी घेते त्या हिंसक देवीला मी भेटणार नाही. त्यामुळे लोक प्रक्षुब्ध झाले आणि विनोबाजींच्या प्रार्थनेच्या सभेत त्यांना दगड लागले!"

देवळाच्या बाहेर दोन मोठ्या पताका होत्या. एकीवर लिहिलं होतं, "कालीमातेचा उत्सव लौकरच साजरा होईल.' दुसऱ्या पताकेवर लिहिलं होतं, 'जे देवीचा उत्सव साजरा करतील, त्यांची डोकी फोडण्यात येतील!' ही दुसरी पताका अर्थातच नक्षलवाद्यांनी लावलेली होती. दास म्हणाला,

"मनातून बंगाल्यांना नक्षलवादी आणि माओ कितीही आवडत असले तरी कालीमातेच्या विरुद्ध कुणी ब्र काढलेला त्यांना खपायचा नाही. पताका असोत वा नसोत, यंदा कालीमातेचा उत्सव धुमधडाक्यातच होईल. नक्षलवादी मारामाऱ्या करतील. पण त्याचा काहीही उपयोग होणार नाही."

रवींद्रसरोवर! स्वच्छ ऊन सभोवार पडलेलं आहे. वारं भुरूभुरू वहात आहे. पाखरं दवदार गवतात चरायला उतरली आहेत. झाडांच्या छायेखाली गुरं रेंगाळली आहेत. रवींद्र सरोवर हा एक मोठा शांत जलमय परिसर आहे. एका कडेला मोठा स्टेडियम बांधलेला आहे. 'रवींद्रसरोवर' म्हणून जो कुविख्यात प्रकार झाला तो ह्या स्टेडियममध्ये. इतक्या शांत आणि वनश्रीयुक्त रम्य जागेत असं कसं घडलं? दास म्हणाला,

"रवींद्रसरोवर प्रकरणात बायकांची अब्रू लुटली गेली हे अगदी खरं आहे. प्रसिद्धी मिळून आणखी बोभाटा होऊ नये म्हणून सगळे आळीमिळी गूपचिळी करून बसले

आहेत. मात्र तो सर्व प्रकार म्हणजे बेकार मंडळींनी श्रीमंतांवर उडविलेला विकृत सूड होता. एका बाजूला माणसांना वर्षो न् वर्ष नोकऱ्या मिळत नाहीत, नि दुसरीकडे एअरकंडीशन्ड ब्लॉक्समध्ये राहाणारी श्रीमंत धेंडं आपल्या लेकीसूनांना मिरवीत मिरवीत नटनटींना बघण्यासाठी शंभर-शंभर रुपयांची तिकिटं काढून येतात ! कुठून आला हा पैसा ? काळ्या बाजारातूनच नं ? तेव्हा ह्या श्रीमंतीचा निषेध करण्याचं एकमेव साधन म्हणजे आपल्या पौरुषाचा पाशवी आविष्कार करून दाखवणं ! तो त्यांनी पद्धतशीर काळोख करून दाखवला. तेव्हापासून श्रीमंतांनी धसकाच घेतला आहे. आता रात्रीच्या कुठल्याही कार्यक्रमाला श्रीमंत बाहेर पडत नाहीत. चुकून माकून पडलेच तर गुंड त्यांना मारपीट करतात '

जवळच्याच एका इमारतीत शिशुवर्गाची किलबील चालू होती. नीटनेटके कपडे घातलेली बाळं ठोकळे मांडून खेळत होती. त्यांच्या पाण्याच्या रंगीत बाटल्या आणि खाऊचे डबे खिडकीत रांगेने मांडून ठेवलेले होते. बाई आपल्याकडून गोष्ट सांगत होत्या. इमारतीच्या बाहेर विपूल पर्णसंभाराचं रानझाड होत. त्याच्या दाट सावलीत एक तरुणी नीळ्या कागदावरलं पत्र वाचीत बसची वाट पाहात उभी होती. तिचं भान हरपलेलं दिसत होतं. त्यावरून त्या पत्रातला मजकूर माझ्या ध्यानात आला. पलीकडेच टपाल कचेरी होती. भयानक काळोख्या जागेत, कृश, खंगलेले टपाल कर्मचारी कपाळाला आठ्या घालून कामं करीत होते. सर्वांचे कपडे ढिगाळ, फाटके होते. नाकावर जाड काचांचे चष्मे होते. काऊंटरवरच्या किडकिडीत, काळवंडलेल्या मुली कंटाळलेल्या दिसत होत्या. बिचारे–बिचारे दिसणारे पोष्टमन पत्रांचे गोण, मेलेलं ढोर ओढून न्यावं, तसे ह्या काळोखी कोपऱ्यातून त्या काळोखी कोपऱ्यात, आपापल्या हताश आयुष्याबरोबरच ओढून नेत होते.

तात्पर्य : जगाच्या पाठीवर कुठेही चकरा मारा. तीन गोष्टी सर्वत्र सारख्या आहेत-किलबिलणारा मॉंटेसरी वर्ग, रंगीत कागदावरलं सुगंधी पत्र भान हरपून वाचणारी सावलीतली तरुणी आणि पोष्टाची कचेरी !

चौरंगी हा कोर्टकचेऱ्यांनी गजबजलेला टापू. दुपारी तिथे गेलो. फराळाच्या सुटीत मोकळे झालेले, साधे सुती धोतर–सदरा पेहेनलेले बंगाली कर्मचारी कचेऱ्यांसमोर रेंगाळत होते. व्याजबट्टा करणारे पठाण जागजागी दिसले. ते गिऱ्हाईकं टेहळत होते. भूक लागली म्हणून एका बंगाली खानावळीत गेलो. आश्चर्याची गोष्ट म्हणजे एवढ्या प्रचंड वस्तीत बंगाली फराळाची दुकानं फक्त दोनच दिसली ! मी नवखा आहे हे वेटरने ओळखलं, मी म्हणालो,

' बंगालमध्ये मिळणारा सर्वात जास्त चवीचा मासा असेल त्याचं कालवण नि भात आण.'

त्याने भातमासळीचं जेवण आणलं. मासा खास रुचकर नव्हता. माशाचं नाव वेल्टी ' असल्याचं तो म्हणाला. वेल्टीवर म्हणे बंगाली लोक तुटून पडतात. जेवण

खूपच स्वस्त वाटलं. पोटभर जेवणाला दीड रुपया. समोरच्या टेबलावर एक बंगाली गृहस्थ होता. परिचयावरून तो एक सरकारी अधिकारी असल्याचं कळलं. मी विचारलं,

'इथली ऑफिसं केव्हा सुरू होतात ?'

'ते विचारू नका. कर्मचारी केव्हा येतात ते विचारा.'

'केव्हा येतात ?'

'सर्रास उशीरा येतात नि लवकर पशार होतात.'

'आणि तुम्ही हे चालवून घेता ?'

'तुम्ही कलकत्ता पाहिलंच आहे. सगळ्या कचेऱ्या ह्या अशा एका गंगेच्या किनाऱ्यावर नि कर्मचारी राहातात पार दुसऱ्या टोकाला. वीस वीस मैल दूर. इथे दररोज संप, हरताळ, मारामाऱ्या चालू असतात. कुणीही कितीही वेळेवर यायचं म्हटलं तरी त्याची ट्रॅम, बस किंवा गाडी वेळेवर येऊच शकत नाही. बरं, दोष तरी कुणाला देणार ? रस्त्यात बॉंबस्फोट झाला की रहदारी थांबते. संप झाला की सगळं दळणवळण मोडतं. मग माणसं रखडत रखडत अकराच्या पुढे येतात. दोन तास कामं करतात न करतात तोपर्यंत दंगा सुरू झाल्याच्या बातम्या येतात. कुठे कर्फ्यू ऑर्डरची अंमलबजावणी सुरू होते. मारामाऱ्या होतात. साहजिकच घरी बायकामुलांमध्ये सुखरूप परतण्याची ज्याला त्याला उत्कंठा लागते. तेव्हा कुणाच्याही परवानगीची किंवा हुकूमाची वाट न पाहाता कर्मचारी चार वाजता बेशक निघून जातात ! कशी कामं होणार ह्या परिस्थितीत ?'

'अधिकाऱ्यानी सांगून पाहिलं पाहिजे.'

'अहो, चांगलं सांगेल त्याचा हे लोक खून पाडतील अशी भिती वाटते. आम्ही आमची कातडी बचावत आहोत.'

'मग एवढ्या शहराचा व्यवहार चाललाय तरी कसा ?'

'निव्वळ यदृच्छेने !'

'साहेब, बिबी गुलाम' ह्या चित्रपटामुळे सर्वतोमुखी नाव झालेल्या विमल मित्र ह्या कादंबरीकाराकडे गेलो. ते खूपसे नानासाहेब फाटकांसारखे भासले. त्यांचं बोलणंही अघळपघळ होतं. मी विचारलं,

'आजच्या बंगाली साहित्यातला सर्वात लोकप्रिय लेखक कोण ?'

'मला वाटतं तो मान माझा आहे.'

'तुमचं वैशिष्ट्य काय ?'

'प्लासीच्या लढाईत बंगालचं स्वातंत्र्य लयाला गेलं. तेव्हापासूनचा, म्हणज दोनशे वर्षांपूर्वीपासूनचा तो अगदी भारतीय स्वातंत्र्यप्राप्तीपर्यंतचा कालखंड मी निवडला आहे. ह्या दोनशे वर्षांत बंगाल्यांचं काय काय झालं त्याचा सामाजिक इतिहास मी माझ्या कादंबऱ्यांमधून कलात्मरितीने चितारला आहे. 'बेगम मेरी

विश्वास ', ' साहेब, बिबी, गुलाम ', ' खडी दिये किनळाम ' आणि ' एकाक, दशक, शतक ' ह्या माझ्या चार कादंबऱ्यात ह्या दोनशे वर्षांचाच चित्रपट रंगवलेला आहे '

' तुम्हाला लेखनावर किती पैसे मिळतात ?'

' साहेब, बिबी, गुलामच्या एका आवृत्तीचे साठ–पासष्ट हजार रुपये मिळाले. माझ्या कादंबऱ्या नऊशे ते बाराशे पानांच्या असतात. प्रतीची किंमत चाळीस–बेचाळीस रुपये असते. साहजिकच मला रॉयल्टी उत्तम मिळते. ज्या ह्या घरात आपण गप्पा मारीत बसलो आहोत हे घर मी एका कादंबरीच्या एका आवृत्तीच्या पैशांवर विकत घेतलं आहे.'

' तुम्ही इतर काही व्यवसाय करता ?'

' पूर्वी मी रेल्वेत होतो. लेखनावर पैसा मिळायला लागल्यावर मी नोकरी सोडली. आता फक्त कादंबरी लेखन करतो. माझं अगदी उत्तम चाललं आहे. भारतातल्या अनेक भाषात माझ्या कादंबऱ्या लोकप्रिय झाल्या आहेत. तिथूनही भरपूर पैसा मिळतो. अहो, माझे हिशोब–ठिशोब ठेवण्यासाठी मी एक हिशोब तपासणीस घरी ठेवला आहे. फक्त तुमच्या मराठीत माझी डाळ शिजत नाही ! जो कुणी माझी पुस्तकं मराठीत अनुवादीत करेल त्याला मी दर-पानी दोन रुपये देईन. सर्व अनुवादकांना मी हाच दर देतो.

' हा मोबदला मराठीत कुणीही स्वीकारणार नाही. '

' पण माझी रीत ती आहे. पानाला दोन रुपये. नंतर प्रकाशक मीच गाठतो नि त्याच्याकडून माझी रॉयल्टी वसूल करतो. तो हिशोब वेगळा नि भाषांतराचा हिशोब वेगळा. माझ्या नावाचा फायदा मी घेणारच. '

' असो. सध्या बंगालची नवी पिढी काय लिहिते ?'

' मी त्यांचं वाचतो पण त्यांना भेटत नाही. तसा मी लेखकांच्या कुठल्याही अड्ड्यावर मिसळत नाही. भाजीवाले, मासळीवाले, पानवाले हेच माझे परिचित. तेच माझे वाचक. इथले लेखक माझा फार मत्सर करतात. माझ्या वाचकांना मात्र मी फार आवडतो. '

' मला शरदबाबूंच्या वारसाला भेटायचं आहे. '

' भेटू नका. तो नालायक आहे. '

' बंगाली तरुण असे पिसाळल्यासारखे का वागतात ?'

' कारण त्यांची घोर निराशा झालेली आहे. शिकून सवरूनही त्यांना नोकऱ्या नाहीत. म्हणून त्यांचा डूख आहे. भारताबद्दल त्यांना प्रेमाची भावनाच नाही. कशी असेल ?'

' पश्चिम बंगाल भारतापासून अलग पडणं शक्य आहे ?'

' दुर्दैवाने ते अशक्य नाही ! इथे चीन प्रेमाचा एक नवाच प्रवाह सुरू झाला आहे. आम्ही जुन्या पिढीतली माणसं बंगाल हा भारताच्या पोटातलाच मानतो. नवी तरुण पिढी तसं मानीत नाही. नक्षलवादी आगीत तेल ओततात. कधी ना कधी भडका होणारच आहे. पण हे सर्व फक्त सरकारच आवरू शकेल. कारण ह्या अनर्थाचं पितृत्वही सरकारकडेच आहे. '

संध्याकाळी निर्मल दास बरोबर भटकायला बाहेर पडलो. कलकत्याची लांबच लांब हिरवी गार मैदानं, तळी आणि वृक्ष पाहून मन खुषीत आलं. एकेकाळी शहर हिंदुस्थानची राजधानी का होती ते लक्षात यायला वेळ लागला नाही.

एका ट्रॅम स्टँडवर बायकांचा फारच मोठा घोळका होता. मी दासला विचारलं,

'ह्या कुठल्या बायका आहेत ?'

'ऑफीसांमध्ये कामं करणाऱ्या. आता त्या आपापल्या घरी चालल्या आहेत.'

'त्यांना कलकत्यात भिती नाही वाटत ?'

'दंगलीची वाटत नाही. स्वतःच्या भकास आयुष्याची मात्र वाटत असेल.'

'म्हणजे ?'

'तुम्ही पाहाताच की बंगाली तरुणांना नोकऱ्या नाहीत. साहजिकच ते लग्नाची टाळाटाळ करतात. संसारात पडत नाहीत. आज बहुतेक बंगाली तरुण अविवाहीत आहेत. तरुण लग्नापासून दूर म्हणजे पर्यायाने तरुणींची कुचंबणा ! आज हा इथला एक सामाजिक प्रश्नच झाला आहे. तरुण-तरुणींची लग्नं कशी होणार ? कुणालाच आर्थिक स्थैर्य नाही. जो तो टोलवाटोलवी करतो. पर्यायाने ब्रह्मचारी आणि ब्रह्मचारीणी ह्यांची संख्या भलतीच वाढते आहे. इथल्या प्रत्येक बंगाली कुटुंबात लग्न टाळणारे ब्रह्मचारी आणि लग्न होऊ न शकणाऱ्या ब्रह्मचारीणी वावरत असलेल्या तुम्हाला दिसतील. सगळ्या आईबापांना घोर लागलाय इकडं !'


'म्हणजे तुमच्या बंगालची दुखणी तरी किती आहेत ?'

'सध्या तरी प्रत्येक बंगाली माणूस म्हणजे एक स्वतंत्र दुखणं होऊन बसला आहे !'

मैदानातून फिरताना सगळे पुतळे फोडून टाकल्याचे दिसले. बहुतेक देशभक्तांचेच होते. बेंटींग रस्त्यावर वळलो. सगळा रस्ता चिनी चांभारांनी अडवल्याचा दिसला. बहुतेक प्रत्येक दुकानात तरुण चिनी पोरं गिऱ्हाईकांची वाट बघत बसली होती. तिथून गंगेवर गेलो. शुकशुकाट होता. रामकृष्ण आश्रमाला जाण्यासाठी रिक्शाला भाडं विचारलं. तो म्हणाला, 'पाच रुपये.' हे अव्वाच्या सव्वा वाटलं. तेव्हा तो म्हणाला, 'नेहमी एक रुपया घेतो. पण आत्ता बसवाल्यांचा संप सुरू झालाय. अशाच वेळी नं आम्हाला दोन पैसे मिळणार ?' रिक्शाने रामकृष्ण मिशनवर गेलो. गंगेकाठची वास्तु झकपक, स्वच्छ, प्रशस्त नि शांत दिसली. पण दुरूनच. कारण दारवानं म्हणाला, 'दर्शनाची वेळ संपली.' परतताना प्रचंड हौरा पुलावर उभा राहिलो. बंगालचा प्रदीर्घ परिसर पाहून घेतला. मनात आलं, मी कलकत्यात अलो तो हा वर्तमानकाळसुद्धा संथ जुन्या आणि धगधगत्या रौद्र नव्या अशा परस्पर विरोधी बंगाली जीवनांना जोडणारा झुलता पूलच ठरणार आहे. ◻ ◻ ◻

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३० येथे छापून, १०२५ सदाशिव पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर

MANOOS (Weekly) : 50 Paise : Regd. No. M–H 649




davp 70/683